रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ।वर्ष ८९। अंक २६२। पृष्ठे १० ▌RGD/016/2026-28 www.krushival.in

**अलिबाग-नागाव प्रॉपर्टी विकणे**
नागाव हायवे टच लक्झरीयस् प्रॉपर्टीज, ३१ गुंठे प्राईम लोकेशन, इलेक्ट्रिसीटी, भरपूर पाणी, नारळ, सुपारी, हापूस आंब्याची झाडे, परमंट कंपाउंड, क्लिअर टायटल.
संपर्क :- मालक 9769108170

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १ मार्च २०२६
किंमत ४ ₹

रिसॉर्टमध्ये कामासाठी एका जोडप्याची किंवा मुलाची आवश्यकता आहे.
ठिकाण : सासवणे
संपर्क: +91 9607102357

## भरधाव कारने 20 प्रवाशांना चिरडले

■ माणगावजवळ भीषण अपघातात १६ जण जखमी
■ चार जण गंभीर, उपचारासाठी मुंबईला हलवले

। सलीम शेख ।
। माणगाव ।

माणगाव तालुक्यातील इंदापूर बायपासजवळ कशेणे गाव परिसरात शनिवारी (दि. २८) पहाटे सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला. रस्त्याच्या कडेला बसलेल्या सुमारे २० प्रवाशांना भरधाव कारने जोरदार धडक दिल्याने १६ जण जखमी झाले असून, त्यापैकी चार जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. गंभीर जखमींना तातडीने मुंबई येथे हलविण्यात आले आहे. पहाटेच्या शांत वेळेत घडलेल्या या अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला.

मिळालेल्या माहितीनुसार, कोकणातून मुंबईकडे निघालेल्या एका लक्झरी बसचा (एमएच ४८ सीबी ४४९३) टायर पंक्चर झाल्याने चालकाने बस महामार्गाच्या कडेला उभी केली होती. बसमधील सुमारे ४० प्रवासी खाली उतरले होते. काही प्रवासी रस्त्याच्या कडेला बसले होते, तर काही जण बाजूला उभे राहून टायर बदलण्याची प्रतीक्षा करत होते. याचवेळी मुंबईच्या दिशेने येणाऱ्या भरधाव कार (एमएच ०९ एफवाय ६६००) चालकाने अचानक नियंत्रण गमावले आणि थेट रस्त्याच्या कडेला बसलेल्या प्रवाशांवर धडक दिली. बेसावध प्रवाशांना काही समजण्याआधीच कार अंगावर आल्याने एकच आरडाओरडा आणि गोंधळ उडाला. पहाटेच्या अंधारात झालेल्या या घटनेमुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. धडकेची तीव्रता इतकी जबरदस्त होती की, अनेक प्रवासी दूर फेकले गेले. काहींच्या हात, पाय, खांदा, मांडी, कंबर आणि बरगड्यांना गंभीर दुखापती झाल्या असून, काही जण रक्तबंबाळ अवस्थेत रस्त्यावर पडले होते.

या अपघातात जयहरी गोविंद मालप (५६, रा. मुंबई), स्वरूप सुदर्शन केंद्रे (१३, रा. वरळी मुंबई), सुमीथी सुदर्शन केंद्रे (३८, रा. वरळी मुंबई), बबन विठोबा देवळे (५५, रा. महाड), निशांत बबन देवळे (२७, रा. महाड), सुप्रिया सुनील केंद्रे •> पान २ वर



## टँकरची कारला धडक; क्लिनर जागीच ठार

**माणगाव :** पुणे-दिघी महामार्गावर शनिवारी मध्यरात्री भीषण अपघात घडला असून, टँकरने कारला पाठीमागून दिलेल्या जोरदार धडकेत टँकरवरील क्लिनरचा मृत्यू झाला आहे. या अपघातामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे १२.१५ वाजण्याच्या सुमारास तक्रारदार जलाल खान हे त्यांच्या मालकीची टाटा कंपनीची कार (क्र. एमएच ४६ एफ २३८९) घेऊन महाड येथून पुण्याकडे निघाले होते. सणसवाडी गावाच्या हद्दीतील टी-पॉईंट येथे त्यांनी लघवीसाठी वाहन थांबविले. त्यानंतर पुन्हा कार सुरू करून पुण्याकडे मार्गस्थ होत असतानाच पाठीमागून येणाऱ्या टँकरने •> पान २ वर

## वेधक

### १८ जणांचा होरपळून मृत्यू

**आंध्र प्रदेश :** आंध्र प्रदेशातील काकीनाडा जिल्ह्यात एका फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात आणि त्यानंतर लागलेल्या भीषण आगीत १८ जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या अपघातामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शनिवारी दुपारी फटाक्याच्या कारखान्यात हा भीषण अपघात झाला.

### युद्धाचा भडका

**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांपासून अमेरिका आणि इराणमध्ये सुरू असलेल्या तणावपूर्व परिस्थितीनंतर अखेरीस शनिवारी इराणमध्ये युद्धाला तोंड फुटले आहे. शनिवारी सकाळपासून इस्राइलने इराणची राजधानी असलेल्या तेहरामध्ये मोठ्या प्रमाणावर क्षेपणास्त्रांद्वारे हल्ला केला आहे. या हल्ल्यांमुळे तेहरानमध्ये मोठ्या प्रमाणात स्फोटांचे आवाज येत असून, आकाशामध्ये सगळीकडे काळा धूर पसरला आहे. इस्राईलच्या संरक्षण मंत्र्यांनी या हल्ल्यांना दुजोरा दिला आहे. तसेच प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून हा हल्ला केल्याचे सांगितले.

### एका कामगाराचा मृत्यू

**मुंबई :** मुंबईतील चेंबूर येथील सुभाष नगर भागात धक्कादायक अपघात घडला. इमारतीच्या सहाव्या मजल्यावर विटांचे काम करत असताना सहा कामगार खाली कोसळले. या अपघातात ५५ वर्षीय रामल्लू यांचा मृत्यू झाला असून, पाच जणांवर उपचार सुरू आहेत. जखमींमध्ये गुणधर राय (२२) यांची प्रकृती गंभीर असून त्यांना राजावाडी रुग्णालय येथील अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. उसराय (३०), रमेश राय (२५), विजय (२५) आणि संदीप (२७) यांच्यावरही त्याच रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला विचारतेय कोण ?

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

**जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट बंदी आदेश काढूनही अलिबाग-कुरुळ-सहाण बायपास रेवदंडा मार्गावर जड-अवजड वाहने बेधडक धावत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आदेशाची उघडपणे पायमल्ली होत असताना प्रशासनाचे नियंत्रण कुठे आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. शनिवारी सकाळी या बेकायदा वाहतुकीमुळे भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली आणि दहावीचे विद्यार्थी परीक्षेला जाताना अडकले; तर शनिवार-रविवार व होळीच्या सलग सुट्ट्यांमुळे फिरण्यासाठी आलेले पर्यटकही तासन्तास रस्त्यावर खोळंबून पडल्याचे चित्र दिसून आले.**



■ बंदी असतानाही जड-अवजड वाहनांचा बेकायदा सुळसुळाट
■ दहावीच्या विद्यार्थ्यांसह पर्यटक वाहतूक कोंडीत अडकल्याने संताप व्यक्त

### बॅरिकेट्सचा अभाव

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील बेलकडे, सहाण बायपास, रेवदंडा रस्त्यावर रस्त्याचे काम सुरू आहे. खोदकाम करण्यात आले आहे. सतत वाहतूक कोंडी होत आहे. त्याचा त्रास प्रवाशांसह विद्यार्थ्यांना होतोय. बॅरिकेट्स लावल्यास वाहतूक सरळ मार्गाने होईल. कोंडी नियंत्रणात आणता येईल; परंतु बॅरिकेट्सचा अभाव असल्याचे वाहनचालकांकडून सांगण्यात येत आहे.

“सलग सुट्ट्या आणि सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांमुळे कोंडी वाढली आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी होमगार्ड, स्थानिक पोलीस व सामाजिक संस्थांची मदत घेतली असून, बंदीचे फलक लावण्याचे काम सुरू आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या जड-अवजड वाहनांवर कारवाई केली जाईल आणि बंदीची कडक अंमलबजावणी करण्यात येईल.

– सरिता चव्हाण, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा”

“पोलिसांच्या अहवालानुसार अलिबाग सहाण बायपास-रेवदंडा मार्गावर सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांना सकाळी नऊ ते दुपारी बारा आणि संध्याकाळी पाच ते सात या वेळेत प्रवेश बंद केला आहे. जिल्हाधिकारी यांच्याकडून आदेश देण्यात आले आहेत. तरीदेखील आदेशाचे उल्लंघन होत असेल तर चुकीचे आहे. याबाबत पोलिसांना विचारणा केली जाईल.

– संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी”

### विद्यार्थ्यांना फटका

शनिवारी सकाळी झालेल्या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका दहावीच्या विद्यार्थ्यांना बसला. परीक्षा केंद्रावर वेळेत पोहोचण्यासाठी निघालेले अनेक विद्यार्थी कुरुळ, बेलकडे आणि सहाण बायपास परिसरात कोंडीत अडकले. काहींना वाहन सोडून पायी धाव घ्यावी लागली. मानसिक तणावात परीक्षा द्यावी लागल्याने पालकांमध्ये संताप व्यक्त करण्यात आला. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी खेळ केला जात असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

### वाहतूक पोलिसांची दमछाक

सलग सुट्ट्या, पर्यटकांची वाढती गर्दी आणि बंदी आदेश धुडकावून धावणारी जड-अवजड वाहने यामुळे वाहतूक नियंत्रण करताना पोलिसांची मोठी दमछाक झाली. ठिकठिकाणी होमगार्ड, स्थानिक पोलीस आणि स्वयंसेवकांना तैनात करून कोंडी फोडण्याचे प्रयत्न करण्यात आले. अरुंद रस्ते आणि सुरू असलेली बांधकामे यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली. नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे संकेत पोलिसांकडून देण्यात आले आहेत.

अलिबाग-कुरुळ-बेलकडे - सहाण बायपास-नागाव-रेवदंडा तसेच अलिबाग-कुरुळ-नवेदर बेली-आक्षी-नागाव-रेवदंडा या मार्गांवर रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण, मोरी व पुलांची दुरुस्ती आणि नव्या बांधकामांची कामे सुरू आहेत. ठिकठिकाणी खोदकाम झाल्याने रस्ता अरुंद झाला असून, वाहतूक कोंडीची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी सकाळी ९ ते दुपारी १२ आणि सायंकाळी ५ ते ७ या वेळेत जड-अवजड वाहनांना प्रवेशबंदीचे आदेश दिले होते. मात्र, काही चालकांनी या आदेशाला केराची टोपली दाखवत बंदीच्या वेळेतच मार्गावरून वाहनांची वर्दळ सुरू ठेवली. याचा फटका सर्वसामान्यांना बसला.

कुरुळ ते बेलकडे, ढवर ते सहाण बायपासदरम्यान ठिकठिकाणी वाहतूक ठप्प झाली. शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, विशेषतः दहावीचे परीक्षार्थी, वेळेवर परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी धावपळ करताना दिसले. नियमित प्रवाशांनाही कामावर पोहोचण्यास विलंब झाला. सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी आलेले पर्यटक कोंडीत अडकून हैराण झाले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या स्पष्ट आदेशानंतरही अवजड वाहनांचा सुळसुळाट सुरू राहिल्याने पोलिसांकडून कठोर कारवाई होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर दंडात्मक कारवाई करावी आणि बंदी आदेशाची कडक अंमलबजावणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## झाडाला धडकून विमान कोसळले

### अजितदादांच्या विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल जाहीर

। मुंबई । प्रतिनिधी ।



तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबतचा २२ पानी प्राथमिक तपास अहवाल जाहीर झाला असून, त्यातून अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. अपघातावेळी विमान प्रथम झाडाला धडकले आणि त्यानंतर जमिनीवर कोसळले, अशी स्पष्ट नोंद अहवालात करण्यात आली आहे. धडकेनंतर झालेल्या स्फोटामुळे निर्माण झालेल्या तीव्र उष्णतेत ‘ब्लॅक बॉक्स’मधील उड्डाण माहिती नोंदक (फ्लाईट डेटा रेकॉर्डर) बाधित झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे. अपघाताचे अंतिम कारण अद्याप स्पष्ट नसले तरी प्राथमिक निरीक्षणांमुळे अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. दरम्यान, या अपघात अजितदादांसह पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.

Aircraft Accident Investigation Bureau (विमान अपघात तपास विभाग) यांनी हा प्राथमिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. अपघातावेळी केवळ सुमारे दोन हजार मीटर इतकीच दृश्यमानता होती. विमान धावपट्टीपासून सुमारे ५० मीटर •> पान २ वर

## न्यायालयाचा राज्य सरकारला दणका

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने जोरदार धक्का दिला आहे. ग्रामविकास विभागाने २० फेब्रुवारी २०२६ रोजी काढलेल्या अधिसूचनेला स्थगिती देत, अशी नियुक्ती सध्या करता येणार नाही, असे स्पष्ट आदेश खंडपीठाने दिले आहेत. या निर्णयामुळे राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. •> पान २ वर

## एलईडी मासेमारी बोटी जप्त

■ मुरुड पोलिसांची समुद्रात मोठी कारवाई
■ मोठ्या प्रमाणात मुद्देमाल हस्तगत

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड पोलीस ठाणे व आगरदांडा नौका तळाच्या अधिकारी-अंमलदारांनी समुद्रात रात्री गस्त घालत असताना एलईडी दिव्यांच्या सहाय्याने बेकायदा मासेमारी करणाऱ्या दोन बोटी पकडून मोठी कारवाई केली. या कारवाईत मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन्ही बोटी आगरदांडा नौका विभाग येथे जप्त ठेवण्यात आल्या आहेत.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे तसेच



उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाई पथकात परशुराम •> पान २ वर

## खारफुटीवर बेकायदा भराव

### प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हजारो हेक्टर वनक्षेत्र धोक्यात

। उरण । प्रतिनिधी ।

अरबी समुद्राच्या कुशीत वसलेल्या उरण तालुक्यात खाडीकिनाऱ्यावरील खारफुटी (कांदळवन) नष्ट करून त्याठिकाणी दगड व मातीचा बेकायदा भराव टाकण्याचे प्रकार वाढले आहेत. चिर्ले, वेश्वी, दिघोडे, विंधने, धुतूम, पागोटे, सोनारी ग्रामपंचायत हद्द तसेच द्रोणागिरी नोड परिसरात हा प्रकार सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. महसूल, वन आणि सिडको विभागाचे अधिकारी कारवाई करण्याऐवजी मौन बाळगत असल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काही व्यावसायिक •> पान २ वर



## श्रीवर्धनमध्ये भूमाफियांचे थैमान

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यात अनेक ठिकाणी अनधिकृतपणे मातीचे भराव सुरू आहेत. भराव करण्यासाठी शासकीय जागेतूनदेखील मातीचे उत्खनन केले जात आहे. कोणत्याही ठिकाणी खासगी जागेमध्ये उत्खनन करावयाचे असल्यास त्याची रॉयल्टी भरावी लागते. मात्र, भराव करणाऱ्या भूमाफियांकडून अशा प्रकारे कोणत्याही प्रकारची रॉयल्टी न भरता अनधिकृतपणे उत्खनन करून भराव करण्याचे काम सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. तर, काही ठिकाणी शासकीय जमिनीवरदेखील मातीचे उत्खनन करण्यात •> पान २ वर

अधिकाऱ्यांचा अट्टाहास प्रवाशांना त्रासदायक | घाटमाथ्यावर बस ठप्प, कर्मचारी नाराज

## क्षमता संपलेली ‘शिवशाही’ रस्त्यावर

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।


मोठा गाजावाजा करत प्रवाशांच्या सोयीसाठी आणलेली वातानुकूलित ‘शिवशाही’ बस आता स्वतःच त्रासाचे कारण ठरत असल्याची धक्कादायक चर्चा अलिबाग आगारात सुरू आहे. आठ लाख किलोमीटरपेक्षा अधिक धावलेली आणि वारंवार बिघाड होणारी बस घाटमाथ्यावर चालण्यायोग्य नसतानाही पुणे मार्गावर पाठविण्याचा वरिष्ठांचा अट्टाहास सुरू असल्याचा आरोप कर्मचारी वर्गातून केला जात आहे. यामुळे शिंग्रोबा घाट चढताना बसची दमछाक होत असून, प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.



### ‘शिवशाही’ कालबाह्य होण्याच्या वाटेवर

अलिबाग आगारात सध्या ११ शिवशाही बसेस कार्यरत आहेत. प्रामुख्याने अलिबाग-पनवेल विना थांबा सेवेसाठी त्यांचा वापर होतो; तर त्यापैकी एक बस पुणे मार्गावर धावते. मात्र, बहुतांश बसेसनी आठ लाख किलोमीटरपेक्षा अधिक अंतर कापले असून, त्या वारंवार बिघडत आहेत. एसी बंद पडल्यावर प्रवाशांचा जीव कोंडतो; इंजिन एसीचा भार पेलत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे या बसेस लवकरच निम-आराम किंवा साध्या बसमध्ये रूपांतरित करण्याची शक्यता व्यक्त होत आहे. एकेकाळी ‘लक्झरी’ म्हणून ओळखली जाणारी ‘शिवशाही’ आता कालबाह्य होण्याच्या वाटेवर असल्याचे चित्र आहे.

### डिजीटल तिकिट मशीनचा बोजवारा



कामकाज गतिमान करण्यासाठी महामंडळाने कागदी तिकिटाऐवजी डिजीटल मशीनचा वापर सुरू केला. एबीक्स कॅश कंपनीची ही तिकीट यंत्रे असल्याची माहिती आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून या मशीन वारंवार बिघडत असल्याची तक्रार आहे. तिकीट प्रिंट होण्यास विलंब, बटणे दाबताना अडचणी, चार्जिंगची समस्या, मशीन गरम होणे, अशा त्रुटींमुळे वाहकांची अडचण वाढली आहे. प्रवाशांसमोर उभे राहून स्पष्टीकरण देताना कर्मचाऱ्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

अलिबाग आगारातून दररोज सकाळी सहा वाजता पुण्यासाठी बस सुटते. पूर्वी या मार्गावर निम-आराम बस धावत होती; मात्र नवीन ‘शिवशाही’ दाखल झाल्यानंतर तिचीच नियुक्ती करण्यात आली. सुरुवातीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे. संबंधित बसने आठ लाख किलोमीटरचा टप्पा ओलांडला असून, तिची कार्यक्षमता •> पान २ वर

शिखर बँक घोटाळा प्रकरण

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, आ. रोहित पवारांना दिलासा

**मुंबई :** अनेक वर्षांपासून गाजत असलेल्या २५ हजार कोटी रुपयांच्या कथित महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससीबी) अर्थात शिखर बँक घोटाळा प्रकरणात मोठी कायदेशीर घडामोड घडली आहे. मुंबईतील विशेष न्यायालयाने आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट स्वीकारला असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, आमदार रोहित पवार यांच्यासह एकूण ७० जणांना मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रकरणात मुंबई पोलिसांनी दाखल केलेल्या मूळ गुन्ह्याच्या आधारे अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा नोंदवला होता. मात्र, आर्थिक गुन्हे शाखेला तपासादरम्यान ठोस पुरावे आढळले नाहीत.



# सुरूच्या बनात रात्रीस खेळ चाले



- रेवदंडा किनारी मद्यपींचे अड्डे वाढले
- अनधिकृत टपऱ्या हटवण्याची ग्रामस्थांची मागणी

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

**रेवदंडा-हरेश्वर मार्गावरील समुद्रकिनाऱ्यालगत स्थानिक व पर्यटकांसाठी उभारलेले सुरू आणि माडाचे बन सध्या रात्री मद्यपींच्या अड्ड्यांत रूपांतरित झाले आहेत. उशिरापर्यंत सुरू असलेल्या अनधिकृत टपगऊ्घअमुळे येथे दारू-बिअरची मैफिल रंगत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असू संबंधित टपर्या तात्काळ हटवाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.**

रात्री उशिरापर्यंत सुरू व माड बनात दारू व बिअरचे सेवन, धुडगूस आणि आरडाओरडा सुरू असतो. सकाळी या परिसरात मद्याच्या बाटल्यांचा खच, चकण्यांचा कचरा आणि घाण साचलेली दिसते. बसण्यासाठी ठेवलेल्या बाकांवरही बाटल्या व कचरा टाकलेला आढळतो. परिणामी, विरंगुळ्यासाठी येणाऱ्या स्थानिक, पर्यटक व पाहुण्यांचा हिरमोड होत आहे. महिलांसाठी तर या भागात रात्री वावर असुरक्षित झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या परिसरात बाहेरील व्यक्तींनी टपरी व्यवसाय सुरू केला असून, सिगारेट, तंबाखू, गुटखा, थंडपेय आदींची विक्री रात्री उशिरापर्यंत केली जाते. टपऱ्या उघड्या असल्याने विविध ठिकाणांहून मद्यपी व धूम्रपान करणारे येथे जमा होतात आणि रात्री उशिरापर्यंत गर्दी असते. काही टपऱ्यांसाठी पक्के बांधकाम केल्याचेही दिसत असून, त्या अनधिकृत असल्याचा आरोप आहे.

यासंदर्भात रेवदंडा पोलीस ठाण्याला अनेकदा तक्रारी देण्यात आल्याचे ग्रामस्थ सांगतात; मात्र रात्री गस्त अपुरी असल्याने मद्यपींना मोकळे रान मिळत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. महावितरणकडून वीजपुरवठा दिला गेल्याने स्थानिकांवर अन्याय झाल्याचीही भावना व्यक्त केली जाते.

रेवदंडा ग्रामपंचायतीकडून या टपऱ्यांना कोणतीही परवानगी देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. केवळ फिरत्या हातगाड्यांना व्यवसायाची मुभा असल्याचे सांगण्यात येते. तरीही पक्क्या पायावर उभारलेल्या टपऱ्या परवानगीशिवाय कशा सुरू आहेत, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. सुरू-माडाच्या बनातील बेकायदेशीर टपऱ्या तात्काळ हटवून परिसरातील मद्यपींचे अड्डे बंद करावेत व पर्यटकांसाठी सुरक्षित, स्वच्छ वातावरण निर्माण करावे, अशी ठाम मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## पीकअपच्या धडकेत युवक ठार

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील बोरघाटात अंडा पॉईंड जवळ पीकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकी वरील युवकाचा जागीच मृत झाला असून, दुसरा युवक जखमी झाला आहे.

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून लोणावळाहून आसल धनगरवाडा येथील अनंता शिंगाडे आणि दत्ता शिंगाडे हे दोन युवक आपल्या दुचाकीवरून खोपोलीकडे जात असताना तो दस्तुरी येथील ब्रिजखाली आले असता खोपोलीकडून भरधाव वेगात जाणाऱ्या पीकअप टेम्पोने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील दत्ता शिंगाडे (२४, रा. आसल धनगरवाडा नेरळ) याच्या डोक्याला आणि पोटाला जबर मार लागून त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर, दुसरा युवक जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार चालू आहेत. मयत दत्ता शिंगाडे याच्या अचानक निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, माथेरान परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# जिल्ह्यात होळीसाठी ४१ जादा एसटी गाड्या धावणार

- मुंबई, ठाणे, बोरिवलीसह प्रमुख ठिकाणांचा समावेश
- आठही आगारांचा समन्वय

**। पेण । प्रतिनिधी ।**

कोकणातील गणेशोत्सवानंतर सर्वाधिक महत्त्वाचा मानला जाणारा शिमगा-होलिकोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, गावाकडे जाणाऱ्यांची लगबग सुरू झाली आहे. ही वाढती गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) ने २७ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत रायगड जिल्ह्यासाठी एकूण ४१ जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. रायगड जिल्ह्यातील आठही आगारांचा परस्पर समन्वय साधत मुंबई, ठाणे, नालासोपारा, बोरिवली, भांडुप आदी महत्त्वाच्या ठिकाणांहून विशेष फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे.

**रेल्वेची मर्यादा, एसटीचाच आधार**

मुंबईहून कोकणात जाण्यासाठी रेल्वेची सुविधा अपेक्षेप्रमाणे उपलब्ध नसल्याने नोकरी-व्यवसायानिमित्त मुंबईत स्थायिक झालेल्या कोकणी बांधवांसाठी एसटीची 'लालपरी' हा परवडणारा आणि विश्वासार्ह पर्याय ठरतो. त्यामुळे होळी आठवडाभरावर येताच आगाऊ आरक्षणासाठी प्रवाशांची लगबग सुरू झाली आहे. हीच वाढती मागणी लक्षात घेऊन एसटी



प्रशासनाने अतिरिक्त फेऱ्यांचे नियोजन केले आहे.

उत्सवानंतर रायगडातून मुंबईकडे परतीसाठी ७ जादा गाड्या, रायगड जिल्हांतर्गत सेवा २७ जादा गाड्या अशा एकूण ४१ जादा गाड्या प्रवाशांच्या सेवेत धावणार आहेत. यामुळे मुंबई, ठाणे परिसरातून गावाकडे जाणाऱ्या कोकणी प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**मुंबईकडून रायगडकडे विशेष फेऱ्या**

(२७ फेब्रुवारी ते १ मार्चदरम्यान, अन्य नमूद तारखा वगळता) बोरिवली-महाड, भांडुप- महाड, नालासोपारा-खुटील, मुंबई-गोरेगाव (२८ फेब्रुवारी ते २ मार्च), बोरिवली-खामगाव, नालासोपारा-श्रीवर्धन, बोरिवली-श्रीवर्धन.

**रायगडातून मुंबईकडे**

**परतीच्या फेऱ्या**

महाड-पनवेल (विनवाहक/शटल) ५ फेऱ्या, अलिबाग-पनवेल (शटल) ३ फेऱ्या, पेण-पनवेल १ फेरी, पेण-खोपोली १ फेरी, पेण-नागोठणे १ फेरी, पेण-अलिबाग १ फेरी, श्रीवर्धन-पनवेल २ फेऱ्या, कर्जत-अलिबाग ३ फेऱ्या, रोहा-पनवेल ३ फेऱ्या, मुरुड-अलिबाग १ फेरी, मुरुड-पनवेल २ फेऱ्या, माणगाव-पनवेल (विनवाहक/शटल) ५ फेऱ्या अशा एकूण २७ फेऱ्या होणार आहेत. होळी सणासाठी गावाकडे जाणाऱ्या प्रवाशांची संभाव्य गर्दी लक्षात घेता एसटी प्रशासनाने केलेले हे नियोजन महत्त्वाचे मानले जात आहे. आगाऊ आरक्षण करून प्रवास करण्याचे आवाहनही प्रवाशांना करण्यात आले आहे.

# टोलनाक्यावर सुमारे ९०० किलो गोमांसासह स्कॉर्पिओ जप्त



- खालापूर पोलिसांची कडक कारवाई
- दोघांवर गुन्हा दाखल

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

शिर्डी-श्रीरामपूर येथून मुंबईकडे जाणाऱ्यासुमारे९००किलोगोमांसाची तस्करी करणारी स्कॉर्पिओ कार खालापूर टोलनाक्यावर पकडण्यात आली. शनिवारी (दि. २८) पहाटे ही कारवाई करण्यात आली असून, खालापूर पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईबद्दल स्थानिक स्तरावर समाधान व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिर्डी-श्रीरामपूर परिसरातून रात्री सुमारे २ वाजता गोमांस घेऊन एक आलिशान स्कॉर्पिओ कार मुंबईकडे निघाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सावरोली टोलनाक्यावर सापळा रचण्यात आला. पहाटे सुमारे ६ वाजता संशयित स्कॉर्पिओ (एमएच ५५ बी ७५५५) टोलनाक्यावर आल्यानंतर ती अडवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनातून अंदाजे ९०० किलो गुरांचे मांस आढळून आले. त्यानंतर वाहनासह दोन जणांना खालापूर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. चौकशीदरम्यान संबंधित मांस शिर्डी-श्रीरामपूर येथून मुंबईतील गोवंडी परिसरात नेण्यात येत असल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी वाहन जप्त करण्यात आले असून दोघांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सुलेमान कुरेशी हा मुख्य सूत्रधार असल्याची माहिती प्राथमिक चौकशीतून समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले.

जप्त केलेले मांस नियमानुसार दफन करण्यात आले असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# केएमसी महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा

**वैज्ञानिक राजेश पवारांनी केले संस्थाचाकांचे कौतुक**

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

संपूर्ण देशभरात राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. देशाचे महान शास्त्रज्ञ सी. व्ही. रामन यांनी २८ फेब्रुवारी रोजी जी किमया केली होती, त्यामुळे त्यांना नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले म्हणूनच या दिवशी देशभरातील शाळा, महाविद्यालयात विज्ञान दिन साजरा केला जातो. त्यानुषगांने के.एम.सी. महाविद्यालयातील बीएसी,एमएससीच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर प्रोजेक्ट तयार केले.या कार्यक्रमासाठी वैज्ञानिक G, HEMRL-DRDO, पुणे, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार राजेश पवार उपस्थित होते. छोटी संस्था असतानाही विद्यार्थी घडविण्यासाठी केटीएसपी संस्थाचाक मेहनत असल्याने राजेश पवार यांनी कौतुक केले.



के.एम.सी. महाविद्यालयात विज्ञान दिनानिमित्ताने आयोजित विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन वैज्ञानिक राजेश पवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी केटीएसपी संस्थेचे कार्यवाह किशोर पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ.प्रा. विकास सुर्यवंशी, संचालक भास्कर लांडगे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी देशाचे महान शास्त्रज्ञ सी.व्ही. रामन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

के.एम.सी.महाविद्यालयात दरवर्षी विज्ञान दिन साजरा करताना वेगवेगळी थीम असते. यावर्षी विज्ञानामध्ये स्त्रीचा सहभाग आणि स्त्रीच्या सहभागामुळे विकसीत भारत करण्यासाठी काय योगदान देता येईल, अशी थीम ठेवली असल्याचे प्राचार्य डॉ. प्रा. विकास सुर्यवंशी यांनी प्रास्ताविकातून सांगितले.

भारत देश हा एक तरुणांचा देश म्हणून समजला जातो त्यामध्ये महिला वर्गाला करण्यापासून ते अनेक क्षेत्रांमध्ये अतिशय चांगली संधी त्यानिमित्ताने दिली जाते आहे. विज्ञान दिनानिमित्ताने विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी केलेले प्रेझेंटेशन पाहिलं होतं. अतिशय आमच्या विद्यार्थ्यांनी चांगले पोस्टर बनवलेले आहेत. चांगली माहिती त्यांनी आम्हाला सांगितली. असे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आपण राबवले तर विद्यार्थ्यांनी त्याच्या त्या क्षेत्रामध्ये आवड निर्माण होईल आणि आपण काहीतरी विद्यार्थ्यांना नवीन नेतृत्व हे समाधान आपल्याला अशा उपक्रमांसाठी संस्था तुमच्या पाठीमागे राहील, असे अश्वासन कार्यवाह किशोर पाटील यांनी दिले.

वशिल्याशिवाय नोकरी मिळत नाही हा न्यूनगंड विद्यार्थ्यांनी पहिल्यांदा मनातून टाका.तुमच्या कुवतींनुसार नोकरी मिळू शकते. भारतात स्कील डेव्हलपमेंटसाठी शासन गावपातळीवर जनजागृती करीत आहे. तुम्हीतर बीएससी, एमएसीचे विद्यार्थी आहात, चांगले वैज्ञानिक प्रयोग करून देशाचे नाव उज्ज्वल करू शकता, अशा शब्दात विद्यार्थ्यांना वैज्ञानिक राजेश पवारांनी मार्गदर्शन केले.

पान १ वरून

## भरधाव कारने २० प्रवाशांना चिरडले

(४४, रा. कांदिवली मुंबई), पूजा सुरेश येलकर (२६, रा. महाड), कस्तुब शशिकांत लांबे (१६, रा. मंडणगड), सुरेश सखाराम येलकर (५६, रा. महाड), जान्हवी विवेक रेशीम (३६, रा. म्हाप्रळ-मंडणगड), निर्मला रामदास सातगोडे (५३, रा. विरार-पालघर), प्रगती हिरलेकर (३५, रा. म्हाप्रळ-मंडणगड), साहिल केंद्रे (१८, रा. महाड), सेजल केंद्रे (२०, रा. महाड), देवांक निलेश रेशीम (१७, रा. म्हाप्रळ-मंडणगड) आणि श्रावणी विवेक रेशीम (१८, रा. म्हाप्रळ-मंडणगड) हे जखमी झाले आहेत.

सर्व जखमींना तातडीने माणगाव येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारांनंतर प्रकृती गंभीर असलेल्या चार जखमींना अधिक उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले. रुग्णालयात नातेवाईकांची एकच गर्दी उसळली होती. अपघाताची माहिती मिळताच कुटुंबियांनी रुग्णालयाकडे धाव घेतली. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू, तर काही जखमी वेदनेने तडफडत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

घटनेची माहिती मिळताच शिवसेनेचे युवा जिल्हाप्रमुख विपुल उभारे व शिवसैनिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. जखमींना धीर देत त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यात आला. आपत्कालीन यंत्रणांनीही तत्परता दाखवत जखमींना तातडीने उपचारासाठी हलविले. सध्या होळी सणाच्या पार्श्वभूमीवर कोकणातून मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ सुरू आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव, इंदापूर आणि लोणेरे परिसरात सातत्याने वाहतूक कोंडी होत असते. वाढती वाहतूक आणि वेगामुळे अपघातांचे प्रमाण चिंताजनक बनले आहे. या पार्श्वभूमीवर महामार्गावर वाहन चालविताना वेगमर्यादा पाळणे, सुरक्षित अंतर राखणे आणि विशेषतः रात्रीच्या वेळी अधिक खबरदारी घेणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, या भीषण अपघाताप्रकरणी माणगाव पोलीस ठाणे अधिक तपास करत असून, कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पहाटेच्या या थरारक अपघाताने अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, सणाच्या आनंदावर काळी छाया पडली आहे. महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## टँकरची कारला धडक; क्लिनर जागीच ठार

(क्र. एमएच ४८ एजी ५३०७) त्यांच्या कारला जोरदार धडक दिली.

सदर टँकर चालक स्वप्निल शिंदे यांच्या ताब्यात होता. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की, टँकरमधील क्लिनर सुशांत अनंत शेळके (३९, रा. इंदापूर) यांना गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर त्यांना तात्काळ उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक किरवले करीत आहेत. अपघाताचे नेमके कारण काय, वाहनांचा वेग किती होता आणि निष्काळजीपणा झाला का, याबाबत पोलीस सखोल चौकशी करीत आहेत. मध्यरात्री घडलेल्या या दुर्घटनेमुळे महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, वाहनचालकांनी वेगमर्यादा पाळून सावधगिरी बाळगावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## झाडाला धडकून विमान कोसळले

अंतरावर कोसळल्याची नोंद आहे. धडकेनंतर मोठा स्फोट झाला आणि त्यामुळे उड्डाण माहिती नोंदक तसेच कॉकपीट ध्वनिमुद्रक यांचे नुकसान झाले. अहवालानुसार अपघात एका कारणामुळे नव्हे, तर हवामान, पायाभूत सुविधा आणि कार्यवाहीतील निर्णय यांच्या एकत्रित परिणामामुळे घडल्याचा तात्पुरता निष्कर्ष काढण्यात आला आहे. अंतिम निष्कर्ष मात्र कॉकपीट ध्वनिमुद्रक (सीव्हीआर) आणि उड्डाण माहिती नोंदक (एफडीआर) यांच्या सविस्तर विश्लेषणानंतरच स्पष्ट होणार आहे.

प्राथमिक तपासात काही संभाव्य कारणांची नोंद करण्यात आली आहे. त्यामध्ये नियमांनुसार अपेक्षित किमान दृश्यमानतेपेक्षा कमी दृश्यता, नियंत्रित नसलेले विमानतळ, टेबल-टॉप प्रकारची धावपट्टी, फिकट धावपट्टी चिन्हांकन, धावपट्टीवर सैल खडी, अपुरी कुंपण व्यवस्था, दृश्य भ्रम तसेच हवामानविषयक माहितीची मर्यादित अचूकता यांचा समावेश आहे. अपघातावेळी विमानाने तात्काळ नियंत्रण गमावल्याचे संकेतही अहवालात देण्यात आले आहेत.

दरम्यान, 'ब्लॅक बॉक्स'मधील माहिती सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यासाठी अमेरिकन तज्ज्ञांची मदत घेण्यात येणार आहे. संबंधित उपकरण तयार करणाऱ्या अमेरिकन कंपनीचे पथक भारतात येऊन तांत्रिक तपास करणार आहे. अपघातानंतर विविध पातळ्यांवरून वेगवेगळे दावे करण्यात आले होते. काहींनी घातपाताचा संशय व्यक्त केला होता. या पार्श्वभूमीवर जाहीर झालेला प्राथमिक अहवाल महत्त्वाचा मानला जात असला, तरी अपघाताचे नेमके कारण समोर येण्यासाठी अंतिम सविस्तर अहवालाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## एलईडी मासेमारी बोटी जप्त

ह. कांबळे (पोलीस निरीक्षक, मुरुड), आर.बी. रसेडे (सहाय्यक पोलीस निरीक्षक), साईनाथ गोविंद दळवी (पोलीस उपनिरीक्षक, नौका विभाग, आगरदांडा), किरप्पा दत्तात्रेय गायकवाड, नागेश मारुती भवर (सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक) आणि अक्षय परंडवाल (पोलीस शिपाई) यांचा सहभाग होता. दि. २७ फेब्रुवारी रोजी रात्री ९.४५ वाजल्यापासून ते दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत 'सावित्री' या शासकीय बोटीने समुद्रात गस्त घालत असताना मुरुड समुद्रातील नानवेल दीपगृह परिसरात अंदाजे १० ते १५ किलोमीटर अंतरावर दोन बोटी संशयास्पदरित्या मासेमारी करताना आढळल्या. तपासणी केली असता त्या एलईडी उपकरणांच्या सहाय्याने बेकायदा मासेमारी करत असल्याचे स्पष्ट झाले. तात्काळ दोन्ही बोटी ताब्यात घेऊन आगरदांडा नौका विभाग येथे आणून जप्त करण्यात आल्या.

जप्त करण्यात आलेल्या बोटींपैकी 'धनलक्ष्मी' या बोटीचा क्रमांक आय.एन.डी.एम.एच.०३एम.एम.४०९४ असून, त्यामध्ये बाहेरील १० एलईडी दिवे, पाण्याखालील २ एलईडी दिवे व १ जनित्र आढळून आले. तसेच 'वैष्णवी' या बोटीचा क्रमांक आय.एन.डी.एम.एच.०३एम.एम. ४१९७ असून, त्यामध्ये बाहेरील ८ एलईडी दिवे, पाण्याखालील २ एलईडी दिवे व १ जनित्र जप्त करण्यात आले.

या कारवाईदरम्यान मन्सुर हम्मीद सोलकर (३६, रा. भरडखोल, ता. श्रीवर्धन), वैष्णव उद्धव वाघे (२२), प्रमोद माया चौलकर (४१, रा. श्रीवर्धन कोळीवाडा) आणि चंद्रकांत बाळाराम पाटील (६०, रा. जीवनाबंदर, ता. श्रीवर्धन) हे इसम आढळून आले. समुद्रात एलईडी दिव्यांच्या साहाय्याने मासेमारी करणे बेकायदा असून, समुद्री जैवसंपत्तीला मोठा धोका निर्माण होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, समुद्रात कोणीही इसम बेकायदा मासेमारी करताना आढळल्यास तात्काळ मुरुड पोलीस ठाणे किंवा नौका विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## न्यायालयाचा राज्य सरकारला दणका

ग्रामविकास विभागाच्या अधिसूचनेनुसार, मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून तसेच उपसरपंच व सदस्यांना प्रशासकीय समिती म्हणून नियुक्त करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. या निर्णयाविरोधात किशोर सुतार आणि इतरांनी खंडपीठात याचिका दाखल करून आव्हान दिले होते.

न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठाने याचिकांवर सुनावणी करताना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सरपंचांची प्रशासक म्हणून नियुक्ती करू नये, असे स्पष्ट निर्देश दिले. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यात ज्या सरपंचांनी आधीच प्रशासक म्हणून पदभार स्वीकारला आहे, त्यांना कोणतेही आर्थिक अधिकार वापरता येणार नाहीत, असेही आदेश देण्यात आले आहेत.

याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. देवदत्त पालोदकर यांनी न्यायालयात मांडले की, राज्यघटनेच्या कलम २४३ (ई) नुसार ग्रामपंचायतीची पाच वर्षांची मुदत संपल्यानंतर सरपंच, उपसरपंच किंवा सदस्यांना प्रशासक म्हणून अधिकार देता येत नाहीत. अशी नियुक्ती केल्यास मुक्त, पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. तसेच ही अधिसूचना काढताना राज्य निवडणूक आयोगाने कोणतीही प्रशासकीय अडचण नमूद केलेली नाही. केवळ सोयीसाठी अशा प्रकारचे निर्णय घेता येत नाहीत, असा युक्तिवादही करण्यात आला.

सरकारी वकील अमरजीत सिंह गिरासे यांनी न्यायालयात दिलेल्या माहितीनुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील तब्बल ७५३ ग्रामपंचायतींवर सरपंचांनी प्रशासक म्हणून पदभार स्वीकारला आहे, तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अद्याप कोणतीही नियुक्ती करण्यात आलेली नव्हती. यानंतर खंडपीठाने दोन्ही जिल्ह्यांतील परिस्थितीची सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश देत संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे.

उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्यभरातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवरील प्रशासक नियुक्तीचा मुद्दा अधिकच तापला असून, राज्य सरकारला आपल्या भूमिकेचे पुनर्विचार करावे लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**काय म्हणाले न्यायालय?**

राज्यघटनेच्या कलम २४३ (ई) नुसार ग्रामपंचायतीची पाच वर्षांची मुदत संपल्यानंतर विद्यमान सरपंच, उपसरपंच किंवा सदस्यांना प्रशासक म्हणून नियुक्त करता येत नाही. अशा नियुक्त्या केल्यास मुक्त व निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो, असे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने नियुक्ती प्रक्रियेला स्थगिती दिली आहे.

## श्रीवर्धनमध्ये भूमाफियांचे थैमान

आल्याचे बोलले जात आहे.

अनेक ठिकाणी शासकीय जमिनी उत्खनन करून सपाट करून त्या हडप करण्याचा प्रकारदेखील काही भूमाफियांकडून सुरू आहे. या सर्व प्रकाराकडे महसूल प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याची बाब समोर येत आहे. श्रीवर्धन तालुक्यात पुणे, मुंबईसारख्या मोठ्या शहरातील अनेक धनदांडगे जमिनी खरेदी करत आहेत. जमिनी खरेदी केल्यानंतर सदर जागा चढ-उताराची असल्यास, त्या ठिकाणी अनधिकृतपणे उत्खनन करून जागा सपाट करण्यात येते. तर, काही ठिकाणी खोलगट भाग असल्यास त्या ठिकाणी मातीचा भराव करण्यात येतो.

यावेळी भरावासाठी कोणत्याही प्रकारची रॉयल्टी किंवा शासनाला अधिकृत फी न भरता उत्खनन केले जात असल्याची बाब समोर आली आहे. याबाबत महसूल विभागाकडे तक्रार केल्यानंतरसुद्धा महसूल विभागाकडून कारवाई करण्यासाठी टाळाटाळ होत असल्याची चर्चा आहे. श्रीवर्धन शहरातदेखील अशाप्रकारे काही ठिकाणी भरावाची कामे सुरू आहेत. श्रीवर्धन शहरात असलेल्या मठाच्या स्मशानभूमीजवळ ९६ गुंठे शासकीय जागेवरदेखील काही जणांनी अनधिकृतपणे कब्जा करण्यासाठी काम सुरू केलेले पाहायला मिळत आहे. शनिवार व रविवार सुट्टीचा दिवस असल्यामुळे महसूल प्रशासनाला सुट्टी असते. याच गोष्टीचा फायदा भूमाफियांकडून उचलला जातो व बहुतेक वेळेला सुट्टीच्या दिवशी अशा प्रकारची कामे केली जात असल्याची चर्चा आहे.

समुद्रकिनाऱ्यालगत भरती रेषेपासून ५० मीटरच्या आतील जागेमध्येसुद्धा अनेक धनदांडगे भराव करत असून, त्या ठिकाणी मोठ मोठी रिसॉर्ट व बांधकामे करण्यात येत आहेत. दिवेआगर, आदगाव, सर्वे, भरडखोल, शेखाडी याठिकाणी अनेक कामे झाली आहेत. याबाबत महसूल प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रार करूनसुद्धा कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. तरी या सर्व प्रकाराकडे रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे त्याचप्रमाणे राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे लक्ष देतील का? अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## खारफुटीवर बेकायदा भराव

व यार्ड मालक खाडीकिनाऱ्यालगतची खारफुटी हटवून त्या जागेवर मातीचा भराव करत आहेत. यासाठी स्थानिक पातळीवरील काही घटकांना हाताशी धरल्याचीही चर्चा आहे. तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून 'अज्ञात व्यक्तींविरुद्ध' औपचारिक कारवाईचा दिखावा केला जातो, मात्र प्रत्यक्षात बेकायदेशीर कामे सुरूच असल्याचा आरोप आहे.

उरण तालुका औद्योगिकीकरणाच्या वेगात झपाट्याने बदलत असताना नैसर्गिक संपत्तीवर गदा येत असल्याचे चित्र आहे. खारफुटी ही किनारपट्टीची नैसर्गिक ढाल मानली जाते. चक्रीवादळ, त्सुनामी आणि भरती-ओहोटीच्या लाटांपासून मानवी वस्त्यांचे संरक्षण करणे, जमिनीची धूप रोखणे, कार्बन डायऑक्साइड शोषून पर्यावरण संतुलन राखणे आणि मासे-पक्ष्यांसाठी प्रजनन केंद्र म्हणून कार्य करणे, अशा अनेक पर्यावरणीय भूमिका ती बजावते. अशा उपयुक्त वनक्षेत्रावरच अतिक्रमण होत असल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

यासंदर्भात उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्याशी संपर्क साधला असता, 'हे काम माझ्या कार्यक्षेत्रातील नाही,' असे त्यांनी सांगितल्याची माहिती मिळाली. मात्र महसूल, वन, खारलँड आणि सिडको विभागांनी समन्वयाने तात्काळ कारवाई करून बेकायदा भराव थांबवावा, अन्यथा उरणमधील खारफुटीचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## क्षमता संपलेली 'शिवशाही' रस्त्यावर

घटल्याची चर्चा आहे. घाट चढताना इंजिनची ताकद कमी पडणे, एसी बंद पडणे, दरवाजे लॉक होणे, असे प्रकार वारंवार घडत असल्याने प्रवाशांचा रोष चालक-वाहकांना सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, मुंबई-पुणे महामार्गावरील शिंग्रोबा घाट चढताना बसची क्षमता संपते, असे प्रत्यक्ष अनुभव सांगितले जात आहेत. तरीही मुंबईतील प्रादेशिक नियंत्रण समितीतील एका अधिकाऱ्याच्या भूमिकेमुळे हीच बस पुणे मार्गावर कायम ठेवली जात असल्याचा आरोप आहे. सकाळी सहा वाजता अलिबागहून निघालेली बस पुण्यावरून अकरा वाजता परतीस सुटते; मात्र घाटमाथ्यावर बिघाड झाल्यास वेळापत्रक कोलमडते. परिणामी प्रवाशांचा खोळंबा आणि कर्मचाऱ्यांवर ताण वाढतो. या मनमानी कारभारामुळे आगारातील कर्मचाऱ्यांत तीव्र नाराजीचे सूर उमटत आहेत.

एकूणच, प्रवाशांच्या सुरक्षिततेपेक्षा वरिष्ठांचा अट्टाहास महत्त्वाचा ठरत असल्याची टीका होत असून, कालबाह्य होत चाललेल्या 'शिवशाही'ला पुणे मार्गावरून तातडीने हटवावे आणि पर्यायी सक्षम बसची व्यवस्था करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

# प्राचीन मैदानी खेळ नामशेष होण्याच्या मार्गावर



■ आट्या पाट्या खेळाला उतरती कळा
■ होळीच्या सणाला अनन्य साधारण महत्त्व

। उरण । विठ्ठल ममताबादे ।

होळी सण जवळ आली की सर्वांना आट्या पाट्या खेळाची आठवण होते. हा खेळ प्राचीन काळापासून चालत आला असून या खेळाला अनन्य साधारण असे महत्व आहे. परंतु, सध्याच्या २१व्या शतकात जीवघेण्या स्पर्धेच्या व धक्का धक्कीच्या युगात हा खेळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

आट्यापाट्या हा खेळ महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये (किलिथट्टू नावाने) लोकप्रिय आहे. हा खेळ शारीरिक चपळाई व धोरणात्मक कौशल्याचा प्राचीन भारतीय मैदानी खेळ आहे. दोन संघांमध्ये खेळल्या जाणाऱ्या या खेळात, एका संघाला सूरपाटी व इतर नऊ आडव्या पाट्यांतून (गाळ्यांतून) बचाव करत, प्रतिस्पर्ध्यांच्या अडथळ्यांना हुलकावणी देऊन शेवटच्या लोणपाटीपर्यंत पोहोचायचे असते. जिल्ह्यासह उरण तालुक्यात पूर्वी मोठ्या उत्साहाने आट्यापाट्या खेळातून होळी सण साजरा केला जायचा. मात्र, आता काही विशिष्ट ठिकाणे सोडली तर कुठेही हा खेळ खेळताना दिसत नाही.

पूर्वी उरण तालुक्यात हा खेळ होळीच्या दहा दिवस अगोदर पासून जिथे होळी जाळली जाते त्या ठिकाणी खेळला जात होता. आता मात्र नवीन पिढीला हा खेळ माहित नसल्याने तसेच मैदानी खेळापासून आजची लहान मुले दूर जात असल्याने सध्या हा खेळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. पूर्वी या खेळाला राजश्रय होता म्हणून हा खेळ टिकून राहिला. आता मात्र या खेळाला शासकीय अनुदान व सहकार्यावर अवलंबून राहावे लागते. भारतीय संस्कृतीतील या खेळाला नव संजीवनी प्राप्त करून देण्याची गरज निर्माण झाली आहे. जास्तीत जास्त प्रमाणात या खेळाचे सर्वत्र आयोजन केल्यास, जनजागृती केल्यास निश्चितच या खेळाला चांगले दिवस येतील, असे आट्या पाट्या प्रेमिंकडून बालेले जात आहे.

### खेळाचा इतिहास

हा खेळ अत्यंत प्राचीन असून महाराष्ट्रात संत तुकारामांच्या काळापासून प्रचलित आहे. हा खेळ मुख्यत्वे भारतातील काही ग्रामीण भागात, विशेषतः होळी किंवा इतर सणांच्या वेळी अत्यंत उत्साहाने खेळला जातो. महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये बऱ्यापैकी लोकप्रिय आहे. या खेळात गुंतागुंतीचे नियम आहेत. तामिळनाडूमधील किलिथट्टू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कृषी प्रदेशातून उगम पावलेला हा खेळ बऱ्याच काळापासून धोरणात्मक विचारसरणी आणि शारीरिक चपळतेची चाचणी म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रात आट्यापाट्या म्हणून हा खेळ ओळखला जातो. महाराष्ट्रात हा खेळ पूर्वी भांडणाचा खेळ म्हणून प्रसिद्ध होता. प्रत्येक राज्यात व देशात या खेळाला वेगवेगळे नाव आहेत. गुजरात राज्यात आटा पाता, खरो पाट, लुणी पाट, तामिळनाडू मध्ये किलीथट्टू, धट्टुकडा, उप्पू कोड्डू, उप्पू पटाई, बंगालमध्ये डोरिया बांध, महाराष्ट्र मध्ये सुरपट्या, आत्या पत्या, आट्या पाट्या, सारगरी, सरमणी, पंजाबमध्ये लोणापती, सुरपती चिक्का, यूरोप मध्ये ढोंगाचा खेळ, अतिरेक्यांचा पाठलाग या नावाने हा खेळ परिचित आहे.

### खेळाची सविस्तर माहिती

**मैदान आणि रचना:** हा खेळ सपाट मैदानात खेळला जातो. शहरात मैदानात हा खेळ खेळला जातो. त्यात मध्यभागी एक लांब रेषा (मृदंगपाटी किंवा सूरपाटी) असते आणि तिला छेदून ९ आडव्या पाट्या (कप्पे) असतात. खेळाच्या सुरुवातीच्या पाटीला चांभारपाटी तर शेवटच्या पाटीला लोणपाटी म्हणतात.

**खेळाडू आणि संघ:** खेळामध्ये दोन संघ असतात. प्रत्येक संघात साधारणपणे ९ खेळाडू असतात. त्यातील एक संघ पाटी धरणारा आणि दुसरा संघ खेळणारा असतो. त्यात एकाची बचावाची भूमिका तर दुसऱ्याची आक्रमणाची भूमिका असते.

**खेळाचे नियम आणि उद्देश:**

बचाव भूमिकेत असलेले खेळाडू फक्त उभ्या रेषेवर (सूरपाटी) पाय ठेवून दोन्ही बाजूंना उड्या मारून किंवा धावून अटॅकिंग खेळाडूंना आडव्या पाट्या ओलांडण्यापासून रोखतात. आक्रमणच्या भूमिकेत असणारे खेळणारे खेळाडू हुलकावणी देऊन, वेगाने धावत एक-एक पाटी पार करून लोणपाटीपर्यंत जातात.एक एक चौकोन पार करत पुढे जातात व शेवटी आपले उद्दिष्टे साध्य करतात.

**बाद:** जर पाटी धरणाऱ्या खेळाडूने धावणाऱ्या खेळाडूला स्पर्श केला, तर तो खेळाडू बाद होतो. त्यामुळे अत्यंत एकाग्रतेने हा खेळ खेळला जातो.

**गुण:** जो खेळाडू नऊही पाट्या पार करून लोणपाटीपर्यंत पोहोचतो आणि पुन्हा सुरक्षित माघारी फिरतो, त्या संघाला गुण मिळतात.

**फायदे:** या खेळामुळे मुलांमध्ये चपळता, वेग, निर्णयक्षमता आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. या खेळामुळे शरीराचा विशिष्ट व्यायाम तर होतोच शिवाय एकाग्रता सुद्धा वाढीस लागते. मनोरंजन आणि व्यायामाव्यतिरिक्त, हा खेळ वैयक्तिक वेगवानपणा आणि सामूहिक संघ कामगिरीचे उत्तम संयोजन आहे.

## निवडक



### माथेरानमधील दरोडा प्रकरणाचा छडा

**नेरळ :** माथेरान शहरात १६ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास छत्रपती शिवाजी रोड परिसरातील वन ट्री हिल पॉइंटजवळ असलेल्या कदम टी स्टॉलमध्ये थरारक जबरी चोरीची घटना घडली होती. या दरोडा प्रकरणी माथेरान पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला कर्जत आणि नेरळ पोलीस ठाण्यातील तपासी पथकाने तांत्रिक तपास करीत या गुन्ह्याची उकल केली आहे. दरम्यान, हा गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीसांच्या पथकाकडून दरोडेखोरांविषयी काहीएक सुगावा नसताना गोपनीय बातमीदार आणि तांत्रिक विश्लेषणाद्वारे त्यांचा शोध घेण्यात आला. त्यातील पहिला आरोपी पुष्पेन्दर राम धुलारी याला थेट दिल्लीतील त्याच्या राहत्या घरातुन ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने त्याचे साक्षीदार वसीम महंमद मेवाती व शिवम् बालवीर सिंग यांची माहिती दिली. त्यानंतर उत्तर पेदेश येथील वसीम महंमद मेवाती याला माथेरान पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून तब्बल ५ लाख ६० हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.



### श्रीवर्धनमधील पर्यटक निवास धूळखात

**श्रीवर्धन** : ही नगरपरिषद महाराष्ट्र राज्यातील सर्वात जुनी नगरपरिषद आहे. सन २०१२ पर्यंत या नगरपरिषदेची इमारत देखील ब्रिटिशकालीन पद्धतीची कौलारू इमारत होती. याच जुन्या नगर परिषदेच्या बाजूला गुरांचा कोंडवाडा होता. शहरातील अनेक भागांमध्ये मोकाट फिरणारी गुरे, घोडे किंवा बकऱ्या यांना एखाद्या शेतकऱ्याच्या शेतात किंवा नारळ सुपारीच्या वाडीत शिरून नुकसान करताना पकडल्यास या कोंडवाड्यामध्ये आणून डांबले जात असे. त्यानंतर गुरांचा व बकऱ्यांचा मालक येऊन दंडाची आकारणी भरून गुरे सोडवून नेत असे. परंतु, श्रीवर्धन नगर परिषदेची इमारत नवीन बांधून झाल्यानंतर गुरांच्या कोंडवाड्याच्या जागी पर्यटक निवास बांधण्याची योजना श्रीवर्धन शहरातील काही स्थानिक नेत्यांनी आखली. त्याला राज्यातील वरिष्ठ नेत्यांनी पाठिंबा देखील दर्शविला व निधी देखील उपलब्ध करून दिला. परंतु, हे पर्यटक निवास बांधल्यापासून त्या ठिकाणी एकही पर्यटक राहिलेले पाहायलाच मिळत नाहीत. जेवढा खर्च शासनाने पर्यटक निवास बांधण्यासाठी केला तेवढा आजपर्यंत वसूल देखील झाला नसेल. असे नागरिकांमधून बोलले जात आहे. एक तर ते पर्यटक निवास व्यवस्थित डागडुजी करून पर्यटकांसाठी खुले करावे. अन्यथा त्या ठिकाणी पुन्हा कोंडवाडा सुरू करावा. अशी मागणी शहरातील नागरिकांमधून करण्यात येत आहे.

### दाम्पत्याने कष्टातून फुलवली परसबाग

**खोपोली** : खालापूर तालुक्यातील ग्रामीण जांबरुंग गावामधील खांडेकर दाम्पत्याने आपल्या घरातील मोकळ्या जागेत सेंद्रिय भाजीपाल्याची परसबाग फुलवली आहे. त्यामुळे त्यांना दररोज ताजी, पौष्टिक भाज्या मिळून आरोग्य चांगले राहते आणि कुपोषणासारख्या समस्या दूर होण्यास मदत होत आहे. त्यामुळे या खांडेकर दाम्पत्याच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.



सेंद्रीय शेती करण्यासाठी कृषी विभागाकडून विविध उपक्रम राबविण्यात येतात. मात्र, शेतकऱ्यांकडून पाहिज्या त्या प्रमाणात त्याला प्रतिसाद मिळत नाही. परंतु, खालापूर तालुक्यातील जांबरुंग गावामधील मेघा खांडेकर व मधुकर खांडेकर हे दाम्पत्य अपवाद ठरले आहेत. या दाम्पत्याने सेंद्रीय शेतीची कास धरून आपल्या घराच्या मागे परसबाग बहरवली. यामध्ये टोमॅटो, मिरची, शिमला, स्टोबरी, कोबी व अन्य फुलझाडे लागवड केल्याने परिसरातील सर्व महिला, ग्रामस्थ व तरुणांनी या खांडेकर दाम्पत्याचा आदर्श घ्यावा, असे मत प्रगतशील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

## एसटी स्थानकात नवीन पोलीस चौकी

■ यशोधन नागरी सहकारी पतसंस्थेचा पुढाकार

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग एसटी बस स्थानकाच्या प्रवेशद्वारासमोरच सुसज्ज अशी पोलीस चौकी उभारण्यात आली आहे. अलिबागमधील यशोधन नागरी सहकारी पतसंस्थेने पुढाकार घेत या पोलीस चौकीची निर्मिती केली आहे. या पोलीस चौकीचा उद्घाटन समारंभ शनिवारी (दि.२८) सकाळी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.




यावेळी अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, अलिबागच्या उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे, अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, अलिबागच्या नगरसेविका ॲड. अश्वीनी ठोसर, यशोधन नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष शेखर वागळे, उपाध्यक्ष मन्सूर सैय्यद, सर्व संचालक, कर्मचारी, सभासद तसेच पोलीस अधिकारी कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. अलिबाग एसटी बस स्थानकासह बाजूचा परिसर कायमच वर्दळीचा ठरत आहे. वाहनांची सतत येणारी ये-जा पादचाऱ्यांसह प्रवाशांची गर्दी या परिसरात मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे स्थानकाच्या प्रवेशद्वारासमोरच पोलीस चौकी होती. परंतु, ही चौकी जीर्ण झाली होती. वादळी वाऱ्यामुळे तिची अवस्था बिकट झाली होती. अलिबागमधील यशोधन नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष शेखर वागळे यांनी जीर्ण झालेल्या पोलीस चौकीचे नुतनीकरण करण्यासाठी पुढाकार घेतला. सुसज्ज अशी पोलीस चौकी बांधण्यात आली आहे. या पोलीस चौकीमुळे शहरातील व स्थानकाच्या परिसरातील कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच, वाहतूक कोंडी सुरळीत ठेवण्यात मदत होणार आहे. या परिसरात होणारे काही गैरप्रकार, भरधाव धावणाऱ्या वाहनांवर अंकुश ठेवण्यास मदत होण्याची शक्यता आहे.

## 'प्रशासक'च्या नावाखाली सत्तेचा मक्ता

। उरण । प्रतिनिधी ।

राज्यातील तब्बल १४ हजार मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून नेमणूक करून सरकारने लोकशाहीला अक्षरशः कुलूप ठोकल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटू लागली आहे. ग्रामविकास विभागाचे अवर सचिव बाबुराव आसोले यांनी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना आदेश बजावताच गावपातळीवर खळबळ उडाली आहे.

हा निर्णय 'प्रशासकीय अडचणी' या कारणाखाली घेतला गेला असला, तरी प्रत्यक्षात हा राजकीय सोयीचा डाव असल्याची जोरदार चर्चा आहे. निवडणुका न घेता त्याच सरपंचांच्या गळ्यात 'प्रशासक' पदाची माळ घालणे म्हणजे खुर्ची तीच, फक्त नाव बदलले इतकेच आहे. ६ महिने किंवा निवडणूक होईपर्यंत कारभार त्यांच्या हातीच राहणार आहे. उपसरपंच व सदस्यांची प्रशासकीय समिती स्थापन करण्याचा पर्याय देण्यात आला असला, तरी अंतिम सूत्रे सरपंचांकडेच राहणार हे स्पष्ट आहे. लोकशाहीच्या नावावर हा कारभार किती दिवस चालणार? गावकऱ्यांच्या मतांचा मान राखला जाणार की 'प्रशासक' या नावाखाली सत्तेचा मक्ता कायम ठेवला जाणार याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## प्रशासनाच्या निष्क्रियतेचा रुग्णांना फटका

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

हरिहरेश्वर (देवघर) येथे ऑगस्ट २०२३ मध्ये मोठ्या थाटामाटात प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नव्या इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले होते. 'लवकरच सुसज्ज आरोग्य सेवा' अशी घोषणाबाजी झाली. मात्र, आज तब्बल पावणे तीन वर्ष उलटूनही प्रत्यक्षात मात्र या ठिकाणी केवळ अपूर्ण बांधकाम, पडझड झालेला पाया आणि गंज चढलेली सळईच आहे. आरोग्य केंद्रासारख्या जीवनावश्यक सुविधेच्या कामात एवढा विलंब होणे ही केवळ प्रशासकीय चूक नसून नागरिकांच्या आरोग्याशी केलेली खेळी असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

परिसरातील हजारो नागरिकांना दर्जेदार आणि तातडीची वैद्यकीय सेवा मिळावी या उद्देशाने हा प्रकल्प जाहीर करण्यात आला होता. परंतु, आजही रुग्णांना जुन्या, जीर्ण इमारतीत किंवा तात्पुरत्या जागेत उपचार घ्यावे लागत आहेत. त्यामुळे राजिप बांधकाम विभागामार्फत या कामाची जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र, संबंधित ठेकेदाराकडून कामात झालेल्या विलंबाबाबत कोणती कारवाई झाली, याचे उत्तर मिळत नाही. केंद्राचे बांधकाम रखडणे ही नागरिकांच्या आरोग्यावर थेट परिणाम करणारी गंभीर बाब आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, हा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.

## उरणच्या बँकांमध्ये ग्राहकांची चेष्टा

**उरण** : येथील बँकांमध्ये सध्या ग्राहकांची अक्षरशः थट्टा सुरू आहे. बँकेची वेळ एक आणि कर्मचाऱ्यांची वेळ दुसरी असा अजब कारभार शहरात उघडपणे चालू आहे. कामाच्या वेळेत कर्मचारी गायब, काउंटर बंद आणि ग्राहक मात्र रांगेत ताटकळत उभे, असा प्रकार सुरू आहे. त्यामुळे हा प्रकार नेमका किती दिवस सहन करायचा? वरिष्ठ अधिकारी याकडे जाणिपूर्वक डोळेझाक करत आहेत का? असा प्रश्न ग्राहकांमधून उपस्थित केला जात आहे.

## राजिपचा विविध पुरस्कारांनी गौरव

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाआवास अभियांतर्गत उत्कृष्ट काम करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेला कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते बुधवारी (दि.२५) गौरविण्यात आले. नवी मुंबई येथील सिडको भवन येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. गुणवत्ता वाढीसाठी राज्यात सन २०२१ ते २०२४ या कालावधीत महाआवास अभियान राबविण्यात आले.



या अभियानात राज्य पुरस्कृत आवास योजना २०२१-२२ सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद विभागात तृतीय क्रमांक, प्रधानमंत्री आवास योजना २०२२-२३ सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद विभागात तृतीय क्रमांक, प्रधानमंत्री आवास योजना २०२३-२४ सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद विभागात तृतीय क्रमांक, राज्य पुरस्कृत आवास योजना २०२३-२४ सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद विभागात द्वितीय क्रमांक, यासोबतच राज्य पुरस्कृत आवास योजना २०२२-२३ सर्वोत्कृष्ट पंचायत समिती विभागात पनवेल पंचायत समितीला प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले.

## आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोली नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष स्व.लक्ष्मण साबळे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांचे पुत्र यशवंत साबळे व नातू उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी शुक्रवारी (दि.२७) लोकोपयोगी उपक्रम राबवले. यावर्षी खोपोलीतील जनतेच्या सेवेसाठी मुख कर्करोग पूर्व तपासणी, स्तनाची कर्करोग पूर्व तपासणी, गर्भाशय मुखाच्या पूर्व कर्करोगाची तपासणी, पॅप स्मिअर/तपासणीद्वारे गर्भाशय मुखाची तपासणी मॅमोग्राफी, मोफत नेत्रतपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि रक्तदान शिबीर अशा कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



यावेळी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, माजी नगराध्यक्ष दत्तात्रय मसुरकर, मयुरी शेलार, अनिल सानप, प्रतीक्षा रेटरेकर, दिनेश थोरवे, संदीप पाटील, राहुल गायकवाड, विनायक तेलवने, अमित फाळे, सानिया शेख, अश्विनी अत्रे, रूपाली जाधव, रेश्मा गायकवाड, श्वेला आहीर, विनिता आवटी, मोहन अवसरमल आदींसह इतर मान्यवर व मोठ्या संख्येने खोपोलीकर उपस्थित होते.

## मुंबई-गोवा महामार्गावर पोलीस सज्ज

। माणगाव । प्रतिनिधी ।

होळी या सणासाठी मुंबई, पुणे, ठाणे, तसेच गुजरातमधील सुरत येथून कोकणात परतणाऱ्या कोकणवासीयांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. यंदा शनिवार, रविवार तर सोमवारी कलेक्टर घोषित सुट्टी आणि मंगळवारी धुलीवंदन अशी सलग ४ दिवसांची सलग सुट्टी आल्याने कोकणाकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या विक्रमी राहण्याची चिन्हे दिसत आहेत. विशेषत: मुंबई-गोवा या प्रमुख महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मुंबईहून कोकणात प्रवेश करताना इंदापूर व माणगाव ही बाजारपेठ 'प्रवेशद्वार' म्हणून ओळखली जाते. मात्र, या ठिकाणी महामार्गाच्या बायपासचे काम अद्याप अपूर्ण असल्याने दरवर्षीप्रमाणे यंदाही होळी काळात वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागू शकतो. कोकणवासीय नागरिकांना आपल्या आराध्य दैवताचे वेळेवर दर्शन घेता यावे, यासाठी वाहन चालक मालक यांनी वाहतुकीचे नियम पाळावेत जेणेकरून सर्वांनाच आपापल्या गावी वेळेत पोहोचता यावे. या प्रवासात काही अडचण आल्यास प्रत्येक पोलीस स्टेशनच्या हद्दीत महामार्गावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. भुवन ते वडपाले, टेमपालेपर्यंत महामार्ग वाहतूक शाखेचे २२ कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय माणगाव येथील १० वाहतूक पोलीस, १२ होमगार्ड, एक सहाय्यक पोलीस निरीक्षक व दोन पीएसआय अधिकारी वर्ग असा मजबूत बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

सहकारी पतसंस्थांच्या प्रतिनिधींची उपस्थिती | एकदिवसीय उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## आरडीसीसी बँकेच्या सभागृहात कार्यशाळेचे आयोजन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा अलिबागमधील रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या सभागृहात उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. या कार्यशाळेत जिल्ह्यातील ९४ सहकारी पतसंस्थांचे एकूण २४७ प्रतिनिधी तसेच जिल्ह्यातील, सर्व तालुक्यांचे सहाय्यक निबंधक आवर्जून उपस्थित राहिले होते.



या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधिक तनवीर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष ॲड. जे.टी. पाटील, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाचे सचिव योगेश मगर, रोह्याच्या सहाय्यक निबंधक रेखा गावडे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रास्ताविक रेखा गावडे यांनी केले. त्यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट करताना सहकार विभागाच्या नवीन नियमावली, परिपत्रके व मार्गदर्शक तत्त्वांचे प्रभावी पालन करण्यासाठी अशा प्रशिक्षण उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

कार्यशाळेतील पहिल्या सत्रात सहकार विभागाचे नवीनतम परिपत्रके व मार्गदर्शक तत्त्वे या विषयावर पुणे येथील पिपल्स को-ऑप. बँकचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी सदानंद दिक्षित यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पतसंस्थांनी पारदर्शकता, लेखापरीक्षण शिस्त, सदस्यांशी संवाद आणि कायदेशीर बाबींचे काटेकोर पालन यावर विशेष भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. दुपारच्या सत्रात प्रभावी वसुलीसाठी पुनर्प्राप्ती व्यवस्थापन व कायदेशीर पावले या विषयावर सदानंद दिक्षित यांनीच सखोल विवेचन केले. वाढती थकबाकी, कर्जवसुलीतील अडचणी, कायदेशीर उपाययोजना, मध्यस्थी व समेट प्रक्रिया याबाबत त्यांनी उदाहरणांसह मार्गदर्शन केले. सत्रानंतर प्रश्नोत्तरांमध्ये प्रतिनिधींनी विविध शंका उपस्थित केल्या, त्यांचे समाधानकारक निरसन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाचे सचिव योगेश मगर यांनी आभार व्यक्त केले. भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. संपूर्ण कार्यशाळा अत्यंत नियोजनबद्ध, शिस्तबद्ध व सकारात्मक वातावरणात पार पडली असून सहकार क्षेत्रातील प्रशासकीय व कायदेशीर जाणिवा अधिक दृढ करण्यास या उपक्रमाचा निश्चितच लाभ होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# जिल्ह्यात मराठी भाषा गौरव दिन साजरा

मराठी भाषा आणि साहित्याचा गौरव करणारा विशेष दिन म्हणजे 'मराठी भाषा गौरव दिन' होय. कवी, ज्येष्ठ साहित्यिक वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान महत्वपूर्ण असल्याने त्यांना अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. त्यांनी मराठी भाषेला सन्मान मिळावा म्हणून अनेक वर्ष प्रयत्न केले. त्यामुळे हा दिवस मराठी भाषेचा समृद्ध इतिहास, साहित्य आणि संस्कृती यांचा गौरव करण्यासाठी आहे. तसेच, आपल्या मायबोलीचा सन्मान करण्याचा आणि समृद्धवारशाला उजाळा देण्याचा देखील दिवस आहे. शुक्रवारी (दि.२७) जिल्ह्यातील विविध ठिकाणी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस व मराठी भाषा गैरव दिन साजरा करण्यात आला.




● मुरुड येथील सर.एस.ए. हायस्कूल व व कनिष्ठ महाविद्यालय तसेच मॉर्निंग स्टार प्रायमरी स्कूल तर्फे शाळेमध्ये मराठी भाषा गौरव दिन शुक्रवारी (दि.२९) साजरा करण्यात आला. यावेळी शाळेपासून मुरुड बाजारपेठ, आझाद चौक, वाचनालय व पुन्हा शाळा अशी ग्रंथदिंडी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध वेष परिधान केले होते. शाळेचे लेझीम पथक या दिंडीचे विशेष आकर्षण होते. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## प्रभाकर पाटील वाचनालयात कुसुमाग्रजांना अभिवादन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय, अलिबाग तालुका ग्रंथालय आणि प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी वाचनालयाच्या रामनारायण सभागृहात विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला ज्येष्ठ लेखक नाट्यकर्मी शरद कोरडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक नंदू तळकर यांनी केले. तर, मान्यवरांनी मराठी भाषा दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमात उपस्थितांचे आभार ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांनी मानले. या कार्यक्रमाला जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, माजी नगरसेवक आर.के. घरत, हेमकांत सोनार, ग्रंथपाल ज्योती म्हात्रे व झेबा कूरेशी आदी उपस्थित होते.



## निवडक



### उरण आगारात गौरव दिन साजरा

**उरण–चिरनेर :** उरण एसटी आगारात मराठी भाषा गौरव दिन कोमसाप उरण शाखेच्यावतीने साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम साहित्यरत्न प्रा.एल.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी व्यासपीठावर अधिक्षिका दीपा कोंढारकर, विभागीय नियंत्रक तुषार शिंदे, तानाजी भोईर, रोहन खलिपे, चंद्रकांत देसले, संतोष दळवी, संदीप चव्हाण, प्रभाकर म्हात्रे, पंकज म्हात्रे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा.एल.बी. पाटील म्हणाले की, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून कुसुमाग्रज आणि आजच्या लहान मोठ्या लेखकांनी मराठीला समृद्ध केले आहे. मराठी भाषेने मराठी माणसाला स्वाभिमानाचा ताठ कणा जगण्यासाठी दिला आहे, असे मत त्यांनी मांडले. त्याचबरोबर पाटील यांनी 'माय बोली सारेबाराचा पलाट' या आगरीबोलीतील कवितांचेही सादरीकरण केले. तर, कवी संजीव पाटील यांनी वि.वा.शिरवाडकर यांच्या जीवनावर विचार मांडून आपल्या कविता सादर केल्या.



### 'साहित्य संवाद' कार्यक्रम उत्साहात

**तळा :** कोकण मराठी साहित्य परिषद शाखा तळा यांच्यावतीने भरत जोशी यांचे निवासस्थानी 'साहित्य संवाद' हा कविता व अभिवाचनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर तळा शाखा संस्थापक पुरुषोत्तम मुळे, उपाध्यक्ष भरत जोशी, ॲड. परेश जाधव, माजी जिल्हा कार्यवाह अजित शेडगे, अभिनेते दिग्दर्शक किरण केळुसकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरूवात नवजीवन विद्यामंदिर तळाशेतचे संगीत शिक्षक अजित भोपी व त्यांच्या विद्यार्थ्यांच्या चमूने अतिशय बहारदार असे 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे गीत सादर करून केली. प्रास्ताविकात उपाध्यक्ष भरत जोशी यांनी मराठी भाषेबद्दल गौरव उद्गार काढून कुसुमाग्रजांची माहिती सांगितली व उपस्थिताचे स्वागत केले. तसेच, मान्यवरांनी स्वरचित रचना सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खजिनदार प्रणय इंगळे व आभार प्रदर्शन माजी अध्यक्ष हेमंत बारटक्के यांनी केले.


(छाया : सलीम शेख)

### भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण साजरा

**माणगाव :** शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग. तटकरे महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण साजरा करण्यात आला. मराठी विभागप्रमुख डॉ. राजेंद्र आचार्य यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये मराठी भाषेचे वैभव, तिची समृद्ध साहित्यपरंपरा आणि जागतिक स्तरावर वाढत असलेले महत्त्व यांचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना मातृभाषेच्या जतनासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. बी. एम. खामकर यांनी मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती आपल्या संस्कृती, परंपरा आणि अस्मितेचे प्रतीक असल्याचे ठामपणे नमूद केले. 'भाषा टिकली तर संस्कृती टिकते', असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना मराठी लेखन, वाचन आणि संवाद अधिक आत्मीयतेने जोपासण्याचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रभावी भाषणांमधून मराठी भाषेचा इतिहास, वर्तमानातील स्थान आणि भविष्यकालीन संधी यावर विचारमंथन झाले. काही विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्याचा संदर्भ देत मराठी साहित्याची ताकद आणि संवेदनशीलता अधोरेखित केली. त्यांच्या सादरीकरणामुळे कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## यु.ई.एस. महाविद्यालयात मराठी दिन उत्साहात

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणमधील यु.ई.एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये मराठी भाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक गणेश नाखवा यांच्यासह यु.ई.एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षक, पीटीए सदस्य, विद्यार्थी, शिक्षक व पालक, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी स्वागतगीत गायले व माध्यमिक विभागातील शिक्षिकेने मराठी दिवसाचे महत्व सांगितले. त्यानंतर यु.ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांनीही मराठी दिवसाचे महत्त्व सांगितले. तर प्रमुख पाहुणे गणेश नाखवा यांनीनी आपल्या मनोगतातून मराठी दिवसाची महती व उद्योजक क्षेत्रातील अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिक नृत्य, सोशल मिडीया विषयावर पथनाट्य, कृतीगीत सादर केले. तसेच, यावेळी मराठी पुस्तकांचे प्रदर्शन देखील मांडले होते.





## सार्वजनिक वाचनालयात गौरव दिन साजरा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस व मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक आर.के. घरत आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी श्रुतिका पाटील, अपूर्वा मानकर, हेमंत राऊत, संतोष माळवी, आर.बी. पाटील, डी.एन. गायकवाडसर, पेरेकर, ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव नंदू तळकर, हेमकांत सोनार व वाचनालयातील वाचकवर्ग आदी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार ग्रंथपाल रजिता माळवी यांनी मानले.



## उरणमध्ये भाषा दिन साजरा

**। उरण–चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण नगर परिषदेच्या माँसाहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी ॲड. निरंतर सावंत यांनी, मराठी भाषा जास्तीत जास्त बोलणे व ती भाषा जिवंत ठेवणे हे आपल्या सर्व मराठी लोकांचे कर्तव्य आहे. तर, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांनी मराठी भाषा जिवंत राहण्यासाठी सर्वांनी आपल्या मुलांना मराठी शाळेमध्ये पाठविणे जरुरीचे आहे. तसेच, आपण दुर्लक्ष केल्यामुळे मोडी लिपी व संस्कृत भाषा कशी लोक पावली याची त्यांनी उदाहरणे दिली. त्यामुळे भाषा बोलणे, ती टिकवणे व आपल्या मातृभाषेतील संवाद आपण आपल्या स्वतः पासूनच वाढवणे हे प्रत्येक नागरिकांनी लक्षात ठेवणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले.

## अजित हरवडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधुन अलिबाग जिल्हा कारागृहात दाखल असलेल्या बंद्यांना मराठी भाषेविषयी आदर निर्माण व्हावा, या करीता राजिप प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत प्राथमिक शिक्षक अजित हरवडे यांचे व्याख्यान आयोजित करुन मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात आला. अजित हरवडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, मराठी भाषा हि थोर संत, विचारवंत व साहित्यिक यांनी समृद्ध केलेली असल्याने मराठी भाषा जगभरात बोलली जाते. मायबोली मराठी भाषा ही आपली ओळख, आपली शान, आपला अभिमान असुन आपल्याला मराठी भाषेविषयी अभिमान वाटला पाहिजे. तसेच, सर्वांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगुन तिच्या संवर्धन करण्यासाठी योगदान देणे बाबत बंद्यांना मार्गदर्शन केले. हा उपक्रम राज्य कारागृह व सुधारसेवाचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. सुहास वारके व विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यावेळी अलिबाग जिल्हा कारागृह अधीक्षक विशाल बांदल, प्राथमिक शिक्षणाधिकारी ललिता दहितुले, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, शिक्षक अजित हरवडे, प्रबोधन सामाजिक सेवा संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.मिलींद पाटील, हवालदार सुनिल जाधव, का. शिपाई सतिष जुंबळे आदींसह कारागृह अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.



## सुधागडात 'कवी आपल्या भेटीला' उपक्रम




**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

नवघर शाळेत मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'कवी आपल्या भेटीला' हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी सुधागड तालुक्यातील कासारवाडी गावचे नवोदित आणि सुप्रसिद्ध कवी उमेश जाधव यांनी आपल्या काव्य सादरीकरणाने विद्यार्थ्यांची मने जिंकली. यावेळी कवींचा परिचय उपशिक्षिका शितल पाटील यांनी करून दिला.

सुधागडच्या मातीतील एक उदयोन्मुख आणि शब्दप्रभू कवी म्हणून त्यांनी उमेश जाधव यांचा गौरव केला. कवी उमेश जाधव यांनी आपल्या दमदार आणि भारदस्त आवाजात मराठी दिनाचे महत्त्व विशद केले. त्यांनी स्वतः लिहिलेल्या पाऊस आणि आई या विषयांवरील कवितांचे सादरीकरण केले. केवळ कविताच नव्हे, तर मराठी संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या लोकगीतांचे महत्त्व सांगत त्यांनी काही लोकगीतेही सादर केली. त्यांच्या या सादरीकरणामुळे कार्यक्रमाची आणि मराठी दिनाची शोभा अधिकच वाढली. या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन शाळेतील शिक्षकांनी अत्यंत नेटकेपणाने केले होते. यावेळी वृषाली गुरव, शितल पाटील, अनुजा माने व रुपाली लेंडवे यांचा मोलाचा वाटा होता.



## जामकर यांच्या सुलेखन प्रदर्शनाचे उद्घाटन

**। उरण । प्रतिनिधी ।**

जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयात दि.२६ आणि २७ फेब्रुवारी रोजी मराठी राजभाषा दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाही थाटात करण्यात आली. यावेळी सुप्रसिद्ध सुलेखनकार मनोहर जामकर यांच्या हस्ते लाल फीत कापून सुलेखन प्रदर्शनाचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या स्वागताचा फलक किशोर म्हात्रे यांनी अत्यंत सुंदर आणि मोहक अक्षरात रेखाटला होता. त्यानंतर ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून कार्यक्रमाची दिमाखदार सुरुवात झाली. यावेळी शालेय प्रशासकीय अधिकारी मोनिका रतनपर्ज,पालक संघाचे उपाध्यक्ष रमाकांत म्हात्रे, अविनाश म्हात्रे, सहसचिव योगेश तांडेल आणि तृप्ती भोईर आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंग्रजी व मराठी माध्यमांचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, वसंत कडू, शिवाजी गुरव, शितल दर्णे आणि दिलीप घरत या सर्वांच्या सुंदर समन्वयातून मराठी राजभाषा दिन सोहळा यशस्वी रित्या पार पडला.

## गौरव दिनानिमित्त वक्तृत्व कार्यक्रमाचे आयोजन

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथील सार्वजनिक वाचनालय व कोकण मराठी साहित्य परिषदेच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शुक्रवारी (दि.२७) 'मला आवडलेली गोष्ट/मला आवडलेले पुस्तक' या वक्तृत्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाची सुरुवात मराठी भाषेच्या गौरवपर वातावरणात झाली. विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने व ओघवत्या मराठीत आपली मते मांडली. सर्व इयत्तेतील विद्यार्थ्यांनी 'मला आवडलेली गोष्ट/मला आवडलेले पुस्तक' या विषयावर निरागस शैलीत गोष्टी सांगत व भाषणे करत उपस्थितांची मने जिंकली. मराठी भाषेचे संवर्धन आणि वाचन संस्कृती वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व आयोजन केल्याबद्दल कार्यकारी मंडळाचे विशेष अभिनंदन करण्यात आले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून भविष्यातही अशा साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.





## झुगरेवाडी शाळेत मराठीचा गौरव

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील राजिप प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा झुगरे वाडी येथे मराठी भाषा गौरव दिन व कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषेचा गौरव करण्यात आला. यावेळी अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. कार्यक्रमादरम्यान, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, निबंध, रांगोळी तसेच विद्यार्थ्यांनी स्वतः रचलेल्या कविता यांचे काव्यवाचन केले. तर, काही विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या माध्यमातून मराठी भाषा दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच, मराठी पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

# सुशिक्षित तरुणांनी फुलविला कलिंगडाचा मळा

## ● अथक मेहनतीच्या जोरावर तीन महिन्यांनी लाखोंचा नफा



| माणगाव | प्रतिनिधी |

आजच्या तरुणांनी नोकरीच्या पाठीमागे न धावता शेती व्यवसायाकडे वळून त्यातून आपली आर्थिक उन्नती साधली पाहिजे. अशीच एक भरारी माणगाव तालुक्यातील न्हावे गावातील सुशिक्षित बेरोजगार तरुण संजय शांताराम तेटगुरे यांनी घेतली असून त्यांनी आपल्या गावालगतच्या शेत जमिनीत कलिंगडाचा मळा फुलवून अथक मेहनतीच्या जोरावर ते आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने तीन महिन्याला दरवर्षी लाखो रुपयांचा नफा मिळवीत आहेत. त्यांचा हा व्यवसाय आजच्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांना आदर्श देणारा आहे.

न्हावे गावचे संजय तेटगुरे हे गरीब शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले व्यक्तिमत्व आहेत. त्यांचे शिक्षण एसवाय.बी.ए.पर्यंत झाले. नंतर प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना पुढील उच्च शिक्षण घेता आले नाही. यानंतर त्यांनी शेती व्यवसायाकडे वळण्याचा निर्णय घेतला. यातून ते कमालीचे यशस्वी झाले. गेली दहा-बारा वर्षांपासून ते आपल्या गावालगतच्या शेतजमिनीत कलिंगड पिकाची लागवड करून तीन महिन्याला लाखोंचे उत्पादन घेत आहेत. यावर्षी त्यांनी आपल्या न्हावे गावच्या लगतची २० एकर जागा कलिंगड लागवडीसाठी भाड्याने घेतली. कलिंगड लागवड करण्याकरिता त्यांनी सांगली जिल्ह्यातून सिंबा, गोल्डन, सुपरीत, फ्रुटी जातीचे ४ लाख रुपये किंमतीचे सव्वा लाख कलिंगडाची रोपे विकत आणली. भाड्याने घेतलेल्या या शेतीची ट्रॅक्टर व मशागत करण्यासाठी लागणाऱ्या अन्य साधनांचा वापर करून कलिंगड फळाला उपयुक्त ठरेल अशी आळी तयार करून या रोपांची आपले सहकारी साहिल बिंदुगडे, संजय बिंदुगडे, स्वप्नील बिंदुगडे, शुभम बिंदुगडे यांच्या मदतीने नोव्हेंबर २०२५ च्या अखेरीस लागवड केली. या रोपांना जवळच असलेल्या नदीतून पाणी पंप लावून दररोज एक तास सर्व रोपांना पाणी देऊन तसेच १३०४५ व १९१९१९ हि खते वापरून सलग तीन महिने रात्रंदिवस अथक परिश्रम, जिद्द, चिकाटीच्या बळावर ही रोपे चांगल्या प्रकारे फुलविले. तीन महिन्यात संजय यांच्या कलिंगडाच्या मळ्यात चांगली रसाळ, लालसर व गोड कलिंगड तयार होऊन यांतील गोल्डन जातीचा कलिंगड १० किलो वजनाचा तयार झाला असून सिंबा जातीचा ६ ते ७ किलो वजनाचा कलिंगड तयार झाला आहे. संजय यांचे तयार झालेले हे कलिंगड व्यापाऱ्यांनी ठाणे, मुंबई, गुजरात याठिकाणी विक्रीसाठी नेले आहेत. संजय यांच्या चविष्ठ व गोड कलिंगडामुळे दरवर्षी त्यांच्याकडे ठाणे, मुंबई, गुजरात येथील व्यापारी टनाने कलिंगड घेण्यासाठी येत असतात.

यावर्षी २० एकर जागेत हे कलिंगड पीक घेण्यासाठी संजय याला साधारण १६ लाख रुपये इतका खर्च आला असून हा सर्व खर्च वजा करून महिन्याला १५ लाख रुपयांचा निव्वळ नफा संजयला मिळाला. याबाबत प्रसार माध्यमांजवळ बोलताना संजय तेटगुरे म्हणाले कि,आजच्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी नोकरी करण्यापेक्षा भाजीपाला, कलिंगड यांसारखी शेती करून त्यातून आपली आर्थिक उन्नती साधावी. केवळ तीन महिन्यात आपण अथक परिश्रम घेऊन काहीतरी करण्याचे मनापासून ठरविले तर लाखो रुपयांच्या उत्पन्न तर घेऊ शकतोच त्यानुसार निश्चितच ध्येय प्राप्ती होऊन आपण आनंदाने जीवन व्यथित करू असे सांगितले.

# परीशा सरोदेंना नारीशक्ती सन्मान पुरस्कार



| चिरनेर | प्रतिनिधी |

नवी मुंबई येथील अष्टगंध कला मंचाच्या चतुरस्त्र अभिनेत्री परीशा सरोदे यांना नारीशक्ती सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. मार्गदर्शिका डॉ. सायली कंडारी यांच्या हस्ते त्यांना हा मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कल्याण येथील स्वामीनारायण हॉलमध्ये गुरुवारी (दि.२६) आपलं प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात कल्याण डोंबिवली महापालिकेच्या क्षेत्रातील एकूण शंभर महिलांचा नारीशक्ती सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला माजी आ. रविंद्रजी मिर्लेकर, झाकीर हुसेन, वैशाली राजपूत, प्रशांत गवाणकर, सुनीता लिमये, गणेश पराते, दिनेश ठक्कर, सुमित पालीवाल आदी मान्यवर उपस्थित होते. शकुंतला राय कुमोदिनी देसाई, सुनंदा जाधव, सीमा जाधव, अरुणा कदम, मीना बने, वैष्णवी गावकर, सोनल लोहार, सुहासिनी चव्हाण, सीमा जगताप, वंदना वाणी, तेजस्विनी कापडणे या सर्वांनी उत्तम नियोजनातून कार्यक्रम यशस्वी करण्याचा प्रयत्न केला. यावेळी लकी ड्रॉ विजेत्यांनाही पारितोषिक देण्यात आली. चतुरस्त्र अभिनेत्री परीशा सरोदे यांना प्राप्त झालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे नवी मुंबई येथील अष्टगंध कलामचांच्या सर्व कलाकारांनी विशेष अभिनंदन केले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ मार्च

१) श्रीम. रेखा रविंद्र पाटील अलिबाग, १-३-१९४३
२) श्रीम. शरयू शरद मोहोळ विद्यानगर, अलिबाग १-३-१९४३
३) श्री. सुरेश गोविंद मयेकर किहीम, अलिबाग १-३-१९३९
४) श्री. परशुराम बाबू सुतार चेंढरे, अलिबाग, १-३-१९४५
५) श्री. लक्ष्मण तुळशीदास सुरेकर, नवगाव, अलिबाग १-३-१९४८
६) श्री. सलीम हुसेन बागवान अलिबाग, १-३-१९५७
७) श्री. धर्मा लक्ष्मण झावरे भिलजी, अलिबाग, १-३-१९५७

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



सार्थ जयेश जैन
१ ला वाढदिवस
अलिबाग



# खालापूर पंचायत समितीसमोर साखळी उपोषण

| रसायनी | प्रतिनिधी |

खालापूर पंचायत समिती कार्यालयासह सर्व ग्रामपंचायतीकडून शासकीय परिपत्रकांचे आदेश पालन न करता आदेशांचा भंग होत असल्यामुळे पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्यावर कारवाई करा अशी मागणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग राजिपकडे करण्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ खालापूर तालुक्याच्या वतीने २३ फेब्रुवारीपासून खालापूर पंचायत समिती समोर बेमुदत साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. खालापूर तालुकाध्यक्ष वसंत पाटील, सुरेश गावडे, गजानन साळवी, एकनाथ पिंगळे, उपकार्याध्यक्ष परशुराम मिरकुटे, संपर्कप्रमुख पद्माकर खंडागले, सदस्य वासुदेव पाटील, किशोर मोरे, मधुकर गुरव, किरण भोसले, धनाजी भुईकोट, श्याम घारे, शरद पाटील, पंढरीनाथ दरेकर आदी प्रमुख उपस्थित होते. संबंधितांवर अद्याप कोणत्याही प्रकारची कारवाई न झाल्याने जनतेने भरवसा ठेवायचा कोणावर अशी तालुक्यात चर्चा सुरू आहे.

# विद्यार्थ्यांचा सन्मान

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनीतील महिला उद्योग मंडळाची प्राथमिक शाळा पराडे व शिशुविकास बालमंदिर मोहोपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने बक्षीस वितरण समारंभ पार पाडला. यावेळी महादेव पाटील यांनी क्रीडा स्पर्धांचे अभ्यासक्रमातील व जीवनातील महत्त्व स्पष्ट करून विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने क्रीडा स्पर्धा खेळल्या म्हणून त्यांचे कौतुक केले. याप्रसंगी मंडळाच्या अध्यक्षा सरोजिनी साजवान, उपाध्यक्ष शारदा दराडे, सुनंदा कुलकर्णी, खजिनदार कराड, हर्षदा पालव, शोभा देऊळगावकर तसेच वासांबे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच ताई पवार उपस्थित होत्या.

# मानिवलीत भरती शिक्षण परिषद

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील मानिवली येथील जिल्हा परिषद शाळेत केंद्रीय शिक्षण परिषद भरली होती.या शिक्षण परिषदेत कर्जत तालुक्यातील केंद्र प्रमुख आणि मुख्याध्यापक यांनी शैक्षणिक आढावा घेतानाच नवीन शैक्षणिक धोरणावर भाष्य केले. तालुका गट शिक्षण अधिकारी अनंत खैरे यांच्या अध्यकतेखाली झालेल्या शिक्षण परिषदेत अनेक ठराव देखील घेण्यात आले.

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मानिवली येथे माहे फेब्रुवारी २०२६ची केंद्रीय शिक्षण परिषद घेण्यात आली.या शिक्षण परिषदेत कर्जत पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे यांची प्रमुख उपस्थिती होती. केंद्राचे केंद्रप्रमुख नारायण सोनवणे तसेच माणिवली शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जितेंद्र गवळी, मुख्याध्यापक संजय थोरात, दीपक देशमुख, आणि केंद्रामध्ये शिक्षकांची उपस्थिती होती. सुरुवातीला हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या जीवनावर आधारित असलेला पोवाडा आणि गोंडी आदिवासी गीत नृत्य सादर झाले.गटशिक्षणाधिकारी खैरे यांनी सर्व शिक्षकांना मार्गदर्शन करताना दहिवली केंद्राचे कामकाज खूप उत्तम प्रकारे चालले आहे त्याबद्दल समाधान व्यक्त केले. मानिवली शाळेच्या शिक्षिका सुनंदा पाटील यांनी शाळा मानिवली शालेय शैक्षणिक कामाच्या योगदानाची माहिती दिली. संजय थोरात यांनी शाळा गुणवत्ता विकासात माझी भूमिका याचे सादरीकरण केले. रायगड जिल्हा परिषद आदर्श शिक्षिका संज्योती संतोष कांबरी यांचा सत्कार गटशिक्षणाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. मानिवली विद्यार्थी निर्मित साहित्याचे अनावरण शिक्षण अधिकारी यांनी केले.

शाळा व्यवस्थापन समिती मानिवली अध्यक्ष जितेंद्र गवळी यांच्या सहकार्यातून रोटरी क्लब देवनार यांनी दिलेल्या सोलर पॅनल याची पाहणी केली. तसेच शालेय परसबाग याची पाहणी केली आणि त्या संदर्भात समाधान व्यक्त केले.यावेळी अनंत खैरे यांनी सर्व शिक्षकांनी आपले विद्यार्थी,आपली शाळा, आपला तालुका शैक्षणिक विकासात आघाडीवर कसा राहील यावर लक्ष केंद्रित करावे असे सांगितले. केंद्रप्रमुख नारायण सोनवणे यांनी केंद्रीय गुणवत्ता कक्ष कार्यवाही यासंबंधी माहिती दिली.

# साप्ताहिक राशिभविष्य १ मार्च ते ७ मार्च २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## महत्त्वाचे निर्णय घ्या

**मेष :** हा सप्ताह मेष राशीधारकांना वेळ व धन या दोन्ही बाबी आपल्या समाधान योग्य नसणार आहेत, आपला वेळ कसा जाईल हे समजून येणार नाही हातात त्या प्रमाणात योग्य पैसा पडणार नाही त्यामुळे आपल्या नियोजनाला महत्व येणार आहे, घर, जागेच्या कामा संबधी व्यवहार करू नका उगाच कोर्ट कचेरी होईल, हे व्यवहार पुढे ढकलणे फायद्याचे राहतील. या काळात वादविवादापासून लांब राहा. हा सप्ताह व्यापार-व्यवसायाच्या दृष्टीने अपेक्षित अशा क्षेत्रात जाण्यासाठी सोनेरी पायघड्या टाकणारा ठरेल. कष्टाचे प्रमाण वाढवावे लागले तरच फायद्याचे प्रमाणही वाढलेले असेल. स्वत:च्या हिमतीवर महत्त्वाचे निर्णय घेऊ शकाल. नोकरदार व्यक्तीने वरिष्ठांशी असलेले संबंध ताणले जाणार नाहीत याची काळजी घ्या. अति तिखट बोलणे टाळा. कोर्ट प्रकरणात शक्यतो कायदेशीर तडजोडीच्या मागे लागा. नियोजनबद्ध केलेल्या कामात हक्काचे यश मिळवता येईल. खर्चावर निर्बंध ठेवा. **महिलांना:** मित्र-मैत्रिणींसोबत किरकोळ कुरबुरीना मोठ्या स्वरूपात वाढवू नका. वैवाहिक जीवनात मनासारखे वातावरण राहील. आहारावरील नियंत्रण सोडू नका. प्रकृती जपा. **शुभ दिनांक :** ०२,०३.

## नव्या ओळखी होतील

**वृषभ :** हा सप्ताह वृषभ राशीसाठी महत्त्वाकांक्षा वाढवणारा ठरणार आहे. व्यापारीवर्गाला व्यापाराचे नवा मार्ग सापडेल त्यामुळे आर्थिक परिस्थिती चांगली होऊन आपले ध्येय गाठणे सोपे होईल, क्षितिजापर्यंत जाण्याचा मार्ग सापडेल. आपण घेतलेले निर्णय यशस्वी ठरतील. त्याच प्रमाणे आपण मनात असलेली गुंतवणूक त्या मार्गाने पाऊले उचलली जाणे यांचे समीकरण उत्तम जमेल. नोकरदारांना जास्तीचे काम करावे लागले तरी त्याचा योग्य परतावा मिळेल आपले अधिकारी आपल्यावर खुश होतील. आपण नोकरी धंद्यात नियमांचे योग्य पालन केल्यास कामावर पकड बसेल. पैशाचे गणित आपल्यासाठी लाभदायी ठरेल. अनेक कामकाजात आपला आवाज वरच्या पातळीवर राहू शकेल. आपण एखाद्या घरगुती कार्यक्रमाचे आयोजन कराल. तो यशस्वी कराल आपले मित्र मैत्रिणी सोबत करमणूक करून आनंद वाढवाल. **महिलांना:** आपल्या नात्यातील सलोखा वाढता राहील. मुलांचे कर्तृत्व तुमच्या डोळ्यांचे पारणे फेडेल. आपल्या सोबत आजूबाजूच्या लोकांचा सहभाग आपल्याला प्रेरणादायी असेल. घराची डागडुजी करून घ्याल. मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले राहील. **शुभ दिनांक :** ०४,०५.

## गैरसमजुतीने वाद वाढतील

**मिथुन :** हा सप्ताह मिथुन राशीसाठी वेगळा ठरू शकतो. आपल्यावर असणाऱ्या जबाबदाऱ्या वाढवत जाऊ नका, ग्रहांची पकड घट्ट राहील. कामात आलेल्या अडथळ्यांचे प्रमाण कमी होऊ लागेल. आगामी काळासाठी केलेला विचार योग्य ठरेल. अपेक्षित फलप्राप्ती वाढलेली असेल. उत्पन्नातील घटते प्रमाण कमी होईल. ग्राहकांची मने वळवण्यास अनुकूलता राहील. नोकरदार वर्गाने अंगलट येणाऱ्या गोष्टींपासून लांब राहावे. जास्तीची जबाबदारी घेताना विचार करा. नियोजनानुसार स्वरूप ठरवा. आपले योगदान राजकीयबाबत्तीत महत्वाचे ठरणार आहे. व्यसनी मित्रांच्या संगतीपासून लांब राहा. इतरांना सल्ला देताना बोलण्यातील जरब धारदार करू नका. नाहीतर समोरच्याचा गैरसमज होऊन आपले नुकसान होऊ शकते त्यामुळे आपली भाषा गोड ठेवा. कुटुंबातील व्यक्तीची जबाबदारी वाढेल. आरोग्याच्या बाबतीत अजूनही आपण रेड झोनमध्ये राहणार आहात हे विसरू नका. **महिलांना:** महिलावर्गाने या कालवधीत आपल्या मनातील विचारांना पूर्णत्व देण्याच्या दृष्टीने हालचाल केली तर आपणाला सहज यश मिळेल. **शुभ दिनांक :** ०६, ०७.

## सामंजस्याने तोडगा काढा

**कर्क :** हा सप्ताह कर्क राशीधारकाने आर्थिकदृष्ट्या जपून पावले टाकण्याची गरज आहे. राजकीय क्षेत्रातील आपले कर्तव्य बिनादिक्कत पार पाडा. तुमचे वक्तृत्व योग्य दिशा दाखवणारे असेल, सध्याच्या कालावधीत घाईगडबड व पळापळीने आपला दिनक्रम करू नका. हळुवारपणाने वाटचाल राहू द्या. पोलीस, मिलिटरी, वैद्यकीय इत्यादी क्षेत्रांतील व्यक्तींना धाडसी पराक्रम करावे लागतील. जबाबदारीने उचललेले पाऊल यशस्वीरीत्या पार पडेल. निर्माण झालेल्या प्रश्नातून मार्ग निघेल. नोकरदार वर्गाला परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे लागतील. ठरलेला दिनक्रम बदलत जाईल. अनपेक्षित मिळालेल्या लाभातून योग्य गुंतवणूक करा. राजकारणातील वातावरण भडक होऊ देऊ नका. सामंजस्याने तोडगा काढा. नात्यातील गैरसमजाची वाढलेली दरी कमी होईल. वैवाहिक जीवनातील प्रयत्नांना संथ गती मिळेल. **महिलांना:** कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घेणे हिताचे राहील. आपण वाहन चालवत असाल तर काळजी घेऊन ते चालवा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड राहील. खाण्यापिण्यातील अतिरेक टाळा. **शुभ दिनांक :** ०२,०५

## महत्वाची कामे पूर्ण करा

**सिंह :** हा सप्ताह सिंह राशीसाठी प्रगतीकारक आहे, अनुभवी लोकांच्या योग्य मार्गदर्शाने महत्वाची कामे वेळेत पूर्ण करू शकाल. जुनी येणी वसूल होऊ शकतील त्या बाजूने प्रयत्न करा यश मिळेल. कौटुंबिक जीवनात आनंदाचे क्षण अनुभवाल; षष्ठ व अष्टमस्थानातून होणारे चंद्राचे भ्रमण मनाची चंचलता वाढवणारी आहे. तेव्हा सर्वच अपेक्षेप्रमाणे व्हावे. तूर्तास तरी बाजूला ठेवा. व्यावसायिक स्तरावर मोठी कसरत करावी लागेल. सध्या फार मोठी गुंतवणूक करणे टाळा. हिशोबाची नोंद ठेवायला विसरू नका. नोकरीत आकस्मिक घडामोडी होतील. कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करा. अनेक विचार बाजूला ठेवून कार्यमग्न राहा. पूर्वी केलेल्या बचतीतून खर्चाचे तंत्र वाढवू नका. सामाजिक भान ठेवायला विसरू नका. माहीत नसलेल्या गोष्टींवर न बोलणे केव्हाही चांगले. प्रेम प्रकरणापासून लांब राहा. **महिलांना:** महिलावर्गाने कुटुंबातील सर्व सदस्यांना जपण्याचा प्रयत्न करा. मानसिक एकाग्रता वाढवून अध्यात्मात मन रमवा. आरोग्य प्रश्नात वेळीच लक्ष घाला. घरात मोठी खरेदी करू शकाल. घरात पाहुणे आले तरी आपली धावपळ होऊन देऊ नका. **शुभ दिनांक :** ०१,०४.

## भूलथापांना बळी पडू नका

**कन्या :** हा सप्ताह कन्या राशीसाठी शत्रूची ताकद वाढवणारा आहे. विरोधक आपल्याला पाडण्यासाठी कोणत्याही पातळीवर जाऊ शकातात, आपण डोक्यात कोणताही राग न ठेवता आपले कार्य करा आपल्यापाठी चांगल्या कार्याची पोचपाबती उपयोगी पडणार आहे, या काळात न झेपणाऱ्या गोष्टींसाठी प्रयत्न करणे टाळा. कोर्ट प्रकरणात स्वःहून गुंतागुंत करू नका. कला, साहित्य, शिक्षण इत्यादी क्षेत्रांत स्पर्धा करणे टाळा. व्यवहार क्षेत्रात व्यवहाराच्या नोंदी सूक्ष्म स्वरूपात ठेवा. कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. ग्राहकांची फसवणूक होऊ देऊ नका. नोकरीत कामाव्यतिरिक्त भलताच प्रश्न उभा करू नका. आतापर्यंत पाठीशी असलेले लोक पाठ फिरवत नाहीत ना याचे निरीक्षण करा. मोठ्या खर्चावर वेळीच नियंत्रण आणा. सामाजिक गोष्टीतून नियोजनबद्ध आखणी करून मोठा विकास साधू शकाल. **महिलांना:** महिलावर्गाने संततीच्या आरोग्याची काळजी घ्या. जोडीदाराला सूचणाऱ्या कल्पना प्रगतीचे स्वप्न असेल. कौटुंबिक कार्यक्षमता वाढवा. दैव अनुकूल राहील. स्वतची तब्येत सांभाळून काम करा. मनात विचाराची गर्दी करू नका. **शुभ दिनांक :** ०२,०३

## वेळेचा सदुपयोग करा

**तुळ :** हा सप्ताह तुळ राशीसाठी समाधान कारक असणार आहे, संपत्ती विषयक प्रश्न आपल्या घरातून हळू हळू सुटू लागतील घरातील विरोधक ही आपल्याशी याबाबत बोलण्यास तयार होतील त्यामुळे यावेळेचा सदुपयोग करा. आपली उधारी आता वसूल होणार आहे त्याचे टेंशन घेऊ नका पुरेसा पैसा हाती येईल. सप्ताहाची सुरुवात ग्रहांची अनुकूलता असली तरीसुद्धा धाडसी प्रयोग टाळा. व्यावसायिक क्षेत्रात स्वतच्या कौशल्याचा वेगळा ठसा उमटवता येईल. वाढणाऱ्या कार्यशक्तीतून सहज मार्ग स्वीकारा. दुहेरी वाटेवरून आपली वाटचाल घसरू देऊ नका. जुन्या गोष्टी विसरणे हिताचे राहील. नोकरदार व्यक्तीला मिळणारी बढती लांबणीवर जाईल. ज्येष्ठांचा पाठिंबा असला तरी थांबावे लागेल. सध्या कोणालाही दुखवू नका. ठरवलेले काम करून घेण्याचा प्रयत्न करा. योग्य व अचूक नियोजन केल्यास यशाची खात्री मिळेल. **महिलांना:** महिलावर्गाने पैशाच्या बाबतीत अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मैत्रीच्या नात्यात व्यक्तीगत स्वार्थ साधू नका. सामाजिक कार्यात आपला सहभाग मर्यादित ठेवा. आपल्या वैवाहिक जोडीदाराची मानसिकता हट्ट स्वरूपाची राहील. **शुभ दिनांक :** ०४,०७

## अपूर्ण कामे पूर्ण करा

**वृश्चिक :** हा सप्ताह वृश्चिक राशीसाठी प्रयत्न वाळूचे कण रंगडीता तेल ही गळे हे अनुभवण्यास मिळणार आहे. या आठवड्यात आपण यश खेचून आणू शकता तुमच्यात ही जिगर आहे. पण बोलण्यात घालवता आपले तोंड बंद ठेवलेत तर बऱ्याच चांगल्या गोस्टी आपल्या हातातून जाणार नाहीत. सध्याच्या ग्रहस्थितीने संघर्षांतून सकारात्मक दृष्टी वाढवेल. व्यवसायिक क्षेत्रात ग्राहकांच्या असलेल्या मागण्या पूर्ण करण्यास वाव मिळेल. उत्पन्न वाढीचे परिणाम चांगले राहतील. उद्योगधंद्यातील आजवरचा असलेला अनुभव महत्त्वाचा ठरेल. नोकरीतील विशिष्ट पदासाठी तुमची निवड करण्यात येईल. अनेक प्रश्नांची मालिका उभी राहणार नाही याकडे लक्ष द्या. हातासरशी वाटणाऱ्या गोष्टी अवघड वाटू लागतील. आर्थिक प्रगती उत्तम राहील. सामाजिक क्षेत्रात थोरामोठय़ांच्या गाठी पडतील. मुलांच्या भविष्यासाठी केलेल्या तरतुदीचा फायदा होईल. एखाद्या मित्राची मोठी जबाबदारी घ्यावी लागेल. **महिलांना :** महिलावर्गाने भावंडांविषयी किंतु परंतु मनात ठेवू नका. घरगुती वातावरण आनंदीमय राहील. सांस्कृतिक कार्यक्रमांना तुमचा प्रतिसाद राहील. आध्यात्मिक जीवनात दिव्य अनुभूती येईल. तब्येतीत सुधारणा होईल. **शुभ दिनांक :** ०५,०६.

## बुध्दी कौशल्याचा वापर करा

**धनु :** हा सप्ताह धनु राशीसाठी अपेक्षा नसताना देणारा आहे ज्यावेळी अपेक्षा नसताना मिळते त्याचा आनंद गगनात मावत नाही. नवीन नोकरी, व्यवसाय या बाबत हालचाल करण्यास हरकत नाही एखादी संधि आपल्याकडे चालत येणार आहे. अकल्पित वस्तु घेताना चुकीच्या गोस्टी ना प्राधान्य देऊ नका. सध्याच्या ग्रहांची अवस्था कामातील खाचखळगे कमी करणारे असतील. इतरांच्या विचारापेक्षा स्वतच्या बुध्दी कौशल्याचा वापर करा. बुद्धिमत्तेच्या जोरावर व्यवसाय प्रगती साधू शकता. सध्या फार मोठ्या नफ्याची अपेक्षा ठेवू नका. कमीतकमी तोटा सहन करावा लागणार नाही. किरकोळ गोष्टीतूनसुद्धा समाधान मिळण्याचे संकेत जास्त वाढू शकतात. संशोधनाचे निष्कर्ष काढण्यात तुमचा हातखंडा मोठा असेल. नोकरीच्या समस्या कमी होतील. इतरांकडून घेतलेले हातउसने पैसे परत करून जबाबदारीतून बाहेर पडाल. व्यसनी लोकांपासून लांब राहा. **महिलांना:** महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. घरातील वृद्ध व्यक्तींच्या तब्येतीत सुधारणा होईल. योग साधनेला महत्त्व द्या. शारीरिक ताकद अजमावून पाहू नका. नंतर संधी मिळणार आहे फक्त थोडा संयम ठेवा. **शुभ दिनांक :** ०२,०७.

## अचानक धनलाभ संभवतो

**मकर :** हा सप्ताह मकर राशीसाठी संगतीचा परिणाम अधोगतीत तर होणार नाही ना हे पाहणे गरजेचे ठरेल. आर्थिक व्यवहारात प्रत्येक पाऊल जपून टाकणे महत्वाचे ठरणार आहे. आपण खोटे बोलण्या पासून आणि खोटे बोलणाऱ्या पासून लांब राहणे आपल्या भविष्यासाठी चांगले आहे, या कालावधीत कौटुंबिक कलह निर्माण करू नका. व्यवसायात जम बसेपर्यंत घाई करू नका. उधारीचे व्यवहार सध्या बंद ठेवा. रोख स्वरूपात असणारी गुंतवणूक फायदा मिळवणारी असेल. बिनभरवशाच्या व्यक्तीवर अवलंबून राहू नका. कामाच्या ठिकाणी वेळेला महत्त्व द्या. सुधारित घटनांचा क्रम नीट लावून घ्या. लेखनकार्याची आवड निर्माण होईल. कामानिमित्त वाढणारा संवाद तुमच्या वक्तृत्वाची दाद देईल. कर्जबाजारीपणा कमी होईल. आर्थिक साहाय्य उत्तम राहील. सामूहिक गोष्टींसाठी ठरवलेले नियोजन उत्तम जमेल. **महिलांना:** स्थावर मालमत्तेचे नियोजन करताना कागदपत्रांची नीट तपासणी करा. भावंडांची जबाबदारी पार पाडावी लागेल. सांस्कृतिक कार्यक्रमाची गोडी वाढेल. बारीकसारीक दुखण्याचा बाऊ करणे टाळा. संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा. **शुभ दिनांक :** ०३,०४,

## खर्चावर नियंत्रण ठेवा

**कुंभ :** या सप्ताहात आपल्या कडे यणाऱ्या पैशांची आवक वाढणार आहे, मात्र खर्चावर नियंत्रण ठेवणे भाग आहे, आपल्या मनाप्रमाणे कामे सुरळीत होणार आहेत. घरासाठी खर्च होईल. जागा जमीन यांचा व्यवहार करत असाल तर फायदा होईल. मोठी पार्टी चालून येईल थोडे कामाच्या पाठी लागा. यश मिळू शकेल, या ग्रहस्थितीमध्ये असणारा योग उत्तम राहील. अवतीभवतीचे चित्र मनासारखे असेल. व्यवसायाच्या दृष्टीने आगामी काळाचा अंदाज चांगला येईल. अनुकूलतेची चाहूल लागेल, पण ताटात वाढलेले पदार्थ प्रत्यक्षात तोंडात जाईपर्यंत काही होऊ शकते. नोकरदारांना मिळणारा थोरामोठय़ांचा विश्वास यातून चांगल्या गोष्टी घडवण्यासाठी सिद्ध व्हाल. मात्र चारी बाजूंनी आवश्यक असणारी खबरदारी घेणे आवश्यक ठरेल. या सगळ्यातून वाढणारी जबाबदारी विसरू नका. कोठेही कायद्याचे उल्लंघन करू नका. **महिलांना :** आपल्या नियोजनात अचूकपणा असेल तर कर्जफेड उत्तम प्रकारे कराल. सामाजिक क्षेत्रात काही चांगल्या घटनांमुळे आनंद वाढता राहील. कौटुंबिकदृष्ट्या शुभ गोष्टींचा ओघ राहील. स्वतःचे आरोग्यतंत्र सांभाळणे आवश्यक ठरेल. **शुभ दिनांक :** ०५,०६.

## जोडीदाराची उत्तम साथ मिळेल

**मीन :** हा सप्ताह मीन राशीसाठी चांगली बातमी मिळणार आहे. आपल्याला अपेक्षित असणारी बातमी मिळू शकेल एखादा जुना जिवलग मित्र मैत्रिणीची गाठभेट होईल, खूप दिवसांपासून मनात असलेलया गप्पांना बाहेर पडता येईल. मात्र भावनेच्या भरात वहात जाऊ नका, नाहीतर फसवणुकीला आपण अडवू शकणार नाहीत. दुसऱ्या बाजूला पती-पत्नीतिल दुरावा संपून जाईल, दुराव्याची जागा प्रेम घेईल, वहान खरेदीच्या बाजूने हालचाल करण्यास योग्य कालावधी आहे. एखाद्या पार्टीचे आमंत्रण येईल स्वतावर ताबा ठेवता येईल अशाच पार्टीला जा नाहीतर आपण हास्यापद होऊ शकाल, काळजी घेणे आपल्या हातात आहे, एका बाजूला मौजमज्जा आणि दुसऱ्या बाजूला आंगावर पडणाऱ्या जबाबदाऱ्यामुळे आपली मनस्थिति द्विधा होण्याचा संभव आहे. आपल्या सभोवतालचा माहोल करमणुकीचा असेल. कलाकारांना एकदा सन्मान मिळण्याच्या दृष्टीन हालचाल होईल. **महिलांना:** महिलावर्गाचे दिवस आनंदात जाणार आहेत प्रेम प्रकरणापासून लांब राहावे, पतिराजांच्या तब्बेतीची विशेष काळजी घ्यावी. त्यांना व्यसनांपासून लांब ठेवावे, जागरणाचा त्रास होऊ शकतो. **शुभ दिनांक :** ०२, ०७

## ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा
### ता. माणगांव, जि. रायगड.

नोटीस बोर्ड प्रसिद्ध दि.२५/२/२०२६

**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृती, इच्छीत ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि. ५/३/२०२६ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय मोर्बा येथे दुपारी १२.०० वाजेपर्यंत सादर करावे.

| अ. क्र | कामाचे नांव | योजनेचे नांव | अंदाजपत्रक रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | महिला कौशल्य प्रशिक्षण (२३-२४/२४-२५) | १५ वा वित्त | १४४२१९ | १ महिना |
| २ | शाळा पाणी शुद्धीकरण फिल्टर (२४-२५) | १५ वा वित्त | १५०००० | १ महिने |
| ३ | सॅनेटरी नाप्कीन (२४-२५) | १५ वा वित्त | १००००० | १ महिने |
| ४ | अंगणवाडी फर्निचर खरेदी (२४-२५) | १५ वा वित्त | १००००० | १ महिने |
| ५ | महिला आरोग्य शिबीर (२४-२५) | १५ वा वित्त | ७५००० | १ महिने |
| ६ | घंटागाडी दुरुस्ती व साहित्य खरेदी करणे (२५-२६) | १५ वा वित्त | १००००० | १ महिने |
| ७ | शाळा अंगणवाडी सोलर बसविणे | १५ वा वित्त | १२०९६६ | १ महिने |
| ८ | डम्पिंग ग्राउंडला सफाई करणे (२४-२५) | १५ वा वित्त | २००००० | १ महिने |
| ९ | सार्वजनिक ठिकाणी बेंच बसविणे (२४-२५) | १५ वा वित्त | १५०००० | १ महिने |
| १० | ग्रामपंचायत परिसर सुशोभीकरण करणे (२४-२५) | १५ वा वित्त | १५०००० | १ महिने |
| ११ | महाद्पोली आदिवासीवाडी निगडा आदिवासीवाडी पाण्याची टाकी पुरविणे | ग्रामनिधी | आवश्यकते नुसार | १महिने |

**अटी व शर्ती-**

१) प्राप्त निविदा दि.५/०३/२०२६ रोजी दु.१२.०० वाजता ग्रा. पं. मोर्बा येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उडत येतील.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच मोर्बा यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रक्कमा कपात केल्या जातील. मा.उपभियंता सो.बांधकाम उपविभा माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स.माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे पदाधिकारी/सदस्य यांचेमार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.
४) कामाचे देयकातून शासकीय कापती वजा करून देयक अदा केले जाईल. काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्या नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सूरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

सही/- **ग्रामविकास अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा ता.माणगांव जि.रायगड**

सही/- **सरपंच ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा ता.माणगांव जि.रायगड**

## जाहीर नोटीस

दिनांक : ०१ मार्च २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मधु रिकार्डो स्मिथ करिष्मा रिकाडो स्मित | ५६ | १/अ | ०-४१-०० | ० | ५० |
| | ५६ | १/ब | ०-३६-०० | ० | १५ |
| | ५६ | १/क | ०-८०-०० | ० | २८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
यदिनांक :-०१/०३/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे - मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीच्या मिळकती असून सदर मिळकती श्री.प्रशांत प्रकाश सावंत यांनी खरेदी करणेचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत.

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकती.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| श्री. रघुनाथ वासुदेव पिलाई | १५/२२ | ०.३०.०० यापैकी ०.०२.६५ हे.आर.चौ.मी. | ०.३६ |
| | १५/८ | ३.४७.०० यापैकी ०.०४.१८ हे.आर.चौ.मी. | ०.०५ |
| | २५/४/अ/२ | ०.३४.९० यापैकी ०.११.१९ हे.आर.चौ.मी. | ०.९५ |

**वरील प्रमाणे मिळकती त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा.**

त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कबजा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४(चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक-श्री. रघुनाथ वासुदेव पिलई यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक : ०१/०३/२०२६

सही /-
**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता शॉप नं.१६, श्री नेमीनाथ हाईटस्
मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८.
minakshibhase@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे - वडवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेल्या खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेल्या जमीन मिळकती आमचे अशील यांनी या जमीन मिळकतींचे विद्यमान मालक सुनीला प्यारेलाल शर्मा यांचेकडून कायम खरेदी खरेदी करणेचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे - वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| अ.नं | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १ | ४३/५ | ०.०४.०० | ०.०५ |
| २ | ४४/७ | ०.१७.०० | ०.१९ |
| ३ | ४६/६ | ०.०८.८० | ०.०६ |

सदरहू जमीन मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक यांच्या मालकीच्या व कब्जा वहिवाटीच्या आहेत असे ते सांगतात सदर जमीन मिळकती त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखतद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतींमध्ये कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची न आल्यास सदरहू जमीन मिळकती निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनींच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. ०१/०३/२०२६

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## घोषणा/नावात बदल

मी, PRATIK AJAYRAJ PUNAMIYA वडिलांचे नाव -AJAY MILAPCHAND PUNAMIYA, यांचा मुलगा, FLAT NO 2, LAXMI NIWAS, NR.DINDAYAL BANK, MAHAVIR MARG, PEN RAIGAD येथे राहणार आहे. मी प्रतिज्ञापत्राद्वारे (Affidavit) घोषित करतो की, मी माझे नाव बदलून PRATIK AJAY PUNAMIYA असे केले आहे. या पुढे मला PRATIK AJAY PUNAMIYA या नावानेच ओळखले जावे. जुने नाव :- PRATIK AJAYRAJ PUNAMIYA नवीन नाव :- PRATIK AJAY PUNAMIYA पत्ता:- FLAT NO 2, LAXMI NIWAS , NR.DINDAYAL BANK , MAHAVIR MARG, PEN RAIGAD

तारीख :- १/०३/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे-वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत भोगवटादार रकान्यामधील नमुद इसमाच्या खुद्द मालकीची मिळकत असून सदर मिळकत श्री. हृषिकेश शरद पोंक्षे यांनी खरेदी करणेचे ठरविले आहे. त्यामुळे, त्यासंदर्भात आम्ही सदर मिळकतीच्या मालकी हक्कांची पडताळणी करीत आहोत,

**-: जमीन मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| भोगवटाधारकाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| श्री.संजय प्रभाकर कडू निसरीन अमीर झवेरी | ५/१/ग | ०.९१.०० यापैकी क्षेत्र ०.३३.०० हे.आर.चौ.मी. | ०.४० |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत सर्वहक्कहितसंबंध यासुद्धा. त्याअर्थी विद्यमान मालकांव्यतिरिक्त सदर मिळकतीसंदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-पान, बक्षीस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा -कब्जा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश जप्ती, वहिवाट हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांच्या लेखी हरकती जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील विद्यमान मालक-श्री. संजय प्रभाकर कडू व निसरीन अमीर झवेरी यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन ना हरकत दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

कर्जत
दिनांक:०१/०३/२०२६

सही/-
**ॲडव्होकेट. मिनाक्षी जगन्नाथ भासे**
पत्ता -शॉप नं.१६, श्री नेमीनाथ हाईटस्,
मुद्रे (बुद्रुक), ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१.
मो.नं. ७४१०१४८१२१/७७९८१५११८८
minakshibhase@gmail.com

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची शेतजमिन मिळकत शिरीन अशरफ अनवारे, राहणार अलिबाग, यांच्या मालकीची असून सदरील शेत जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| उमटे, ता.अलिबाग. | १२७/२/अ | ०-१४-९०<br>०-००-८० पो.ख.<br>०-१५-७० एकूण | २-०० |

अलिबाग,
दिनांक : २८/०२/२०२६.

सही/
**(ॲड.संजय म.भगत )**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री.उत्तम परशुराम तिखंडे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-कडाव, तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड येथील जमिन मिळकत.**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ३३ | २ | ०.९२.३० पैकी ०.२०.५२ | १०.६९ |

सदर जमीन मिळकत ही वरील मालकाची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०१/०३/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. अशोक रामदास ताम्हाणे**
पत्ता. मु. सावळे, पो. मांडवणे,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९०२२३७८४५६

## जाहीर सूचना

जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, याखाली उल्लेखिलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेकरिता **("मालमत्ता")** (१) **सुरेखा जनार्दन कैनकर**, (२) **मंगेश जनार्दन कैनकर**, आणि (३) **शंकर जनार्दन कैनकर**, पत्ता - घर क्र. २०४, वावंढळ, रायगड, खालापूर, ४१०२०६; (४) **मंगल रोहिदास उत्तेकर**, पत्ता - मु. सापळे पोस्ट कोंढीवडे, तालुका कर्जत, कोंढीवडे रोड, ४१०२०१, रायगड, महाराष्ट्र; (५) **निर्मला अनंत कैनकर**, आणि (६) **सुनिल अनंत कैनकर**, पत्ता - वावंढळवाडी, वावंढळ रायगड, खालापूर, ४१०२०६, (७) **किशोर अनंत कैनकर**, आणि (८) **ज्ञानेश्वर अनंत कैनकर**, पत्ता - घर क्र. २०३, वावंढळ, वावंढळ रायगड, खालापूर, ४१०२०६ (एकत्रितरित्या, **"कैनकर कुटुंब"**) यांच्या हक्क, शीर्षक आणि हितसंबंधांची आम्ही तपासणी करीत आहोत.

मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाकरिता किंवा त्या संदर्भात विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, योजना, धारणाधिकार, प्रभार, वाटप, विकास करारपत्र, गहाणवट (न्याय्य किंवा अन्यथा), भेट, न्यास, मृत्युपत्र, वारसा, ताबा, भाडेकरार, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, अभिहस्तांकन, भाडेकरू, पोट-भाडेकरू, परवाना, काळजीवाहू आधारे, भागिदारी करारनामा, वहिवाट, विभागणी, कर्जे, प्राप्य बाबींचे हायपोथिकेशन, हमी, आर्थिक मोबदला, देखभाल, भोगवटा, हक्कसोड किंवा कोणत्याही करारपत्र, करारनामा, दस्तऐवज, मृत्युपत्राअंतर्गत, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, खटला, प्रलंबित कायदेशीर कारवाई, आरक्षण, प्रथम नकाराचा अधिकार, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा न्यायालयीन आदेश किंवा कोणत्याही प्राधिकरणाद्वारे पारित निवाडा किंवा कोणत्याही हुकूमाअंतर्गत किंवा कायद्याच्या प्रचलनाद्वारे, कंत्राट, विकास अधिकार किंवा एफएसआय वापर किंवा टीडीआर किंवा बोजा किंवा विकास क्षमतेच्या वापराचा अधिकार, करार किंवा कोणत्याही न्यासाअंतर्गत लाभार्थी हक्क/हितसंबंध, जुन्या वहिवाटीचा किंवा सर्वप्रथम खरेदीचा हक्क या मार्गे, अन्यथा कशाही प्रकारे कोणत्याही स्वरुपाचा कैनकर कुटुंब किंवा मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या शीर्षकामध्ये, करिता, पैकी किंवा वर कशाही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, हिस्सा, दावा, लाभ, आक्षेप, इस्टेट, मागणी आणि/किंवा हितसंबंध (**"दावे"**) असणाऱ्या **कोणत्याही** किंवा सर्व व्यक्तींनी (कोणत्याही बँका किंवा वित्तीय संस्था किंवा नॉन-बँकिंग वित्तीय संस्था किंवा इतर सावकार समाविष्ट) येथील दिनांकापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत त्याबाबत **objections@veritaslegal.in** येथे सर्व सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह आम्हाला लेखी सूचित करावे, असे न केल्यास अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे दावा(वे)/कथित दावा(वे)/आक्षेप, जर असल्यास, दुर्लक्षित केले/त्याग केले असे समजण्यात येईल आणि सर्व हेतू आणि कारणांकरिता सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल आणि कशाही प्रकारे कोणत्याही पद्धतीने बंधनकारक असणार नाही.

**वरील उल्लेखित अनुसूची**
(मालमत्तेचे वर्णन)

गाव वावंढळ, तालुका, खालापूर, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथे वसलेल्या, असलेल्या आणि स्थित सर्व्हे क्र. ७१, हिस्सा क्र. १ धारण केलेल्या, एकूण मोजमाप अदमासे १ हेक्टर - ३३ आर्स आणि ५० चौरस मीटर्स, समतूल्य ३ एकर्स आणि ३३ आर्स किंवा साधारण तेवढ्याच कृषिक जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे.

मालमत्तेच्या चतुःसीमा खालीलप्रमाणेः
उत्तरेस किंवा त्यादिशेनेः सर्व्हे क्र. ७० धारण केलेली जमीन;
पूर्वेस किंवा त्यादिशेनेः सर्व्हे क्र. ७९ धारण केलेली जमीन;
दक्षिणेस किंवा त्यादिशेनेः सर्व्हे क्र. ७५ धारण केलेली जमीन
पश्चिमेस किंवा त्यादिशेनेः सर्व्हे क्र. ७२ धारण केलेली जमीन

**दिनांकः ०१ मार्च, २०२६**

**व्हेरिटाज लीगल**करिता
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स
सही/-
**रुस्तम मुल्ला,**
भागिदार
फोर्बस बिल्डींग, १ ला मजला, चरणजित राय मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती, मिळकतीचे विद्यमान मालक १. विलास निळकंठ टिल्लू, रा. सी / ४०४, भगवती कृपा नं. २, राजाजी पथ, त्रिवेणी सोसायटी समोर, डोंबिवली पूर्व, जि. ठाणे ४२१२०१ आणि २. राजन निळकंठ टिल्लू, रा.६०३, स्वाती कोरस नक्षत्र, वर्तक नगर, ठाणे (प.), ४००६०६ यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा लेखी करार आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेला आहे. सदरच्या मिळकती निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | नगर भूमापन क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड | १०४४ | ३६७.०६ चौ.मी. | क-२ |
| | १०४४/के | ८८.६० चौ.मी. | ए |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.०१.०३.२०२६

**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक श्री.सुहास वासुदेव आंबरे, रा.अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड व श्री.निलेश सुरेश खोत, रा. रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| रेवदंडा ता.अलिबाग | १५७/१/१/ब/१अ | - | ०-३४-५०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण ०-३५-०० | १७.३५ |

वर नमूद मिळकतीपैकी श्री. सुहास वासुदेव आंबरे व श्री.निलेश सुरेश खोत यांचे मालकीहक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील ०-०५-६५ हे.आर., आकार रु.२.८४ पैसे या मिळकतीबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू गावठाण मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २८/०२/२०२६

सही /-
**ॲड.धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

दिनांक :०१ मार्च २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे जामरुंग, ता.खालापुर, जि.रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर.चौ.मीटर | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| मयुर कृष्णा ठाकुर प्रियांका मयुर ठाकुर | २७३ | १ | ००-३५-०० | ०१ | ६४ |
| | २७२ | | ०१-११-३० पैकी ००-२४-०० | ०१ | ०६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

सही /-
**ॲड.अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :-०१/०३/२०२६
मो. नं. ९९२२३६८१२१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेल्या बिनशेती जमिन मिळकती त्यांचे मालक श्री.जनक अमृतलाल गोरख व सौ.प्रिती जनक गोरख यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतींचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणेः

**मौजे - जामरुंग, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं.. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ. मी. ) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १०७ | ४/क/६५ | ४२५-०० | ४२-५० |
| १०७ | ४/ क/६८ | ४१२-०० | ४१-२० |

तरी वर नमुद मिळकतींशी कोणत्याही इसम, कंपनी, भागीदारी संस्था अथवा अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०१/०३/२०२६

**ॲड.तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को.ऑप.हौ.सो. ब्राम्हण आळी,
नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९८५०८००८१२३

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतींच्या हक्कनोंदपत्रकी पूर्वी सदू गणू ठोंबरे यांचे नावाची नोंद होती. ते मयत झाल्यानंतर त्यांचे वारस म्हणून शंकर सदू ठोंबरे व कृष्णा सदू ठोंबरे यांचे नाव लागणे अपेक्षित होते परंतु, त्यावेळी केवळ शंकर सदू ठोंबरे यांचे नाव सदर मिळकतीस लागले.

मी खाली सही करणार रेखा विजय पाटील पूर्वाश्रमीची रेखा कृष्णा ठोंबरे हिचे वडील कृष्णा सदू ठोंबरे यांचे नाव त्यावेळेस लबाडीने वगळण्यात आले होते. सदर मिळकतीमध्ये शंकर सदू ठोंबरे यांच्या वारसांइतकाच कृष्णा ठोंबरे यांच्या वारसांचा देखील हक्क व अधिकार आहे. मात्र ७/१२ उताऱ्यावर नाव असल्याचा गैरफायदा घेवून शंकर ठोंबरे यांचे वारस १.गजानन शंकर ठोंबरे २.रमेश शंकर ठोंबरे, ३.संतोष सुरेश ठोंबरे, ४.संजय सुरेश ठोंबरे, ५.सरिता जितेंद्र म्हात्रे सर्व रा.मिळकतखार पो.सारळ, ता.अलिबाग जि.रायगड आमचा हिस्सा व अधिकार नाकारत आहेत. शंकर सदू ठोंबरे यांचे वारस आमचा समान हिस्सा व अधिकार नाकारून सदर मिळकत तिऱ्हाईत इसमांस विक्री करणार आहेत असे आम्हाला खात्रीलायकरित्या समजले आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतींबाबत आमचा हक्क डावलून इतर कोणत्याही व्यक्तीशी सदर मिळकतीबाबत कोणत्याही अगर कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. तसे केल्यास सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर असेल व तो आमचेवर बंधनकारक रहाणार नाही.

**परिशिष्ट**

| अ. क्र | मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | मिळकतखार, ता.अलिबाग जि.रायगड | १५१ | ०-२८-५० | २-३१ |
| २ | | १५४ | ०-१२-९० | १-९४ |
| ३. | सारळ ता.अलिबाग जि.रायगड | २९६ | ०-२३-२० | ५-३८ |

कळावे.
दिनांक : २८.२.२०२६

सही/-
**रेखा विजय पाटील**
**पूर्वाश्रमीची रेखा कृष्णा ठोंबरे**

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागावमधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल),इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९९८४६१२
- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे.** वय २५ ते ४५ ९२७०५६०४५६
- **अलिबाग एसटी स्टँडजवळ दुकान गाळा** विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- **जाहिरात : 'विहीर' आपल्या शेती, वाडी, बंगला सोसायटीत पाण्याच्या** सोयीसाठी RCC रिंगाची विहीर बनवून घेण्यासाठी संपर्क करा. रणजित पाटील. फोन : ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७ अलिबाग

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**महाराष्ट्र शासन**
**वन विभाग**
**उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग रोहा यांचे कार्यालय,**
वन भवन, रोहा चणेरा रोड, रोहा, जि.रायगड, पिन-४०२१०९
दूरध्वनी क्र-०२१९४-२३५७५५ Email ID dycfroha@mahaforest.gov.in

## ई निविदा सूचना क्रमांक p३/२०२५-२६

उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग रोहा हे महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता बी-१ नमुन्यातील तिसऱ्या फेरीची निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर : http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उप वनसंरक्षक, रोहा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नाव :- डॉ. सी. डी. देशमुख जैवविविधता उदयान अंतर्गत मौजे जामगाव कं. नं. ३७९ पार्ट येथे जांभा दगडातील नैसर्गिक पदपथ तयार करणे, वनक्षेत्र : रोहा, ता. रोहा, जि. रायगड
अंदाजित किंमत रुपये :- १,७९,९५,७७४/-
ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक २७/०२/२०२६ ते दिनांक ०६/०३/२०२६
ई-निविदा उघडणे :- दिनांक ०९/०३/२०२६ रोजी कार्यालयीन कामकाज वेळेत (शक्य झाल्यास)
खालील संकेतस्थळावर ई-निविदेबाबतची सर्व सविस्तर माहिती उपलब्ध आहे.
१) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) उप वनसंरक्षक, रोहा यांचे कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र.ब/३०/योजना/ईनिविदा/४८७३/२०२५-२६
रोहा ४०२ १०९, दिनांक १६/०२/२०२६
उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग यांचे कार्यालय

सही/-
**(डॉ. शैलेंद्रकुमार जाधव)**
**उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग, रोहा**

नवी दिल्लीमध्ये नुकतेच 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' या जागतिक स्तरावरील एका मोठ्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिषदचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत एआयचे उपयोग, गैरवापर आणि नियमन यावर व्यापक चर्चा करण्यात आली. एआय तज्ज्ञ, विविध राष्ट्रांमधील उद्योजक, तज्ज्ञ तसेच गूगल, ओपन एआयसारख्या कंपन्यांच्या सीईओंनी हजेरी लावलेल्या या परिषदेला उपस्थित राहून घेतलेला आढावा.

# 'एआय'चे भवितव्य जोखणारी परिषद

कस्तुरी पाठक



काही वर्षांपूर्वी केवळ ठरावीक क्षेत्रांपुरते मर्यादित असलेले एआय अर्थात कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञान सर्वसामान्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. अगदी चार ओळींचा मेसेज किंवा फॉर्मल इमेल लिहायचा असला तरी सहज चॅटजीपीटी किंवा 'जेमिनी'ची मदत घेतली जाते. अनेक कंपन्या विशेषत: स्टार्टअप्स, जाहिरातींचे स्क्रिप्ट लिहीण्यापासून व्हिडिओ तयार करण्यापर्यंत सर्व कामे एआयच्या मदतीने करतात. थोडक्यात, आता आपण एआयला सरावलो आहोत. अशा वेळी एआयचे फायदे, उपयोग, संभाव्य धोके, नियमन आदी विषयांवर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विचारमंथन होणे गरजेचे होते. नेमका हाच धागा पकडून भारताने नवी दिल्लीमध्ये १६ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' या जागतिक स्तरावरील एका मोठ्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिषदचे आयोजन केले. हा भव्य सोहळा मध्यंतरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या आलिशान भारत मंडपम येथे आयोजित करण्यात आला. हा जगातील सर्वात मोठ्या एआय इव्हेंट्सपैकी एक मानला जात आहे. या परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यासाठी जगभरातून एआय तज्ज्ञ, व्यवसाय जगतातील मान्यवर, स्टार्टअप्स, विद्यार्थी अशा अनेकांनी हजेरी लावली. त्यात 'ओपन एआय'चे (चॅटजीपीटी निर्माते) प्रमुख सॅम ऑल्टमन, गूगल/अल्फाबेटचे सीईओ सुंदर पिचाई, अँथ्रोपिकचे सीईओ डॅरिओ अमोडी यांच्याबरोबरच हजारो स्टार्टअप्स आणि एआय प्रोडक्ट डेव्हलपर्स यांचा समावेश होता. त्याचबरोबर विविध टेक आणि मशीन लर्निंग कंपन्या, वीसहून अधिक देशांचे देशांचे राष्ट्राध्यक्ष, साठहून अधिक मंत्र्यांचे प्रतिनिधी, आणि पाचशेहून अधिक जागतिक एआय तज्ज्ञांनीही या परिषदेला हजेरी लावली. शिवाय येथे ३०० हून अधिक कंपन्या आणि स्टार्टअप्सनी त्यांचे तंत्रज्ञान आणि एआय आधारित उत्पादनांचे प्रदर्शन केले.

या परिषदेला 'जी २०' परिषदेचा दर्जा देण्यात आला होता. परिषदेचे मुख्य उद्दिष्ट्य म्हणजे एआय क्षेत्रात ग्लोबल साउथचा आवाज आणि प्रभाव वाढवणे, हे क्षेत्र केवळ अमेरिका किंवा युरोपियन युनियनपुरते मर्यादित राहू न देता विकसनशील देशांनाही एआय नियमन आणि उपयोगात भाग घेता यावा, वैश्विक नियम, नैतिकता, जबाबदार एआय, रोजगार आणि सामाजिक परिवर्तनाचा व्यापक विचार केला जावा, ही होती. एआय तंत्रज्ञान मानवासाठी उपयुक्त असले तरी त्याचे अनेक गंभीर धोकेही आहेत. एआयचे समर्थन करणाऱ्या तज्ज्ञांच्या मते हे तंत्रज्ञान मानवसेवेच्या क्षेत्रात सुधारणा करेल. यामुळे नियमित, खोट्या किंवा त्रुटीपूर्ण कामांपासून मुक्त होण्यास मदत होईल, एआयमुळे अनेक रोजगार जातील अशी भीती वाटत असली तरी एआयमुळे रोजगाराचे प्रकार बदलतील आणि अनेक नवे रोजगार अस्तित्वात येतील. एआय विरोधकांच्या मते एआयमुळे काही उद्योग आणि पारंपरिक कामे कमी होऊ शकतात, डेटा सुरक्षितता आणि गोपनीयतेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. अर्थात अद्याप तरी आंतरराष्ट्रीय पातळीवर यासंदर्भात ठोस नियमन नसल्याने एआयच्या दुरुपयोगाची मोठी भीती आहे. यामुळेच एआयचा वापर मानव कल्याणासाठी व्हावा, त्याच्या गैरवापरावर कडक निर्बंध असावेत अशी सगळ्यांचीच मागणी होती. त्यासाठी भारताने पुढाकार घेतला आणि 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६'च्या व्यासपिठावर सर्वंकष चर्चा घडवून आणली. यातून नक्कीच काही तरी चांगले घडेल याची खात्री वाटते.

## आंखो देखा हाल!

भारत मंडपम ही जागतिक दर्जाचे इव्हेंट्ससाठी दृष्टीने उत्तम जागा आहे. इथे अशा मोठ्या इव्हेंट्ससाठी लागणाऱ्या सर्व अद्ययावत पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. दालने आणि प्रदर्शनाची जागा प्रशस्त आणि भव्य आहेत. 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६'साठी सर्वांनाच मोफत प्रवेश असल्याने या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या किंवा त्यात रस असणाऱ्यासाठी ही मोठी पर्वणी होती. साहजिकच इथे मोठी गर्दीही होती. गर्दी आणि सुरक्षेचे उपाय यामुळे हव्या त्या दालनापर्यंत जाण्यासाठी किमान अर्धा ते पाऊण तास लागत होता. उपस्थितांमध्ये सुमारे ८० टक्के पुरूष असले तरी महिलाही मोठ्या प्रमाणावर हजर होत्या. या परिषदेला हजेरी लावणाऱ्यांमध्ये परदेशी नागरिकांची संख्याही मोठी होती. विशेष म्हणजे इथे अनेक लोक पारंपरिक वेशभूषांमध्ये दिसले. चर्चासत्रांमध्ये जागतिक किर्तीच्या दिग्गजांचा सहभाग असल्यामुळे उपस्थितांना त्यांचे अनुभवाचे बोल ऐकून या क्षेत्राच्या बऱ्याच 'इनसाईट्स' मिळाल्या. या ठिकाणी प्रदर्शनात अनेक कंपन्यांचे स्टॉल्स असल्यामुळे त्यांचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहिले. त्यामुळे या परिषदेच्या निमित्ताने स्टॉल्सना भेट देणाऱ्या आणि स्टॉल्सचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या मंडळींना 'बिझनेस नेटवर्किंग'ची मोठी संधी उपलब्ध झाली. जोशभरी परंतु आयोजनातल्या त्रुटी उजागर करणारी ही परिषद अविस्मरणीय ठरली.

हे आयोजन केवळ भारतातल्या संस्था किंवा उद्योजकांसाठी नव्हे, तर 'ग्लोबल साऊथ' म्हणजे दक्षिण गोलार्धात असलेले विकसनशील देश आणि जागतिक समुदायासाठी महत्त्वपूर्ण एआय संवादाचे एक केंद्र ठरले. भारत मंडपममध्ये एकीकडे विविध कंपन्यांच्या एआय सेवा आणि उत्पादनांचे प्रदर्शन सुरू होते तर दुसरीकडे एकाच वेळी विविध दालनांमध्ये एआयशी संबंधित विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती. सुमारे दीड तासाच्या चर्चासत्रांमध्ये जगातील विविध देशांमधून आलेल्या या क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश होता. या चर्चासत्रांमध्ये उपस्थितांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरेही दिली जात होती. अशी चर्चासत्रे रोज दिवसभर सुरू होती. त्यामुळे या क्षेत्रात कार्यरत असलेल्या आणि रुची असणाऱ्या मंडळींसाठी ही एक मोठी पर्वणी होती. या चर्चासत्रांमध्ये एआय आणि रोजगार, संधी आणि धोके, सुरक्षित आणि जबाबदार एआय, एआय आणि सर्वसमावेशक विकास, सुरक्षा आणि संरक्षणात एआय असे अनेक विषय चर्चिले गेले. यात तज्ज्ञांनी मुख्यत: एआयच्या उपयुक्ततेवर भर दिला. त्यांच्या मते एआयमुळे उद्योगक्षेत्रात आणि रोजच्या कामात बदल तर होणार आहेत, पण एआय रोजगारांचे स्थान घेणार नाही, तर नवी कौशल्ये आणि संधी निर्माण करेल. काही तज्ज्ञांच्या मते एआयमुळे पारंपरिक नोकऱ्यांमध्ये बदल दिसून येईल आणि या बदलाशी जुळवून घेण्यासाठी नवी कौशल्ये आत्मसात करावी लागतील आणि त्यासाठी प्रशिक्षण आवश्यक आहे.

या चर्चासत्रांमध्ये तज्ज्ञांनी एआयचा अवैध किंवा हानीकारक वापर होऊ नये, यासाठी जागतिक स्तरावर नियमन आणि मार्गदर्शक तत्त्वे बनवण्याचा आग्रह ठेवला. अर्थातच त्याला विविध राष्ट्रप्रमुख, राजकीय नेते आणि कएआय कंपन्यांचे सीईओ आदींनी अनुमोदन दिले. यात विशेषत: सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर एआयचा वापर कसा मर्यादित करायचा किंवा चुकीची माहिती कशी रोखायची, यावर सखोल चर्चा झाली. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी एआय कसे वापरता येईल, भाषा अनुवादाचे एआय उपयोजन, ग्रामीण भागात एआय आधारित सेवांचा वापर यावरही चर्चा करण्यात आली. भारतीय लष्कराने वेहिकल ट्रॅकिंग सिस्टीम, डीपफेक डिटेक्शन, एआय फेशियल रेकग्निशन सिस्टीम अशा एआय आधारित प्रकल्पांचे विविध उपयोग सादर केले. या प्रकल्पांची भविष्यात सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनात मोठी मदत होऊ शकेल. समिटमध्ये केवळ चर्चासत्रेच आयोजित करण्यात आली होती, असे नाही तर विविध एआय सेवा, उत्पादने आणि तंत्रज्ञानाचे प्रदर्शनही आयोजित करण्यात आले. यात शिक्षणात एआयचे उपयोग, आरोग्यसेवांमध्ये एआयचा वापर, सुरक्षा तंत्रज्ञान– डीपफेक शोध, चेहरे ओळख (फेशियल रेकग्निशन), वेहिकल ट्रॅकिंग, पर्यावरण आणि मशीन लर्निंग आधारित डेटा मॉडेल्स, व्यापार आणि कृषि, सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापन अशा अनेक क्षेत्रांमध्ये एआयचा उपयोग किती प्रभावी पद्धतीने करण्यात येत आहे, याची माहिती मिळाली. शिक्षणात तर भाषा अनुवाद, डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्म्स यासाठी एआयचा वापर होतच आहे, पण आरोग्यसेवांमध्येही एआय मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहे. एमआरआय, एक्स रे आणि विविध चाचण्यांच्या रिपोर्टसवरून एआयच्या मदतीने व्याधी निदान केले जात आहे. त्यात अचूकताही येत आहे आणि विशेष म्हणजे या निदानाला अगदी नगण्य वेळ लागत आहे. सुरक्षा तंत्रज्ञानात डीपफेक शोधणे, फेशियल रेकग्निशन, वेहिकल ट्रॅकिंग यामुळे मानवी चुका होण्याची शक्यता खूपच कमी झाली आहे.

उर्जा व्यवस्थापन, हवामान अंदाज अशा क्षेत्रांमध्ये मशीन लर्निंग आधारित डेटा मॉडेल्सचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. हे आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये सुरू झालेला एआयचा वापर या प्रदर्शनात दिसून आला. विशेषत: डेटा ॲनॅलिसिस करावे लागणाऱ्या क्षेत्रांसाठी तर एआय आणि मशिन लर्निंग वरदान ठरत आहे. एका कंपनीने क्रिकेट प्रशिक्षणात एआय किती महत्त्वाची भूमिका बजावू शकते, याचे प्रात्यक्षिक दाखवले. यात खेळाडूच्या गोलंदाजी किंवा फलंदाजीच्या शैलीचे चित्रीकरण करून एआयकडून विश्लेषण केले जाते. यात त्या खेळाडूच्या अगदी बारीक चुकाही दाखवल्या जातात आणि त्यात काय सुधारणा हवी आहे, ते सांगितले जाते. त्यामुळे प्रशिक्षकांचे आणि खेळाडूंचे काम सोपे होते. हे तंत्रज्ञान जनजीवनात विविध समस्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न करत आहे. पुरुष, स्त्री, युवा किंवा वृद्ध अशा सर्वांनाच एआयचा लाभ मिळू शकेल. 'एआय इम्पॅक्ट समिट २०२६' सर्वसमावेशक, जागतिक दृष्टिकोनातून एआयचा उपयोग, धोके, नियम, सामाजिक परिणाम आणि करिअरच्या संधी याबद्दलची साधकबाधक चर्चा करणारे मोठे व्यासपीठ ठरले. या समिटचा प्रभाव सुगम एआय आणि एआय–एनेबल्ड भविष्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

**

# 'काजूचे बोंड आणि आमचा 'तो' मद्यनिर्मितीचा भन्नाट प्रयोग!

धनंजय शेटये



कोकणची लालबुंद माती म्हणजे साक्षात निसर्गदेवतेने उधळलेला एक जिवंत आणि चैतन्यमयी चमत्कार! याच मातीच्या कुशीत रुजलेला आणि प्रत्येक कोकणी माणसाच्या काळजाचा ठोका चुकवणारा एक रसाळ मेवा म्हणजे 'काजूचे बोंड' किंवा अस्सल मालवणी बाजातील आपले 'बोंडू'. आज काजूगर जगभराच्या बाजारपेठेत रुबाबात मिरवत असला तरी, बोंडूची ती गोड, आंबट आणि काहीशी तुरट चव ज्याच्या जिभेवर रेंगाळली, तोच खरा नशीबवान! विज्ञानाच्या भाषेत हे 'आभासी फळ' असले, तरी पिवळ्या, केशरी आणि लालजर्द रंगांची उधळण करत फांदीवर डोलणारे हे बोंडू पाहिले की, आजही तोंडाला पाणी सुटल्यावाचून राहत नाही.

### आरोग्याचे आणि गुणांचे चालते–बोलते भांडार

अनेकांकडून दुर्लक्षित राहणारे हे बोंडू म्हणजे केवळ चवीचाच नाही, तर आरोग्याचाही खजिना आहे. 'क' जीवनसत्त्वाचा हा जणू मुकुटमणीच! एका बोंडूमध्ये संत्र्यापेक्षा तब्बल पाच ते सहा पट अधिक 'व्हिटॅमिन सी' दडलेले असते. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी हा निसर्गाचा थेट डोस आहे. पाण्याचे आणि चोथ्याचे (फायबरचे) विपुल प्रमाण असल्याने पोटाच्या आरोग्यासाठी हा परममित्र ठरतो. पोटातील अल्सर आणि संसर्ग दूर करण्याचे अद्भुत गुणधर्म याच्या रसात सामावलेले आहेत. मात्र, बोंडूची साल अत्यंत नाजूक असते. झाडावरून काढल्यावर चोवीस तासांतच ते खराब होऊ लागत असल्याने, आंब्या–सफरचंदाप्रमाणे ते शहराच्या चकचकीत बाजारात कधीच रुबाब मारू शकले नाही. त्याची खरी चव चाखायची असेल, तर थेट कोकणचीच वाट धरावी लागते!

### निरोची गोडी आणि फेणीची भुरळ

बोंडूची तुरट चव शमवण्यासाठी त्याला मिठाच्या पाण्यात बुडवून किंवा थोडे मीठ लावून खाण्याची कोकणातली पद्धत म्हणजे एक वेगळीच मजा! याच बोंडाचा न आंबलेला, ताजा आणि मधुर रस म्हणजे 'निरो'. उन्हाळ्याच्या काहिलीत हे जणू अमृतच भासते. याच रसाला आंबवून गोव्यात जगप्रसिद्ध 'काजू फेणी' तयार केली जाते. याशिवाय जॅम, सरबत आणि वाईनच्या रूपातही हा बोंडू आपले गारूड पसरवतो.

### बालपणीचे खेळ आणि आंबट–गोड आठवणी

स्मृतींच्या हिंदोळ्यावर मागे गेले की, काजूच्या गर्द बागा आणि आमची वानर–सेना डोळ्यांसमोर जिवंत होते. त्या काळात प्रत्येकाच्या परसात काजूची अमाप झाडे लकाकत असायची आणि काजू बियांचीही चंगळ असायची. बोंडांच्या बारीक फोडी करून, त्यावर मीठ–मसाला पेरून जे झणझणीत 'लोणचं' तयार व्हायचं, त्यापुढे आजचे पिझ्झा–बर्गरही फिके वाटतील! अंगणातल्या खळ्यात एक छोटा गोल खड्डा करून 'गलींने काजू खेळणे' हा तर आमचा ऑलिम्पिक स्तरावरचा खेळ. जिंकलेल्या काजूच्या बिया देऊन सायकलवरच्या 'आईसफ्रुट' वाल्याकडून बर्फाचा गोळा खाण्यात जो राजेशाही थाट असायचा, त्याची सर जगातल्या कोणत्याही पंचतारांकित सुखाला नाही.

आमचा 'तो' महाप्रयोग: मिशन काजू फेणी!

लहानपणी आमच्या या उपद्व्यापी डोक्याला नवनवीन प्रयोगांचे एक विलक्षण वेड होते. मी आठवीत असतानाची ही गोष्ट! गावोगावी काजूच्या बोंडांपासून 'कोकण मेवा' म्हणजेच फेणी गाळणारे लोक आम्ही पाहिले होते. मग आपणही हा 'सायंटिफिक' प्रयोग का करू नये? असा विचार करून आम्ही मित्रांनी एक अत्यंत गुप्त योजना आखली.

एका पठ्ठ्याने स्वत:च्याच घरातल्या न्हाणीघरातले मडके अलगद गायब केले. धारगिरेश्वर मंदिराच्या घनदाट, जिथे माणसाची सावलीही फिरकत नसे अशा वनराईत आमची 'गुप्त प्रयोगशाळा' थाटली गेली. मडक्याला भोक पाडून पोकळ बांबू घुसवला, शाडूच्या मातीने तो सीलबंद केला आणि त्यात कुजवून घेतलेला बोंडांचा रस ओतला. बांबूच्या दुसऱ्या टोकाला वाफ गोळा करण्यासाठी दुसरे मडके लावून, वाफेचे पाणी व्हावे म्हणून त्यावर सतत थंड पाणी मारण्याची ड्युटी एका मित्राकडे सोपवली. शाळेत विज्ञानाच्या बाईंनी शिकवलेली 'उर्ध्वपातन क्रिया' आम्ही पोरांनी थेट जंगलात अगदी यशस्वीपणे राबवली होती!

### 'तात्या गावडे' आणि टेस्टिंगचा तो निकाल...

आमची 'होममेड काजू फेणी' तयार तर झाली, पण ती 'अस्सल' झालीय की नाही हे तपासणार कोण? त्यासाठी एका तज्ज्ञ 'टेस्टिंग इंजिनिअर'ची गरज होती. आमची पारखी नजर पडली ती गावातील अस्सल मद्यप्रेमी 'तात्या गावडे'वर! बनवलेली फेणी एका कॅनमध्ये भरून आम्ही एका मित्राच्या शेत–मांगराच्या पाठल्यादारी चुलीतल्या राखेच्या ढिगात लपवून ठेवली होती. योगायोगाने तात्या काही कामानिमित्त तालुक्याला निघाला होता. आम्ही त्याला वाटेतच गाठले आणि 'टेस्टिंग'साठी चक्क एक पेला पुढे केला. पोरांचा हा आगाऊपणा पाहून तात्या आधी प्रचंड भडकला, पण कडक फेणीचा तो पेला पाहिल्यावर त्याने क्षणाचाही विलंब न लावता तो एका श्वासात घशाखाली उतरवला.

पुढच्या अवघ्या दहा मिनिटांत आमच्या प्रयोगाचा निकाल लागला '१००% सक्सेस फुल!' आमची दारू एवढी कडक होती की, तालुक्याला निघालेला तात्या चक्क 'पोपट झाला' आणि संध्याकाळी चार वाजेपर्यंत त्या शेत–मांगरातच बेशुद्ध पडून राहिला!

आज हे सारे आठवले की आमच्या त्या बालपणीच्या उपद्व्यापी आणि 'संशोधक' वृत्तीचे जाम हसू येते. तो बालपणीचा सुवर्णकाळ, काजूच्या गर्द बागा आणि कोकणच्या लाल मातीतले ते आमचे भन्नाट प्रयोग आता केवळ गोड आठवणींच्या कुपीतच दरवळत आहेत!

**

# लाल कॉरिडॉरवर सूर्यास्त

दीपक नायक



भारतातील कम्युनिस्ट पक्ष–माओवादी (सीपीआय–माओवादी) च्या बंडखोरी, ज्याला एकेकाळी देशाच्या ''सर्वात मोठा अंतर्गत सुरक्षेचा धोका'' म्हणून वर्णन केले जात होते, ती ऐतिहासिक वळणावर पोहोचली आहे. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी, थिप्परी तिरुपती उर्फ देवजी उर्फ देवूजी उर्फ देवजी उर्फ संजीव उर्फ चेतन उर्फ रमेश उर्फ कुम्मा उर्फ शंकर उर्फ शेषू उर्फ जगन उर्फ सुदर्शन उर्फ देवान्ना (६०), सीपीआय–माओवादीचे सरचिटणीस, रणनीतिकार आणि केंद्रीय लष्करी आयोगाचे (सीएमसी) प्रमुख यांनी तेलंगणा पोलिसांना आत्मसमर्पण केले. त्यांच्या आत्मसमर्पणाला गेल्या काही दशकांमध्ये बंडखोरीने सामना केलेल्या सर्वात महत्त्वाच्या उलथापालथींपैकी एक म्हणून वर्णन केले आहे. अनेक वृत्तांनुसार, 'केंद्रीय समिती (सीसी)' आणि 'पॉलिटब्युरो'चे सदस्य देवजी आणि मल्ला राजी रेड्डी उर्फ संग्राम (७६) यांनी २१ कार्यकर्त्यांसह तेलंगणा पोलिसांच्या विशेष गुप्तचर ब्युरो (एसआयबी) समोर आत्मसमर्पण केल्याचे वृत्त आहे. देवजींचे आत्मसमर्पण हे बंडखोरांसाठी केवळ रणनीतिक नुकसान नाही – ते चळवळीच्या मध्यवर्ती मज्जासंस्थेचे प्रतीकात्मक पतन दर्शवते. डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादाचे (एलडब्ल्यूई) उच्चाटन करण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाच्या ३१ मार्चच्या अंतिम मुदतीच्या काही आठवड्यांपूर्वी, ही घटना दशकांपासून चालणाऱ्या संघर्षात निर्णायक बदल घडवून आणण्याचे संकेत देते.

२. देवजींचे आत्मसमर्पण सीपीआय–माओवादीच्या संघटनात्मक रचनेत गंभीर बिघाड दर्शवते. २१ मे २०२५ रोजी सुरक्षा दलांनी (एसएफ) केलेल्या एका मोठ्या सामरिक धक्क्यात मारले गेलेल्या दिवंगत नंबला केशव राव उर्फ बसव राजू यांच्यानंतर दीर्घकाळ कमांडर आणि रणनीतिकार म्हणून काम करणारे देवजी हे गटाच्या लष्करी नियोजनात आणि पीपल्स लिबरेशन गेरिला आर्मी (पीएलजीए) ऑपरेशन्समध्ये केंद्रस्थानी होते.

३. अधिकाऱ्यांनी त्यांच्या जाण्याला बेकायदेशीर संघटनेच्या कमांड एकतेसाठी ''घातक धक्का'' असे वर्णन केले आहे. देवजींच्या वरिष्ठतेच्या नेत्याला पकडणे किंवा आत्मसमर्पण करणे हे असामान्य आहे आणि असे सूचित करते की वरिष्ठ माओवादी नेतृत्व बस्तर, अबुझमार आणि लगतच्या वनपट्ट्यांमध्ये गनिमी कारवाया टिकवून ठेवण्यास असमर्थ ठरू शकते, सततच्या एसएफ दबावाखाली भरती, कार्यकर्त्यांची देखभाल आणि शस्त्रास्त्रांचा साठा राखण्यात वाढत्या अडचणी येत आहेत.

४. देवजीचे आत्मसमर्पण हे महिन्यांच्या समन्वित एसएफ ऑपरेशन्सनंतर झाले आहे, विशेषतः करेगुट्टा टेकड्यांमध्ये (तेलंगणा आणि छत्तीसगडच्या सीमेवर), जिथे अधिकाऱ्यांनी ऑपरेशनल अड्डे उद्ध्वस्त केले आणि स्फोटक उपकरणे जप्त केली, वारंवार नेतृत्व क्लस्टर्सना लक्ष्य केले आणि संप्रेषण लाईन्समध्ये व्यत्यय आणला.

५. या सरकारच्या दृष्टिकोनामुळे – जो बळाचा धोका आणि सामाजिक–आर्थिक प्रोत्साहने यांचा मेळ घालतो – गेल्या दोन वर्षांत आत्मसमर्पणाच्या प्रवाहात सातत्याने वाढ झाली आहे. अधिकाऱ्यांचा असा दावा आहे की अशा योजनांद्वारे शेकडो माओवादी नेते आणि कार्यकर्ते आधीच 'समाजाच्या मुख्य प्रवाहात पुन्हा सामील' झाले आहेत.

६. देवजींचे आत्मसमर्पण एक उत्प्रेरक म्हणून काम करू शकते, ज्यामुळे उर्वरित माओवादी कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पक्षांतर होऊ शकते, मनोबल आणि संघटनात्मक सुसंगतता कमी होऊ शकते आणि सशस्त्र संघर्ष सुरू ठेवण्यावरून पक्षात फूट पडण्याची शक्यता आहे. तथापि, काही कट्टरपंथी शेवटपर्यंत लढण्याचा पर्याय निवडू शकतात. परिणामी, संघटित बंडखोरीचा पराभव झाल्याचे घोषित करणे अकाली ठरेल. नेतृत्व गमावले असूनही, सशस्त्र कार्यकर्त्यांचे तुकडे कायम आहेत, विशेषतः घनदाट जंगलातील प्रदेशात. शिवाय, बंडखोरीला चालना देणाऱ्या संरचनात्मक मुद्द्यांचे अर्थपूर्ण निराकरण न करता, ऑपरेशनल ताकद कमी झाली तरीही, सशस्त्र बंडाचे वैचारिक आकर्षण कायम राहू शकते.

७. देवजींचे आत्मसमर्पण हे माओवादी बंडखोरीविरुद्धच्या भारताच्या प्रदीर्घ लढाईत एक धोरणात्मक वळण आहे, जे प्रतिबिंबित करते. हे सीपीआय–माओवादी अंतर्गत सततच्या सुरक्षा दबाव, धोरणात्मक पुनर्वसन प्रोत्साहने आणि वाढती संघटनात्मक कमकुवतपणाचा परिणाम प्रतिबिंबित करते. तथापि, बंडखोरीचा हा निश्चित अंत असल्याचे घोषित केल्याने अतिसरली करणाचा धोका निर्माण होतो. नेतृत्वाची पोकळी आणि सलग आत्मसमर्पण हे ऑपरेशनल क्षमता कमकुवत करतात, परंतु संघर्षाची संरचनात्मक मुळे, केडर नेटवर्कचे वितरित स्वरूप आणि प्रभावित प्रदेशांमधील सामाजिक–आर्थिक आव्हाने पुढे काय होईल याचे निर्धारक आहेत.

**संशोधन सहकारी,**
**संघर्ष व्यवस्थापन संस्था**

**

# सत्य शिव सुंदर : विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासाचा खरा आधार

सुनील गवळी



''जे सत्य आहे तेच अंतिम आहे, तेच शिव आहे आणि तेच सुंदर आहे'' ही केवळ तात्त्विक वाक्यरचना नसून जीवन जगण्याची दिशा आहे.

मानवाच्या विचारांमध्ये, आचरणात आणि निर्णयांमध्ये वास्तव स्वीकारण्याची क्षमता निर्माण झाली की व्यक्तिमत्त्व खऱ्या अर्थाने घडते.

अंधानुकरण, परंपरेचा चुकीचा आग्रह किंवा कोणत्याही सामाजिक दबावाला बळी न पडता सत्य, विवेक आणि वर्तमान यांचा स्वीकार करणे हेच खरे अध्यात्म आहे.

१. सत्य म्हणजे काय?

सत्य म्हणजे केवळ बोलण्यातली प्रामाणिकता नव्हे;

तर स्वत:ला, परिस्थितीला आणि कर्तव्याला ओळखणे.

जे आहे ते स्वीकारणे

चुकीचे असल्यास बदलण्याची तयारी ठेवणे.

दिखावा न करता वास्तवाशी प्रामाणिक राहणे

सत्य हे कधी कधी कठीण असते, पण तेच मनाला शांतता देते.

म्हणूनच भारतीय तत्त्वज्ञानात सत्याला ''शिव'' (कल्याणकारी) म्हटले आहे.

२. शिव म्हणजे कल्याण सत्याचा परिणाम

जे सत्य असते ते दीर्घकाळासाठी हितकारक असते.

खोटेपणा, अंधश्रद्धा किंवा भ्रामक प्रतिष्ठा तात्पुरती सुख देतात;

परंतु सत्य व्यक्तिमत्त्वाला स्थैर्य देते.

भगवद्गीता मध्ये सांगितले आहे

स्वधर्म आणि कर्तव्य यांचे आचरणच मनुष्याचे खरे उन्नयन करते.

याचा अर्थ : स्वत:ची जबाबदारी ओळखून जगणे हेच अध्यात्म.

३. सुंदर म्हणजे बाह्य नव्हे अंतर्मनाची निर्मळता

खरे सौंदर्य हे रूपात नसते; ते विचारात, आचरणात आणि स्वभावात असते.

प्रामाणिक विद्यार्थी सुंदर असतो.

मेहनती विद्यार्थी सुंदर असतो.

इतरांना मदत करणारा विद्यार्थी सुंदर असतो.

अशा सुंदरतेला कोणतीही सजावट लागत नाही.

४. अंधानुकरण का टाळावे?

समाजात अनेकदा परंपरा, रूढी किंवा व्यक्ती यांच्या नावाखाली विचार न करता कृती केली जाते.

विद्यार्थ्यांनी हे लक्षात ठेवावे:

परंपरा तेव्हाच योग्य जेव्हा ती विवेकाशी सुसंगत असते.

अंधानुकरणामुळे : विचारशक्ती कमी होते आत्मविश्वास घटतो. व्यक्तिमत्त्व कृत्रिम बनते

५. तात्त्विक उदाहरणे

स्वामी विवेकानंद यांचा दृष्टिकोन

यांनी सांगितले :

''मनुष्याने स्वत: विचार केला पाहिजे; भीतीतून नव्हे तर सत्यातून जगले पाहिजे.''

ते अंधश्रद्धेपेक्षा तर्क, अनुभव आणि आत्म विश्वास यांना महत्त्व देत.

महात्मा गांधींचा सत्याचा प्रयोग

यांनी आपल्या जीवनाला

''सत्याचे प्रयोग'' असे नाव दिले.

त्यांनी सांगितले :

सत्य हेच ईश्वर आहे.

सत्य आचरणातूनच समाज परिवर्तन घडते.

त्यांच्या जीवनात दिखावा नव्हता. साधेपणा आणि सत्य होते.

६. विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासासाठी या विचारांचा उपयोग

१. वास्तव स्वीकारण्याची सवय लावा.

अपयश आले तर कारण शोधा ; बहाणे करू नका.

२. तुलना नको आत्मओळख हवी

स्वत:ची क्षमता ओळखणारा विद्यार्थीच पुढे जातो.

३. प्रश्न विचारण्याची सवय ठेवा

विचार करणारा विद्यार्थीच खऱ्या अर्थाने शिकतो.

४. दिखाव्यापेक्षा प्रामाणिक प्रयत्न करा

मार्क्सपेक्षा ज्ञान महत्त्वाचे.

५. वर्तमानात जगायला शिका

भूतकाळाची खंत आणि भविष्याची भीती दोन्ही विकास थांबवतात.

७. व्यक्तिमत्त्व विकासाचे सूत्र

सत्य विचार, योग्य कृती, आत्मविश्वास सुंदर व्यक्तिमत्त्व निष्कर्ष

''सत्यशिवसुंदर'' ही संकल्पना केवळ धार्मिक नाही; ती मानसिक, नैतिक आणि शैक्षणिक विकासाची जीवनपद्धती आहे.

विद्यार्थ्यांनी अंधानुकरण टाळावे

विवेकाने निर्णय घ्यावेत. वर्तमानाचा स्वीकार करावा. सत्याशी नाते जोडावे

असे विद्यार्थीच भविष्यात जबाबदार नागरिक आणि सक्षम नेतृत्व घडवतात.

**

# भोंदू साधूच असतात का ?

जगन घाणेकर

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची एक जाहिरात नुकतीच पाहण्यात आली. 'स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा. भोंदूगिरीवर नाही' असा संदेश या जाहिरातीतून देण्यात आला आहे. या जाहिरातीत एका साधुचे व्यंगचित्र रेखाटण्यात आले आहे. दाढी आणि जटाधारी साधूच्या दंडाखाली छडी दाखवण्यात आली असून हातात कमंडलू रेखाटण्यात आले आहे. कपाळावर भस्म, दंड, मनगट आणि जटेला रुद्राक्षाच्या माळा दाखवण्यात आल्या आहेत. तर कटीला व्याघ्रचर्म गुंडाळलेले दिसत आहे. या व्यंगचित्राच्या माध्यमातून भोंदू साधु असे दिसतात हे सरकारला दाखवायचे आहे का ? साधूच्या कपाळावर रेखाटण्यात आलेले भस्म हे भगवान शिवांच्या वैराग्याचे प्रतीक आहे. दंडाला रुद्राक्षाच्या माळा, कटीला व्याघ्रचर्म, दंडाला छडी आणि हाती कमंडलू ही सुद्धा भगवान शिवांच्या आणि दत्तगुरूंच्या चित्रांमध्ये आणि मुर्त्यांमध्ये आपल्याला प्रकर्षाने दिसून येतात. त्यामुळे शिवभक्तांना आणि दत्त भक्तांना या साऱ्या गोष्टी वंदनीय आहेत. या साऱ्या बाबी वैराग्याचे प्रतीक असल्याने संसारातील सुख सुविधांचा त्याग केलेले साधू संत सुद्धा या गोष्टी आपल्या जवळ बाळगतात.

मोहमायेचा परित्याग करून ईशचिंतनामध्ये आपले उर्वरित अखंड आयुष्य समर्पित करणारे आणि जगाच्या कल्याणासाठी हिमालय आणि तत्सम निर्जन ठिकाणी वर्षोनुवर्षे ध्यानधारणा करणारे साधू संत हे या भारतभूमीचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने त्यांचे विराट रूप आपल्याला पाहायला मिळते. पुढच्या वर्षी नाशिक नगरीत साधू संतांची हीच मांदियाळी आपल्याला राज्यात अवतरलेली पाहायला मिळणार आहे. साधूंना भोंदू म्हणून हिणवणारी राजकीय मंडळी त्यावेळी आलेल्या साधू संतांच्या चरणाशी लोटांगण घालताना दिसून येतील. त्यामुळे साधू हे भोंदू असतात कि समाजातील दीनदुबळ्यांचे कल्याण करणारे असतात हे सरकारला आधी ठरवावे लागेल. सरकारी जाहिरातीवर भोंदू म्हणून साधूचे व्यंगचित्र दाखवणे म्हणजे सरसकट सर्वच साधूंना भोंदू म्हणून हिणवण्याचा प्रकार नव्हे का ? आज भोंदूगिरी केवळ हिंदू धर्मातच आहे का? आजही अनेक दर्ग्यांमध्ये भूतबाधा काढण्याच्या नावाखाली लोकांना साखळदंडाने बांधले जाते, त्यांना धुरी दिली जाते, वेताच्या काठीने मारहाण केली जाते, चटके दिले जातात. ही भोंदूगिरी सरकारला दिसत नाही का ? पांढऱ्या वेशात दारोदारी येऊन, लोकांना फुकटात पुस्तिका वाटणारी, असाध्य रोग बरे करण्याच्या दावा करणारी, तुमचे देव विसर्जन करण्यास सांगणारी, लोकांच्या गरिबीचा आणि असहायतेचा फायदा घेऊन काही पैशांच्या, अन्नाच्या किंवा वैद्यकीय सुविधांच्या बदल्यात त्यांचे धर्मांतरण करणारी आणि हजारोंच्या उपस्थितीत स्टेजवर एड्स, कॅन्सर सारखे असाध्य रोग आम्ही बरे करतो असे छातीठोकपणे सांगणारी सुटाबुटातील भोंदूगिरी सरकारला दिसत नाही की त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले जात आहे. हिंदू हा सहिष्णू आहे. त्याला धर्माचे ज्ञान आणि अभिमान दोन्ही नसल्याने त्याला नेहमीच गृहीत धरले जाते. परिणामी साधू संत म्हणजे हल्ली टिंगलटवाळीचा विषय ठरू लागला आहे. सिनेमा, वेब सिरीज, नाटके, जाहिराती यांमध्ये त्यांची नेहमीच अवहेलना केली जाते. परिणामी दारी भिक्षेच्या अथवा माधुकरी मागण्याच्या हेतूने आलेल्या साधुंकडे संशयास्पद रीतीने पाहिले जाऊ लागले आहे.



लहान मुले या साधूंची टिंगलटवाळी करू लागले आहेत. काही वर्षांपूर्वी पालघर परिसरात अशाच प्रकारे संशयाने साधूंची मारहाण करून हत्या करण्यात आली होती. त्यामुळे साधूंची निदानालस्ती करणे योग्य नाही. सध्या राज्यात असलेल्या हिंदुत्ववादी सरकारकडून तरी ही अपेक्षा नव्हती. समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सरकार करत असलेले प्रयत्न नक्कीच कौतुकास्पद आहेत मात्र हे करत असताना ज्यांनी आपल्याला निवडून दिले आणि सरकार स्थापनेची संधी दिली त्या हिंदू समाजाच्या श्रद्धेला या जाहिरातीमुळे तडा गेला आहे त्यामुळे सरकारने हिंदूंच्या भावनांची दखल घेत या जाहिरातींवरील साधूंचे चित्र हटवावे!

**

# समंजस, आनंदी जीवनासाठी "गोष्टी मनाच्या"

"गोष्टी मनाच्या, आनंदी जीवनासाठी मनाचे व्यवस्थापन" हे डॉ. विजया फडणीस यांचे पुस्तक रोहन प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. सुरुवातीला लेखिकेने आपले 'मनोगत' सविस्तरपणे मांडले आहे. गेली चार दशके डॉ. विजया फडणीस, समुपदेशनाचे कार्य करीत आहेत. या पुस्तकातील बहुतेक लेख, 'विपुलश्री' मासिकात वेळोवेळी प्रकाशित झाले आहेत. या पुस्तकातील विविध लेखांचे महत्त्व लेखिकेने सुरुवातीलाच थोडक्यात व्यक्त केले आहे. या पुस्तकात एकूण तेरा, सविस्तर लेख समाविष्ट आहेत. पुस्तकाचे रंगीत, समर्पक मुखपृष्ठ राजू देशपांडे आणि शेखर गोडबोले यांनी साकारले आहे.




चौकटी बाहेरचे प्रयोग, या पहिल्या लेखात डॉ. विजया फडणीस यांनी सुरुवातीलाच असे सांगितले आहे की, "व्यवसायाने मी समुपदेशक असले, तरी लेखन हे माझे पॅशन आहे. विविध विषयांवरील विपुल लेखनानंतर, व्यवसायाची गरज म्हणून १९९९ पासून मानसशास्त्रीय लेखनाकडे वळले. या लेखनामुळे अनेकांपर्यंत पोचता आले, समाजमन वाचता आले. अनुभवाची शिदोरी अधिकाधिक समृद्ध होत गेली." समुपदेशन हा शब्द अलीकडे सुपरिचित झालेला आहे. मात्र समुपदेशन करणे ही गोष्ट सोपी नाही. ती एक साधना आहे आणि कलादेखील, हे कसे ते त्यांनी सोदाहरण, सविस्तरपणे स्पष्ट केले आहे. मैत्री संवादाशी, या लेखात संवादाचे महत्त्व, मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून उत्तम प्रकारे स्पष्ट केले आहे. संवादाच्या प्रक्रियेत येणारे अडथळे कसे टाळावेत हेही सांगितले आहे. मुलांचे समुपदेशन करताना, अनुभवी समुपदेशकाला कोणत्या क्लुप्त्या वापराव्या लागतात त्यासह, आलेले विविध अनुभव उत्तम प्रकारे, सोदाहरण "मुलांच्या विश्वात" या लेखात लेखिकेने मांडले आहेत. यशाची परिभाषा, हा लेख लेखिकेने सोदाहरण लिहिला आहे. त्यामुळे वाचनीय झाला आहे. आपल्यात दडलेल्या अनेक सुप्त गुणांचा प्रभावी आविष्कार करू शकलो, तर खरंच किमया घडू शकते आणि हीच यशाची गुरुकिल्ली असते.

"वेळ वाचवण्याचे धडे" आणि "राग आवरा" हे दोन लेख अतिशय उत्तम, वाचनीय आणि सर्वांनाच मार्गदर्शक ठरणारे आहेत. वारंवार त्यांचे वाचन, मनन आणि त्यानुसार आचरण केल्याने व्यक्तिमत्त्वात बदल होऊ शकतो. नात्यांची शोधयात्रामध्ये मानवी जीवनातील विविध नात्यांचा ऊहापोह केला आहे. नात्यांचे भावबंध मने जोडतात. म्हणूनच उत्तम समाजरचनेसाठी नाती महत्त्वाची ठरतात आणि त्यासाठीच ती आवर्जून जपायला हवीत, असे शेवटी सांगितले आहे. "निवृत्ती एक, प्रवृत्ती अनेक" या लेखामध्ये ज्येष्ठ नागरिकांनी सेकंड इनिंग कशी व्यतीत करावी हे उत्तम प्रकारे स्पष्ट केले आहे. कृतीशील वयोवर्धन, हे नेहमीच सुखकारक असते, हे विविध उदाहरणांनी उत्तम प्रकारे स्पष्ट केले आहे. स्वभावातील विविध दोषांमुळे अनेक व्यक्ती आपल्या जीवनातील विविध निर्णय ठामपणे घेऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांना आपल्या जीवनात विविध दुष्परिणाम सोसावे लागतात. "ठ...ठामपणाचा" हा यासंबंधीचा लेख वाचनीय झाला आहे. एकाग्र चित्ताचा अभाव, अति चंचलता आणि लहरीपणा या वर्तन वैशिष्ट्यांनी ग्रासलेल्या मुलांच्या समस्यांची आणि कारणांची सविस्तर चर्चा करून, त्यासाठी कोणते उपाय योजता येतील हे लेखिकेने सविस्तरपणे, सोदाहरण उत्तम प्रकारे स्पष्ट केले आहे.

"स्किझोफ्रेनिया" आणि "मंत्रचळ अर्थात ओसीडी" या मानसिक आजारग्रस्तांच्या लक्षणांचा, कारणांचा आणि त्यावरील उपायांचा अनुभवाधारित लेख, विशेषत: अशा व्यक्तींना, आणि त्यांच्या परिवारातील सदस्यांना निश्चितच मार्गदर्शक आहे. प्रश्नोपनिषद, या शेवटच्या लेखात समुपदेशनाविषयीचे समज आणि गैरसमज याविषयी लेखिकेने आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे, सुंदर, सविस्तर विश्लेषण केले आहे, ते नितांत वाचनीय आहे. त्यामधून डॉ. विजया फडणीस यांचे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व वाचकांसमोर साकारते. शेवटी संदर्भसूची आणि लेखिकेचा सविस्तर परिचय दिला आहे. हे पुस्तक सर्वांसाठीच वाचनीय, मार्गदर्शक आणि म्हणूनच संग्राह्य ठरणारे आहे.

**

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

पुस्तकाचे नाव : गोष्टी मनाच्या
लेखिका : डॉ. विजया फडणीस
प्रकाशक : रोहन प्रकाशन, पुणे - ३० ०२०-२४४८०६८६
सुधारित आवृत्ती : ऑगस्ट २०१६
पुनर्मुद्रण : २०२४
पृष्ठे : २१२.    मूल्य : रु.२७५/-

# निमित्त रंगसोहळ्याचं

**माणसाच्या आयुष्यातलं रंगांचं महत्व काय वर्णावं? तनामनाला सुखावणाऱ्या या सणाच्या निमित्ताने निसर्गाचं नवसर्जनशील रुप पहायला मिळतंच, पण एका वेगळ्या हंगामात प्रवेश करताना मनात निर्माण होणारे कुतुहलमिश्रीत उत्साह भावदेखील तरंग उमटवून जातात. होळीच्या निमित्ताने त्याज्य वृत्तींचा त्याग करायचा, तर धुळवड किंवा रंगपंचमीनिमित्त नव्या रंगात न्हाऊन निघायचं, हा एक अनोखा रंगसोहळाच म्हणायला हवा.**

मधुरा कुलकर्णी

आणखी एक रंगांचा सण समोर उभा आहे. माणसाच्या आयुष्यातलं रंगांचं महत्व काय वर्णावं? तनामनाला सुखावणाऱ्या या सणाच्या निमित्ताने निसर्गाचं नवसर्जनशील रुप पहायला मिळतंच, पण एका वेगळ्या हंगामात प्रवेश करताना मनात निर्माण होणारे कुतुहलमिश्रीत उत्साहभावदेखील तरंग उमटवून जातात. होळीच्या निमित्ताने त्याज्य वृत्तींचा त्याग करायचा, तर धुळवड किंवा रंगपंचमीनिमित्त नव्या रंगात न्हाऊन निघायचं, हा एक अनोखा रंगसोहळाच म्हणायला हवा. रंगोत्सवानिमित्त धुळवड, रंगपंचमी यासारखे सण म्हणजे उत्साह आणि आनंदानं भारलेले उत्सव. वर्षभर बऱ्याच सणांचं साजरीकरण होत असतं. त्यातील काही कर्मकांडात अडकवणारे असतात. काही पूजाविधींमध्ये गुरफटवणारे असतात, काही दमवून टाकणारे असतात तर काही भरपूर खर्च घडवून आणणारे असतात. पण धूळवड असो वा रंगपंचमी, या सणांचा धाक कधीच वाटत नाही. त्यांच्या पूर्वतयारीचा ताण येत नाही.

माणसा-माणसाच्या मनात लपलेला अल्लडपणा, अवखळपणा हलवून जागा करणारे हे सण! प्रत्येकाच्याच मनात एक खट्याळ मूल लपलेलं असतं. पण पोक्तपणाचं ओझं, जबाबदाऱ्यांचं भान, दहा तोंडानं बोलणाऱ्या आणि परीक्षण करणाऱ्या तोंडांचं भय यामुळे व्यवहार्य मेंदूच्या संदेशानं हे मूल अळीमिळी गूप चिळी साधून बसलेलं असतं. समाजाचा धाक प्रौढ शरीरातल्या या बालमनाला शहाणपणाच्या चौकटीत बंदिस्त ठेवत असतो. पण या सणांच्या निमित्तानं एका हिसक्यासरशी दावं तोडून चौखूर उधळणाऱ्या जनावराप्रमाणे हे जखडलेलं खट्याळ मन उधळतं आणि रंगांच्या साम्राज्यात हरवून जातं. लांब तोंड करुन वैचारिकतेच्या जंजाळात अडकलेल्या चेहऱ्यांच्या भाऊगर्दीत एखादा हसतमुख, मिश्कील प्रवृत्तीचा माणूस यावा आणि आपल्या खुसखुशीत शैलीनं क्षणात वातावरणाचा नूर पालटवून टाकावा, अगदी तसेच भासतात हे सण! अंगाला रंगाची चिमूट चिकटण्याचा अवकाश... गांभीर्याचे सगळे मुखवटे झरझर गळून पडतात आणि 'खरे रंग' बाहेर येतात.

व्यक्त होणं हा माणसाचा स्वभाव आहे. रंगांच्या माध्यमातून ते अधिक चांगल्या पध्दतीनं साधतं. रंगपंचमी म्हणजे रंगांचा उत्सव... मग हा रंग भक्तीचा असतो, कुठे प्रणयाचा असतो, कुठे उत्साह आणि आनंदाचा असतो तर कुठे श्रध्देचा असतो. मथुरा, वृंदावनातील रंगपंचमी प्रत्येक पुरुषाला कृष्ण आणि प्रत्येक स्त्रीला राधेचं रुप देऊन जाते. कारण इथे महिनाभर रंगाणाऱ्या सणाच्या पर्वात प्रत्येकावर राधा-कृष्णाच्या नात्याचा रंग चढत असतो. प्रीती, भक्ती, प्रणय, माया, ममता या सर्व रंगांमध्ये भाविक न्हाऊन निघतात. गोप-गोपिकांसवे खेळाचा मनसोक्त आनंद लुटणारा, नटखटपणामुळे आयुष्यात चैतन्य भरणारा कान्हा अंशाअंशानं प्रत्येकाच्या मनात सामावतो आणि या रंगाच्या मेळाव्यावर तोच चैतन्याचा रंग चढतो. आपल्याकडेही अशाच मंगल भावनेनं अंगावर रंगांच्या कमानी चढवल्या जातात. हिरवा, निळा, पिवळा, लाल, केशरी, नारिंगी... किती रंग... किती वेगळे त्यांचे स्वभाव... किती वेगळी त्यांची वैशिष्ट्यं... पण एकत्र येतात तेव्हा बेमालुमपणे परस्परात मिसळतात आणि काही वेगळ्याच रंगांना जन्म देऊन जातात.

रंगांच्या या दुनियेत धाक, संयम, सबुरी, शहाणपणा या शब्दांना काहीही जागा नाही. मनाला येईल त्या रंगानं मूठ भरायची आणि समोरच्याचं सर्वांग त्या रंगात माखून टाकायचं. इथे हा मोठा, तो लहान, हा ज्येष्ठ तो कनिष्ठ, असा भेदभाव नाही. सगळेच रंगात न्हाऊन निघतात तेव्हा हा भेदाभेद कुठच्या कुठे गळून पडतो. एका अर्थी माणसानेच निर्माण केलेली ही वलयं एकसारखी होतात आणि वर्तुळ विस्तारतं. या वर्तुळाला कोणताही कोपरा नाही, जाचणारा कोणताही कोन नाही. म्हणूनच प्रत्येकाला सामावून घेणारा हा सण महत्त्वाचा ठरतो. या दिवसात सृष्टीत चैतन्याचे पदरव जाणवू लागलेले असतात. पानगळीच्या या शेवटच्या टप्प्यात झाडाच्या शेंड्यांवर हिरवी पावलं उमटू लागलेली असतात. वसंताच्या आगमनानं फुलझाडांवर फुलांचे घोस लगडू लागलेले असतात. हे काहीसं शुष्क आणि कोरडं वातावरण सुसह्य व्हावं यासाठी सृष्टी भडक रंगांची बरसात करत असते. सुगंधाच्या लाटा उष्णतेला गंधमान करत असतात. निसर्गाच्या या बदलाशी एकरुप होण्याचा संकेत देणारा आणि ऋतूबदलाची सिध्दता करणारा सण म्हणजे रंगपंचमी. होळीच्या भडक्यासारखा वाढणाऱ्या उष्णतेचा प्रकोप रंगांच्या सानिध्यात हलका करायचा ही शिकवण देणारा हा सण.



शोधू पहाता या सणांचे विविध पदर समोर येतात. हा गुंता सोडवणं म्हणजेच आयुष्याचे नवनवीन कंगोरे शोधणं आणि अर्थ जाणून घेणं. ही रंगपंचमी, धुळवड आपल्याला अनेक प्रतीकं सुचवून जाते. प्रत्येक रंगाचं एक वैशिष्ट्य असतं तसंच प्रत्येक व्यक्तीचं एक वैशिष्ट्य असतं. हे व्यक्तीविशेष जपणं म्हणजेच स्वत्व जपणं अशी भावना जागृत होते. या कोशात व्यक्ती आत्मकेंद्री होण्याचा धोकाच अधिक असतो. आपलाच रंग किती नवखा, किती अनोखा असा दंभ कुरवाळत आत्ममग्न होऊ पहाणाऱ्या मनाचा कोशभेद करुन व्यक्तीला समाजाभिमुख करणारा हा सण आहे. सृष्टीतल्या सगळ्या रंगांचा परिचय करुन घ्या, सगळ्या रंगांचे स्वभाव ओळखा आणि आवश्यक तिथे त्याचा उपयोग करुन घ्या ही शिकवण देणारा हा सण. हिरवा रंग सर्जनाचा, भगवा रंग त्यागाचा, पांढरा रंग वैराग्याचा हे खरं असलं तरी कधी तरी हे सगळे रंग, या सगळ्या जाणिवा, या सगळ्या भावना समरस व्हायला हव्या हे सांगणारा हा सण आहे. शेवटी विविध रंगांचा समतोल साधणं म्हणजे जगणं. इथे भडक रंगांना संतुलित करण्यासाठी हलके रंग हवेतच. भावना आणि व्यवहार यांचा तोल सांभाळत होणाऱ्या प्रवासाला 'संसार' असं म्हटलं जातं तेव्हा विविध रंगांचा तोल सांभाळणं ओघानंच येतं. कुठल्याच रंगानं दुसऱ्यावर अतिक्रमण करु नये. त्याचं अस्तित्व, ओळख झाकोळून टाकू नये. वृत्तींमध्ये हा समतोल असेल तर मती साथ देते आणि कृती संतुलित राहते. रंगपंचमीसारखा सण हेच तत्वज्ञान सांगणारा. आयुष्याच्या काही वर्षांच्या उण्यापुऱ्या प्रवासात माणसानं सर्व रंग न्याहाळायला हवेत. त्याचा आस्वाद घ्यायला हवा. त्यांचा हलकासा स्पर्शही नवी दृष्टी देण्यास कारक ठरु शकतो. जे व्यक्तीचं तेच समाजाचं... साचलेपणा दूर करण्यासाठी नवलाई गरजेची असते. सततच्या वापरामुळे रंग फिके होतात. परिणाम बोथट होतात. जळमटं लोंबू लागतात. अयोग्य आणि अमंगल पुटं चढून मुळचा रंग हरवू लागतो. काही अनावश्यक रंग मुळच्या गर्भरेशमी रंगावर आक्रमण करु पाहतात. दुष्काळासारख्या परिस्थितीला तोंड द्यायचं तर विहीर उपसून साठलेली घाण काढावी लागते, खोली वाढवावी लागते. तरच गर्भामध्ये ओलावा पाझरतो आणि झरे मोकळे होऊन विहीर भरु लागते. समाजाचं तसंच आहे. काळाच्या ओघात अनेक विषयांची राळ उठते आणि गाळ साठत जातो. हा गाळ विचारशक्ती कुंठीत करतो, एका जड आवरणाआड समाजातील विवेक दडवू पहातो. नकारात्मकतेच्या रंगाआड दडवू पाहतो. ही परिस्थिती कायम राहिली तर भरकटलेपण जाणवणं स्वाभाविक आहे. पण हे टाळायचं तर होळीत जळणाऱ्या पाल्यापाचोळ्यासारखे हे अमंगल, अप्रस्तुत विचारही जाळून टाकायला हवेत आणि नवविचार आत्मसात करण्यासाठी अवकाश निर्माण करायला हवं. रंगांचा हा उत्साह अशा अवकाशनिर्मितीची संधी देतो. समाजातील प्रत्येक घटकाला एकरुप देण्याची संधी देतो. ही संधी साधायला हवी. सणाची धुंदी अनुभवताना ही संधी दवडता कामा नये.

**

# जेव्हा मी राजा होतो

निलेश साठे

जेव्हा मी राजा होतो एक संपूर्ण राज्य माझ्या ताब्यात असतं. मी म्हणेल ती पूर्व दिशा. मी राजा असतो पण कल्याणकारी. लोकांचे हित आणि सौख्य यातच माझे सुख समाधान. माझी प्रजा दुःखी कष्टी हताश असलेली मला अजिबात आवडत नाही. लोकांच्या अडीअडचणी चुटकी सरशी सोडवण्याचे माझे प्रयत्न असतात. मी काय करतो, माझे सर्व विश्वासू सहकारी सर्वांना एका मोठ्या कामगिरीवर पाठवतो. त्या प्रत्येकाने एकच काम करायचं असतं ते म्हणजे राज्यातल्या शहरातल्या गावातल्या अगदी खेड्यापाड्यातल्या गल्लीबोळामध्ये सुद्धा असणाऱ्या प्रत्येक घराघरांमध्ये जाऊन तेथील लोकांच्या नेमक्या समस्या काय आहेत याची सविस्तर माहिती माझ्यापर्यंत पोहोचवणे. त्यांच्याकडून सर्व प्रकारची माहिती घेतल्यानंतर मी तत्काळ कारवाईस सुरुवात करणार. जे जे शक्य आहे ते ते ताबडतोब त्या त्या दिवशीच पूर्ण करण्याचे माझे प्रयत्न असणार. परंतु माझ्या जेव्हा लक्षामध्ये येते नागरिकांना प्रथम नेमकं हवंय काय त्याचा विचार करून मी लागलेच लोकांच्या जिव्हाळ्याचा आणि कळकळीच्या प्रश्नाला हात घालतो ते म्हणजे सामानातल्या सामान्य लोकांना अतिशय राहण्यायोग्य सुस्थितीत असलेलं घर तयार करणे ज्यांना घर नाही त्यांना घर बांधून देणे जेणेकरून एकही व्यक्ती विना निवारा राहू शकणार नाही. मग माझा दुसरा प्रयत्न असतो प्रत्येक घरातला किमान एक व्यक्ती कुठे ना कुठेतरी नोकरी किंवा व्यवसाय करत असणार. बेकार आणि बेरोजगार कोणी राहणार नाही याची मी काळजी घेणार. त्यानंतर माझा मोर्चा शिक्षणाकडे वळतो उत्तम दर्जाचं शिक्षण जवळपास प्रत्येकालाच घराजवळ अगदी मोफत कसे मिळेल याकडे माझा कल असतो. आणि शिक्षणामध्ये सुद्धा इन्व्हेस्टमेंट कशी करायची संपत्ती वाढवायची पैसा कसा वाढवायचा उत्पादन कसे वाढवायचे कलागुणांना वाव देऊन विद्यार्थ्यांची कशी प्रगती होईल भविष्य कशाप्रकारे उज्वल करता येईल केवळ आणि केवळ याच प्रकारचे शिक्षण देणार. तसेच नागरिकांच्या आरोग्यावरही चांगलं काम करण्याचा माझा प्रयत्न असणार. उत्तम आरोग्य सेवा कशी पुरवता येईल याकडे माझे कायम लक्ष असणार. राज्याच्या उत्पादन वाढीसाठी काय काय प्रयत्न करता येतील हे जवळजवळ प्रत्येकाचं मत विचारात घेतले जाणार. राज्यात जी काही मोठमोठी मंदिरे आहेत त्या मंदिरांमार्फत सभोवतालचा सर्व परिसर सुजलामसुफलाम करण्याचा माझा प्रयत्न असेल. मोठमोठे बिजनेस मॅन खेळाडू कलाकार यांच्याकडून गरीब निधी जमा करून सर्वसामान्यांचे राहणीमान उंचावण्याचा माझा प्रयत्न असेल. चकाचक रस्ते पाण्याची पुरेशी व्यवस्था वीज यांची तजवीज अतिशय उत्तमरीत्या केली जाणार. या सर्वात सुरक्षेला माझ्याकडून मोठे प्राधान्य असणार. नागरिकांच्या सुरक्षेसाठी अतिशय कडक कायदे केले जाणार. गुन्हेगाराला योग्य ती आणि त्वरित शिक्षा दिली जाणार. परंतु कुठेही गुन्हा घडूच नये यासाठी योग्य ती खबरदारी घेतली जाणार. सुख संपत्ती समृद्धी आणि आरोग्य उत्तम असेल तर गुन्ह्यांचा दर नक्कीच कमी असणार. सगळं कसं व्यवस्थित सुरू राहावं कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी योग्य ती काळजी घेतली जाईल. लोक सुखी समाधानी असतील. द्वेष, वैर, तिरस्कार, मत्सर या गोष्टी जणू काही नाहीतच. सगळीकडे आनंदी आनंदाचे वातावरण असेल. सर्व प्रजा सुखी आणि समाधानी असेल. कुणालाही कशाचीही कमतरता भासणार नाही. आणि सगळं कसं छान आणि व्यवस्थित सुरळीत चालणार. असा माझा प्रयत्न राहणार.

**

विनायक दळवी

# भारत-वेस्ट इंडिज सामन्यावर क्रिकेटविश्वाचे लक्ष




पाकिस्तान आणि यजमान श्रीलंका यांच्यातील सामना पाकिस्तानचे या स्पर्धेतील भविष्य निश्चित करणार असला, तरीही तमाम भारतीय आणि क्रिकेटविश्वाचे लक्ष, रविवारी कोलकाता येथे होणाऱ्या भारत आणि वेस्ट इंडिज सामन्यावर लागले आहे. दक्षिण आफ्रिकेने वेस्टइंडीजला मोठ्या फरकाने हरवलं आणि त्यानंतर उत्साह द्विगुणीत झालेल्या भारतीय संघाने झिंबाब्वे संघावर देखील तसाच मोठा दणकट विजय मिळवला. धाव सरासरी अजूनही भारतीय संघ वेस्टइंडीज पेक्षा खूपच मागे आहे. तरी देखील हा सामना जिंकून धावसंख्येची पर्वा न करता, एक सामान्य सामना म्हणून भारताने या सामन्याकडे पाहिले. तर आपण अजूनही उपांत्य फेरी सहज गाठू शकतो.

सुपरएटमधील दक्षिण आफ्रिकेच्या दणदणीत विजयानंतर भारताची धुंदी पूर्णपणे उतरली. आफ्रिके विरुद्ध त्या सामन्यात भारतीय संघातील खेळाडू नेहमीप्रमाणे एका वेगळ्याच धुंदीत-नशेत वावरत होते त्यांचा तो नक्शा दक्षिण आफ्रिकेने उतरवला होता. त्यावेळी दक्षिण आफ्रिकेने भारतीय संघाच्या कच्च्या दुव्यांचा पुरेपूर अभ्यास केला होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, दक्षिण आफ्रिका, जो संघ वेगवान गोलंदाजीसाठी प्रसिद्ध आहे. त्यांनी भारतीय फलंदाजांना संथ वेगात टाकलेल्या चेंडूवर फसवलं होतं. त्यामुळेच भारतीय फलंदाज अचानक झालेल्या या बदलामुळे हडबडून गेले होते. त्याच दक्षिण आफ्रिका संघाने वेस्टइंडीज विरुद्ध सामना जिंकताना मात्र वेगवान गोलंदाजीच्या अस्त्राचा पुरेपूर वापर केला होता. याचाच अर्थ असा की, दक्षिण आफ्रिकेचा संघ हा आता पूर्वीसारखा संघ राहिलेला नाही. हा संघ प्रतिस्पर्ध्यांचा, त्यांच्या खेळाडूंचा पूर्णपणे अभ्यास करून त्यानुसार डावपेचांची रचना करतो आणि मैदानात उतरतो. अर्थातच त्याच मुख्य श्रेय, त्यांचा कप्तान मारक्रम याला, त्याच्या रणनीतीला, त्याच्या फलंदाजीला, क्षेत्ररक्षणाला आणि डावपेचांना आहे.

भारतीय संघ जसा दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या दयनीय पराभव नंतर हबकला होता. तशीच परिस्थिती वेस्टइंडीज संघाची देखील झाली आहे. त्यांचा देखील दक्षिण आफ्रिकेने पार धुव्वा उडवला. त्यामुळे रविवारच्या सामन्यात भारत आणि वेस्ट इंडिज हे दोन संघ मानसिकतेच्या पातळीवर समान आहेत. तरी देखील भारतीय संघाला आपल्या अनेक उणिवा यावेळी दूर कराव्या लागणार आहेत. सर्वप्रथम अभिषेक शर्मा हा सतत अपयशी ठरणारा फलंदाज कायम खेळवून, भारताने आपल्याला अडचणीत आणून ठेवलं होतं. झिम्बाब्वेविरुद्ध सामन्यात त्याची अर्धशतकी खेळी झाली असली तरी देखील चांगल्या गोलंदाजी विरुद्ध तो कितपत टिकेल हे सांगता येत नाही.

दुसरी गोष्ट शिवम दुबे याच्या गोलंदाजीची. शिवम दुबे हा फलंदाज म्हणून निर्णायक षटकात अतिशय उपयुक्त आहे. मात्र, त्याची गोलंदाजी त्याला त्याच्या, स्वतःच्या योजनेनुसार करून दिली तरच तो प्रभावी ठरतो. त्याला कप्तान किंवा प्रशिक्षकांनी त्यांना हवं तसं गोलंदाजी करायला सांगितली तर तो पूर्णपणे अपयशी ठरतो. हे आपण या स्पर्धेत पाहिलं आहे. भारतीय संघ व्यवस्थापनाने त्याला ऑफ स्टंपच्या बाहेर गोलंदाजी करायला सांगितली, जे त्याचं शक्ती स्थान नाही. तो स्टंपवर गोलंदाजी करून चेंडूचा वेग, कमी जास्त करून किंवा चेंडूला अधिक उसळी देऊन फलंदाजांना फसवण्यासाठी प्रसिद्ध आहे. मात्र ऑफ स्टंप वर गोलंदाजी केल्यामुळे प्रतिस्पर्धी संघांना त्याच्या गोलंदाजीचा समाचार सहज घेता आला. भारताने त्याला गोलंदाजी देताना ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

वेस्ट इंडीज विरुद्ध भारताचा सामना त्याच खेळपट्टीवर खेळला जाईल, जिथे स्कॉटलंडने स्पर्धेतील पहिली २०० पेक्षा जास्त धावसंख्या नोंदविली. ही एक सामान्य ईडन खेळपट्टी आहे. जी धावांनी भरलेली आहे. कोलकत्ता येथे सायंकाळनंतर भरपूर दव देखील पडत असल्यामुळे दुसऱ्या डावात फलंदाजी करणाऱ्या संघाला निश्चितच लाभ होणार आहे. या स्पर्धेत भारत पहिल्यांदाच ईडन गार्डन्सवर खेळणार असला तरी, वेस्ट इंडिजला थोडासा फायदा आहे. कारण त्यांचे या ठिकाणी आधीच दोन गट साखळी सामने झाले आहेत. ते दोन्ही सामने (स्कॉटलंड आणि इटलीविरुद्ध) वेस्टइंडीज ने सहज जिंकले आहेत.

वेस्टइंडीज संघ देखील पूर्वीप्रमाणे राहिलेला नाही त्यांच्या या संघात तडाखेबंध फलंदाज आहेत. जे आयपीएलमध्ये भारतातील सर्व प्रमुख मैदानांवर खेळत असतात. त्यामुळे त्यांच्या गाठीशी भरपूर अनुभव आहे. वेस्टइंडीज कडे यंदा तीन दर्जेदार फिरकी गोलंदाज आहेत. त्यापैकी मोती आणि होसेन या दोघांनी या स्पर्धेत अतिशय भेदक गोलंदाजी केलेली आहे. त्यामुळे या खेळपट्टीवर जर चेंडू फिरला तर तो भारतीयांसाठी देखील त्रासदायक ठरणार आहे. भारतासाठी या सामन्यातील जमेची बाजू म्हणजे, यजमान प्रेक्षकांचा प्रचंड पाठबळ आणि झिंबाब्वे विरुद्ध गत सामन्यात मिळवलेल्या मोठ्या विजयाचा आत्मविश्वास. कोणतीही फिटनेसची समस्या न उद्भवल्यास आणि नाणेफेकीपासून सारं काही अनुकूल ठरत गेल्यास भारताला हा सामना जिंकणे अवघड जाणार नाही.


# आयपीएलचे बिगुल वाजले

**• २८ मार्चपासून होणार थरार सुरू**

| नवी दिल्ली | प्रतिनिधी |

आयपीएलच्या १९ व्या हंगामाची प्रतीक्षा संपली आहे. या वर्षाचा आयपीएल२०२६ चा हंगाम २८ मार्चपासून सुरू होणार असून, अंतिम सामना ३१ मे रोजी खेळवला जाईल. बीसीसीआयने सुरुवातीला २६ मार्च ही तारीख निश्चित केली होती, मात्र अंतर्गत निर्णयानुसार यात दोन दिवसांचा बदल करण्यात आला आहे.

आयपीएल २०२६ चे वेळापत्रक अद्याप अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे आसाम, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या तीन राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुका.कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) चे घरचे मैदान कोलकाता (पश्चिम बंगाल) येथे आहे. चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) चे होम ग्राऊंड चेन्नई (तामिळनाडू) मध्ये आहे. राजस्थान रॉयल्स (आरआर) त्यांचे काही सामने गुवाहाटी (आसाम) येथे खेळते. निवडणूक आयोगाने मतदानाच्या तारखा जाहीर न केल्यामुळे बीसीसीआयला सुरक्षा व्यवस्थेचा विचार करून वेळापत्रक ठरवण्यात अडचण येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.



गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी) कडे या हंगामाचे उद्घाटन करण्याचा बहुमान आहे. मात्र, गेल्या वर्षी जूनमध्ये जेतेपदाच्या जल्लोषादरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ चाहत्यांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर आरसीबीचे ७ घरचे सामने कुठे खेळवायचे, याबाबत अद्याप पेच कायम आहे. आरसीबीने नवी मुंबई, रायपूर आणि पुणे या शहरांची पर्यायी ठिकाणे म्हणून निवड केली आहे. कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनसोबतच्या चर्चे नंतरच चिन्नास्वामी स्टेडियमबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

दोन टप्प्यात वेळापत्रक निवडणुकीच्या काळामुळे २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ प्रमाणेच याही वेळी आयपीएलचे वेळापत्रक दोन टप्प्यात जाहीर केले जाऊ शकते. आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलची पुढील आठवड्यात महत्त्वाची बैठक होणार असून, त्यात उद्घाटन सामना आणि संपूर्ण वेळापत्रकाबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

# कोलकात्यात निर्णायक सामना

| चेन्नई | वृत्तसंस्था |

झिम्बाब्वेवर मात करून आव्हान कायम राखले आहे. आता वेस्ट इंडीजविरुद्धच्या सामन्यासाठी गोलंदाजीत अधिक प्रभावी कामगिरी करावी लागणार आहे, असे स्पष्ट मत भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने व्यक्त केले. टी-२० विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी झालेल्या सामन्यात भारताची फलंदाजी बहरली, परंतु गोलंदाजीतील उणिवांमध्ये सुधारणा झाली नाही. या सामन्यात २५६ धावांची भलीमोठी धावसंख्या उभारल्यावर भारताचा विजय निश्चित होता, परंतु २० षटकांत झिम्बाब्वेचे केवळ सहाच फलंदाज बाद करता आले. त्यातील सलामीवीर ब्रायन बेनेटने अखेरपर्यंत नाबाद राहत ५९ चेंडूंत ९७ धावांची खेळी केली.



उपांत्य फेरी गाठण्यासाठी भारताला आता रविवारी कोलकातामध्ये वेस्ट इंडीजविरुद्ध होणारा सामना जिंकावाच लागणार आहे. या सामन्यापूर्वी आम्हाला गोलंदाजीत चांगली सुधारणा करावी लागणार आहे, असे सूर्यकुमार म्हणाला, झिम्बाब्वेविरुद्ध गोलंदाजीत अपेक्षित कामगिरी करता आली नसली हे खरे असले तरी झिम्बाब्वे फलंदाजांचे श्रेय कमी करता येणार नाही. त्यांनी फारच चांगली फलंदाजी केली, असेही सूर्यकुमारने सांगितले. झिम्बाब्वे विरुद्धच्या सामन्यात सर्व फलंदाजांनी योगदान दिले. गोलंदाजांना अपेक्षेप्रमाणे प्रभाव पाडता आला नसला तरी विजय महत्त्वाचा असतो, असे सूर्यकुमार म्हणाला. आता रविवारी होणारा वेस्ट इंडीजविरुद्धचा सामना महत्त्वाचा आहे. गोलंदाजांना अधिक प्रभाव दाखवावा लागणार आहे.

# महाड येथे हाफ मॅरेथॉनचे आयोजन

| महाड | प्रतिनिधी |

आदित्य बिर्ला उद्योग समूहाच्या ग्रासीम इंडस्ट्रीज अंतर्गत महाड औद्योगिक क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या बिर्ला ओपस पेंट या कंपनीच्या माध्यमातून १ मार्चला महाड येथे हाफ मॅरेथॉन आयोजित करण्यात आली आहे. यावर्षी हे मॅरेथॉनचे दुसरे वर्ष असून, यामध्ये स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी मिलिंद सोमण आणि सुफिया सुफी या उपस्थित राहणार आहेत. महाड परिसरातील धावपटू फिटनेसप्रेमी आणि कुटुंबांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन कंपनीतर्फे करण्यात आले आहे. १ मार्चला पहाटे ५ वाजता काकरतळ येथील भिलारे मैदानातून या स्पर्धेला सुरुवात होणार आहे. २१.१ किलोमीटरची टाईम्ड मॅरेथॉन, १० किलोमीटरची टाईम्ड युथ रन, पाच किलोमीटरची नॉन टाईम्ड ड्रीम रन आणि तीन किलोमीटरची नॉन टाईम्ड फन रन अशा चार श्रेणीमध्ये ही स्पर्धा घेतली जाणार आहे. प्रत्येक स्पर्धांसाठी पहिल्या तीन क्रमांकांकरिता आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली असून, बक्षिसाची एकूण रक्कम पाच लाख ११ हजार रुपये आहे.

# रायगड दिव्यांग संघ विजेता

**तळा:** कुलाबा दिव्यांग सोशल फाऊंडेशन इंडिया व कुलाबा दिव्यांग क्रिकेट असोसिएशनच्या वतीने मैत्री चषक २०२६ क्रिकेट स्पर्धा मोहपाडा येथील एनआयएसएम मैदानात खेळवण्यात आल्या. या स्पर्धेत रायगड संघ विजेता तर नवी मुंबई उपविजेता ठरले. या स्पर्धेचे आयोजन शशांक हिरवे, शिवाजी पाटील, सुनील पाटील, अरुण घोडके, अंजली घोडके, कल्पेश तवले, मंगेश पारटे, नागनाथ घोडके, रूपेश पवार, चंद्रकांत पवार, रवी भोईर यांनी केले.

# एसपीजी दुहेरी टेनिस स्पर्धेचे आयोजन

| मुंबई | प्रतिनिधी |

शिवाजी पार्क जिमखान्याने क्रिकेट खेळासह टेनिस खेळालाही नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. जिमखान्याच्या दोन्ही बाजूला टेनिस कोर्टस असून या कोर्टवर आंतरराष्ट्रीय टेनिसपटूंनी आपल्या खेळाचे प्रात्यक्षिक घडवले आहे. जिमखान्याच्या टेनिस विभागाचे चिटणीस प्रभाकर उर्फ दादा खानोलकर यानी अनेक वर्षे टेनिस विभाग यशस्वीरित्या हाताळून जिमखान्यासाठी योगदान दिले. त्यांच्या कार्याचा गौरव करत शिवाजी पार्क जिमखान्याने दादा खानोलकर यांचे स्मृती प्रीत्यर्थ एसपीजी दुहेरी टेनिस स्पर्धा सुरू केली. यंदा ही स्पर्धा ७, ८ मार्च, दरम्यान जिमखान्याच्या कोर्टवर होणार आहे. स्पर्धेसाठी एक लाख एकोणीस हजार रूपयांची पारितोषिके जाहीर करण्यात आली असून अंतिम विजेत्यास तीस हजार रूपये मिळतील. ही स्पर्धा टेनिसपटूंसाठी नसून टेनिस कोर्टवर प्रशिक्षण देणारे सहाय्यक प्रशिक्षक आणि मार्कर यांचेसाठीच मर्यादित आहे. टेनिसपटूना लहान वयातच खेळाचे धडे देण्याचे कार्य प्रशिक्षक करत असतात आणि मार्करही आपली कामगिरी चोख बजावत असतात. शिवाजी पार्क जिमखान्याने मात्र सहाय्यक प्रशिक्षक आणि मार्कर यांच्या कर्तव्याची दखल घेतली असून ही स्पर्धा खास त्यांचेसाठी ठेवली आहे. स्पर्धेत देशातील विविध टेनिस संघांचे सहाय्यक प्रशिक्षक आणि मार्कर सहभागी होत असतात. इच्छुकानी प्रवेशासाठी शिवाजी पार्क जिमखाना दूरध्वनी क्रमांक २४४४३७९९ अथवा संजय पटेल ९८२०२४१३५१ यांचेकडे २ मार्च, २०२६ पर्यंत आपली नावे नोंदवावीत. वरील वॉटसअप क्रमांकावरही प्रवेशिका स्विकारल्या जातील.

# राज्यस्तरीय कबड्डीत शिवमुद्रा कौलव विजेता

| कुडाळ | प्रतिनिधी |

नेरुरपार येथील शुक्रतारा कला, क्रीडा मंडळाने आयोजित केलेल्या भव्य राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत कोल्हापूरच्या शिवमुद्रा कौलव संघाने विजेतेपद पटकावले. या संघाने एक लाख रुपये व आकर्षक चषकावर आपले नाव कोरले. या स्पर्धेत सलग तीन वर्षे प्रथम क्रमांक मिळवण्याची किमया शिवमुद्रा संघाने साधली आहे. सतेज बाणेर (पुणे) संघाने द्वितीय क्रमांक मिळवत ५५ हजार रुपये व चषक प्राप्त केला. राज्य कबड्डी असोसिएशन व सिंधुदुर्ग कबड्डी फेडरेशनच्या मान्यतेने आणि तालुका कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने, शुक्रतारा कला क्रीडा मंडळ, नेरुरपारने सलग ९व्या वर्षी या स्पर्धेचे आयोजन झंझाळ क्रीडानगरी येथे केले होते. या स्पर्धेत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण ११ दिग्गज संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी १० साखळी सामने झाले, तर दुसऱ्या दिवशी ४ उपांत्यपूर्व आणि २ उपांत्य सामने खेळवण्यात आले. अंतिम सामना सतेज बाणेर (पुणे) विरुद्ध शिवमुद्रा कौलव (कोल्हापूर) यांच्यात अत्यंत रोमहर्षक झाला. दोन्ही संघांत प्रो-कबड्डीतील दिग्गज खेळाडूंचा समावेश होता. प्रो-कबड्डी खेळाडू साहिल पाटील याने शेवटच्या क्षणी केलेल्या अष्टपैलू कामगिरीमुळे शिवमुद्रा कौलव संघ विजयी ठरला. सामनावीर व उत्कृष्ट चढाईसाठी साहिल पाटील (शिवमुद्रा कौलव, कोल्हापूर), उत्कृष्ट पकड-वैभव रबाडे (शिवमुद्रा कौलव, कोल्हापूर) यांची निवड झाली. आदर्श खेळाडू केतन ऊर्फ भाऊ मापेलकर (अंकुर स्पोर्टस् क्लब, मुंबई शहर), अष्टपैलू खेळाडू पृथ्वीराज शिंदे (सतेज बाणेर, पुणे) यांना गौरविण्यात आले. तृतीय क्रमांक अंकुर स्पोर्टस् क्लब (मुंबई शहर), चतुर्थ स्वस्तिक क्रीडा मंडळ (मुंबई उपनगर), आदर्श संघ शिवनेरी सेवामंडळ (मुंबई शहर) ठरला.

# ‘तोंडवली नर्सिंग’उपविजेता

**नांदगाव :** श्री अनंत स्मृती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग कसाल आयोजित सिंधुदुर्ग, रत्नागिरी इंटर कॉलेज व्हॉलीबॉल व खो-खो स्पर्धेत तोंडवली कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उपविजेतेपद पटकावले. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नर्सिंग महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या खो-खो व व्हॉलीबॉल इंटर कॉलेज स्पर्धा कसाल नर्सिंग कॉलेजच्या पटांगणात झाल्या. यामध्ये श्री सरस्वती कॉलेज ऑफ नर्सिंग तोंडवलीच्या विद्यार्थ्यांनी खो-खो स्पर्धेत अंतिम सामन्यात दमदार खेळ करत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.



जॅक्स-रेहानची मॅच विनिंग खेळी

# इंग्लंडचा दिमाखदार विजय

| कोलंबो | वृत्तसंस्था |

टी-२० विश्वचषक २०२६ च्या सुपर-८ फेरीतील थरारक लढतीत इंग्लंडने न्यूझीलंडचा ४ विकेट्स आणि ३ चेंडू राखून पराभव केला. आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगलेल्या या सामन्यात फिरकीपटूंच्या फिरकीनंतर विल जॅक्स आणि रेहान अहमद यांच्या तुफानी फलंदाजीच्या जोरावर इंग्लंडने न्यूझीलंडचे आव्हान धुळीस मिळवले..न्यूझीलंडची संथ सुरुवात, इंग्लिश फिरकीचा विळखाटॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा न्यूझीलंडचा निर्णय इंग्लंडच्या गोलंदाजांनी चुकीचा ठरवला. सलामीवीर टिम सेफर्ट (३५) आणि फिन लन (२९) यांनी आक्रमक सुरुवात केली खरी, पण मधल्या फळीतील फलंदाजांना इंग्लंडच्या फिरकीसमोर नांग्या टाकाव्या लागल्या. इंग्लंडच्या विल जॅक्स (२/२३), आदिल रशीद (२/२८) रेहान अहमद (२/२८) या त्रिकुटाने किवी फलंदाजांना ठराविक अंतराने बाद करून धावगतीवर अंकुश ठेवला. न्यूझीलंडला २० षटकांत ७ बाद १५९ धावांपर्यंतच मजल मारता आली. १६० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. कर्णधार जोस बटलर (०) आणि फिल सॉल्ट (२) स्वस्तात परतल्याने इंग्लंडची अवस्था २ बाद २ अशी बिकट झाली होती.

हॅरी ब्रूक (२६), टॉम बँटन (३३) आणि सॅम करन (२४) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण राचिन रवींद्रने ३ बळी घेत सामन्यात रंगत आणली. इंग्लंडचा संघ ११७ वर ६ बाद अशा संकटात असताना मैदानात विल जॅक्स आणि रेहान अहमदची जोडी जमली.१९ चेंडूत ४४ धावांची वादळी भागीदारीसामना हातातून निसटतोय असे वाटत असताना विल जॅक्सने १८ चेंडूत ४ चौकार आणि १ षटकारासह नाबाद ३२ धावा कुटल्या.

# जम्मू काश्मीरने इतिहास रचला

**६७ वर्षात पहिल्यांदाच जिंकली रणजी ट्रॉफी**

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

दिग्गजांनी भरलेली कर्नाटकचा संघ आणि पहिल्यांदाच रणजी ट्रॉफीची फायनल खेळत असलेला संघ जम्मू काश्मीर यांच्यात रणजी ट्रॉफीची फायनल सामना खेळवला गेला. या सामन्यात जम्मू काश्मीरने इतिहास रचला असून ६७ वर्षात पहिल्यांदाच जिंकली रणजी ट्रॉफी जिंकण्याची किमया गाजवली आहे. पहिल्या इनिंगच्या जोरावर जम्मू काश्मीरला हा विजय मिळवता आला आहे.




रणजी ट्रॉफीच्या मैदानात जम्मू-काश्मीरने पहिल्या इनिंगमध्ये दमदार बॅटिंग करत ५८४ रन्सचा डोंगरासारखा स्कोअर उभा केला. शुभम पंडीरने १२१ रन्सची शानदार सेंच्युरी झळकावली, तर हसनने ८८ रन्सचे योगदान दिले.

पारस डोगरा आणि कन्हैया वाधवन यांनी प्रत्येकी ७० रन्स काढले, तर साहिल लोत्राच्या ७२ रन्सच्या खेळीमुळे संघ अतिशय मजबूत स्थितीत पोहोचली.

कर्नाटकची बॅटिंग लाईनअप कागदावर खूप मजबूत दिसत असली, तरी जम्मू-काश्मीरच्या आकिब नबीने आपल्या धारदार बॉलिंगने त्यांना धूळ चारली. केएल राहुल, मयंक अग्रवाल, देवदत्त पडिक्कल आणि करुण नायर यांसारखे दिग्गज खेळाडू या मॅचमध्ये अपयशी ठरले.

कर्नाटकची पहिली इनिंग केवळ २९३ रन्सवर आटोपली, ज्यामुळे जम्मू-काश्मीरला पहिल्या इनिंगमध्ये २९१ रन्सची मोठी आघाडी मिळाली. नियमांनुसार जम्मू-काश्मीरकडे फॉलोऑन देण्याचा पर्याय उपलब्ध होता, मात्र त्यांनी तो न स्वीकारता पुन्हा बॅटिंग करण्याचा निर्णय घेतला.

महाराष्ट्राचा संघ ठरला उपविजेता | शिवम पठारेची एकाकी लढत

# वरिष्ठ पुरुष गट कबड्डीत रेल्वेला विजेतेपद

| मुंबई | वृत्तसंस्था |

महाराष्ट्राने ७२ व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत धडक दिली. पण त्यांना उपविजेते पदावर समाधान मानावे लागले. गुजरात, वडोदरा येथील सागा बंदिस्त क्रीडा संकुल येथे सुरु असलेल्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र रेल्वे कडून ३१-४९ असा पराभूत झाला. हरियाणा येथे २०२२ साली झालेल्या ६८ व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत देखील महाराष्ट्र सेनादलाकडून पराभूत झाला होता. हैद्राबाद येथे २०१७ साली झालेल्या विजयाची पुनरावृत्ती करण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला. भारतीय रेल्वेचे स्पर्धेत सहभाग (१९५९) घेतल्या पासूनचे हे २५ वे जेतेपद. १९६१ सालापासून महाराष्ट्राची अंतिम फेरी गाठण्याची ही २१ वी वेळ. आपण फक्त ८वेळा जेतेपद मिळविले. महाराष्ट्राने झोकात सुरुवात करीत रेल्वे वर पहिला लोण देत १८-१३ अशी आघाडी घेतली. पण लोणची परतफेड करीत रेल्वेने २२-१८ अशी आघाडी घेत आपला इरादा स्पष्ट केला. याच गुणावर सामन्याचा मध्यंतर झाला. दुसऱ्या डावात मात्र रेल्वेने आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी चढईत २१ गुण, यशस्वी पकडी करीत १४ गुण, ५ बोनस गुण मिळवीत महाराष्ट्रावर बाजी पलटविली. महाराष्ट्राला चढाईत १२ गुण, पकडीत १३ व ३ बोनस गुण घेता आले. तसे पाहिले असता महाराष्ट्र विरुद्ध महाराष्ट्र असाच हा सामना झाला. पंकज मोहिते, शुभम शिंदे, अजिंक्य पवार यांच्या खेळण्याने रेल्वेचा संघ वरचढ ठरला. महाराष्ट्राच्या शिवम पठारे यांनी एकाकी लढत दिली.






## राष्ट्रीय पातळीवरील कामगिरी खालावली

**मागील दोन वर्षापासून महाराष्ट्र संघाची राष्ट्रीय पातळीवरील कामगिरी खालावली होती. महाराष्ट्र राज्य संघटनेतील राजकारण व निवड समिती सदस्यांवरील दबावामुळे महाराष्ट्राची कामगिरी सुमार दर्जाची झालेली होती. परंतु, राज्य संघटनेत अलिकडेच काही फेरबदल झाल्यानंतर निवड समितीला खेळाडू निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य दिल्यामुळेच महाराष्ट्र संघाची कामगिरी उंचावली असल्याचे दिसून येते. संघाच्या या कामगिरीबद्दल राज्य कबड्डी संघटनेचे प्रभारी अध्यक्ष गजानन कीर्तिकर व कार्यकारी मंडळाने समाधान व्यक्त केले असून कबड्डीप्रेमींना देखील आनंद झाला आहे.**

# मालवण येथे शिक्षकांसाठी व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन

| मालवण | प्रतिनिधी |

अध्यापन, प्रशासकीय कामाचा वाढता व्याप आणि जबाबदाऱ्यांच्या गराड्यात अडकलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सिंधुदुर्ग जिल्हा माध्यमिक अध्यापक संघ आयोजित आणि मालवण तालुका माध्यमिक अध्यापक संघ पुरस्कृत जिल्हास्तरीय सेमी व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन केले आहे.

या स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष अजय शिंदे यांनी केले आहे. स्पर्धेचे उद्घाटन ८ मार्चला सकाळी १० वाजता वायरी येथील श्री रेकोबा माध्यमिक विद्यालय येथे होणार आहे. स्पर्धेत जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागात कार्यरत असणारे आणि ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत नेमणूक झालेले सर्व कर्मचारी सहभागी होऊ शकतात. स्पर्धेत केवळ पहिल्या १६ संघांना प्रवेश दिला जाईल. खेळाडूंनी स्वतःच्याच तालुक्यातून खेळणे बंधनकारक आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)